||ग्रंथाली||

# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

## तांडव हरवताना... रवी परांजपे

'चीनवर एकही सैनिक न पाठवता सलग दोन हजार वर्ष सांस्कृतिक अधिराज्य गाजवलेला देश भारत होता.' चीनचे अमेरिकेतील राजदूत हू शीह यांनी काढलेले हे उद्गार आहेत. यावरून भारतीय सांस्कृतिक वारशाची कल्पना यायला हरकत नाही. अर्थात तो काळ इ.स.पूर्वचा होता. तो काळ म्हणजे सर्व कला आणि शास्त्र यांच्या विकासाचा वैभवाचा काळ होता. तो संस्कृतीच्या उत्कर्षाचा काळ होता. हा विकास शिवतत्त्वातून झाला होता. त्यात शिवसापेक्ष चैतन्य होते. शिवचैतन्यातून निर्माण होणारी ऊर्जा ही सज्जनशक्तिकारक, दुर्जनशक्तिमारक होती. ती सर्जनशील भारतीय पुरुषार्थाची ऊर्जा होती. ती शाबूत होती तोपर्यंत भारताचा हजारो वर्षांचा सांस्कृतिक वारसा शाबूत होता. त्याचा सर्जनशील आंतरिक जोम आटू लागला तो इ.स.१ पासून. जणू ही लक्षणे होती तांडव हरवू लागल्याची. पुढे ते हरवतच गेली उताराला लागल्यासारखी. परंतु अजूनही सावरण्याची संधी आहे. दृक्-श्राव्य चैतन्य-सौंदर्यभक्तीचे भान ठेवले तर महाराष्ट्र-भारताचे अनेक प्रश्न सुटू शकतील. ही निरीक्षणे आणि आशावाद आहेत रवी परांजपे यांची.

तांडव हरवताना... या पुस्तकाचे रवी परांजपे हे लेखक आहेत. सुप्रसिद्ध चित्रकार म्हणून त्यांचा लौकिक सर्वमान्य आहेच. तसे लेखक म्हणूनही त्यांचे स्वतंत्र स्थान यापूर्वीच 'शिखरे रंग-रेषांची', 'ब्रश मायलेज' आणि 'नीलधवल ध्वजाखाली ' या त्यांच्या पुस्तकांतून अधोरेखित झालेले आहे. त्यांना मिळालेल्या अनेक पुरस्कारांच्या सन्मानांनी त्याची पोच आधीच दिली आहे.

'तांडव हरवताना' हे पुस्तक म्हणजे एका शोधकाची वैचारिक आत्मकथा आहे. असा शोधक जो स्वतः उत्तम चित्रकार आहे. सुबोध-सुंदर-भावदर्शी असा आदर्श सिद्धांत ज्यांनी जपलेला आहे. तो चित्रातून आहे तसा लेखणीतूनही साकारलेला आहे. सर्जनशील तरल मन आणि स्वच्छ नजरेला जे भावले त्याचे चिंतन हिंदवी स्वराज्यसापेक्ष प्रगत उत्पादक भारत या कॅनव्हासवर साकारले आहे. हा शोध आहे तशी त्यावर आधारित निरीक्षणे आहेत. हा प्रवास दृश्यकलासापेक्ष नजरेतून, सौंदर्यभक्तीतून झालेला आहे. त्यामुळे सौंदर्याच्या छटा आणि तपशील अनेक अंगांनी व्यक्त झाला आहे.

तांडव हरवताना या विषयाची दोन भागांत विभागणी लेखकाने केलेली आहे- पाश्चिमात्य आरंभ आणि भारतीय सांगता. प्रगत जगाची सार्वजनिक, सामाजिक, राजकीय आणि राष्ट्रीय जडणघडण झाली ती दृश्यकलांना केंद्रस्थानी ठेवल्यामुळे. त्यांची दृश्यसौंदर्य आसक्ती ही त्यांच्या आरंभामागे आहे.त्याच्या तुलनेत भारताकडे पाहिले तर तो या आसक्तीपेक्षा भक्तीप्रिय असल्याचा दिसतो. राष्ट्रस्वार्थ आणि वैयक्तिक स्वार्थ एकत्र ठेवता आले नाहीत. धर्म आणि रिलिजन यातला फरक लक्षात न घेता सेक्युलरचा अर्थ धर्मनिरपेक्ष ही संकल्पना स्वीकारली. डिझाईन-ऑर्डर-सिस्टिम या त्रिशूळ आग्रांच्या राष्ट्रीय बांधिलकीकडे दुर्लक्ष केले. तांडव हरवत चालल्याची जी अनेक कारणे दिसतात त्यातील ही प्रमुख कारणे होत. आपल्या मताला पुष्टी देणारी दुसरीही अनेक उदाहरणे लेखकाने यात दिली आहेत, अगदी कारगील युद्ध, बाबरी मशीद, २६/११ हल्ला इथपर्यंत. आपल्या निरीक्षणात त्यानी सर डॉ. अरनॉल्ड टॉयबी यांसारख्या अनेक थोरामोठ्यांची वचने उद्धृत केली आहेत. चित्रकार बर्नी फुक्स, जे पॉल गेटी, सर अल्मा टाडेमा यांसारख्या थोर चित्रकारांची अनेक दृष्य सौंदयाची उदाहरणे दिली आहेत. त्यांचे वाचन करताना आपल्या भोवतीच्या प्रखर वास्तवाची जाणीव नव्याने होत जाते.याला अपवाद छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ.

शिव तांडवाची चैतन्यऊर्जा म्हणून नटराजाची आकर्षक मुद्रा, आणि हरवत चाललेल्याचे प्रतीक म्हणून कृष्णछायेत गेलेली त्याची प्रतिमा असे स्वतः लेखकाच्या कल्पकतेतून साकारलेले असल्याने मुखपृष्ठ परिणाम स्वरूपात वेधक झाले आहे. आतील फोटो आणि चित्रे, रंगीत आणि कृष्णधवल, पुस्तकाच्या सौंदर्यात व संदर्भात भर घालतात. ही चित्रे जशी पाश्चात्यांची आहेत तशी स्वतः लेखकाच्या कुंचल्यातून अवतरलेली आहेत. त्यामुळे लेखकाच्या लेखणीबरोबर कुंचल्याद्वारे वैचारिक सफर केल्याचा आनंद पुस्तक वाचताना मिळत राहतो. त्यांची राष्ट्रबांधणीसाठी अमेरिकेच्या टॉवरला मारलेली गोंडेदार दोरीवरची खूणगाठ ही तर कल्पनेची उत्तम झेप म्हणायला हवी!




**तांडव हरवताना... रवी परांजपे**
**पृष्ठसंख्या २१४, किंमत रु. २५० ● सवलतीत रु. १५०**



# ग्रंथपान

## सारांश शून्य – संजय कळमकर

शिक्षक प्रामाणिक म्हणून निवडणुकीची कामे! कामसू म्हणून जनगणना! स्वच्छताप्रिय म्हणून हागणदारीमुक्तीचा प्रचारक! कनवाळू म्हणून खिचडीला हातभार! सत्यप्रिय. बाणेदार. स्वच्छ प्रतिमेचा. व्यावहारिक. कष्टाळू. म्हणून त्याच्याकडे बांधकाम..! ही आहे शिक्षकांची व्यथा. विशेषतः ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची. इतके सगळे कमी म्हणून की काय,वर अपेक्षा, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवले पाहिजे, त्यांना घडवले पाहिजे. परंतु सरकार योजना जाहीर करते, अनेक उपक्रम राबवते, त्यात शिकवण्याचीच योजनाच निसटलेली असते त्याचे काय? ही आहे एका शिक्षकाची डोळस कैफियत. नारायण शंकर जगदाळे या शिक्षकाची. तिचे नाव आहे 'सारांश शून्य' आणि त्याचे लेखक आहेत संजय कळमकर.

संजय कळमकर हे सिद्धहस्त लेखक आहेत. त्यांच्या भग्न, कल्लोळ, उद्ध्वस्त गाभारे, अंतहीन या कादंबऱ्या आणि चिंब, चीअर्स हे कथासंग्रह यापूर्वी प्रकाशित झालेले आहेत. शिवाय अनेक पुरस्कारांनी त्यांच्या साहित्याचा सन्मान झालेला आहे. सदरची कादंबरी ही त्याच परंपरेला पुढे घेऊन जाणारी आहे.

सदर कादंबरीचा नायक नारायण जगदाळे, शिक्षक म्हणून मंगळापूर या खेड्याच्या गावी हजर होतो. त्या शाळेचे वातावरण, जो रनही काढीत नाही आणि आऊटही होत नाही असा गायकवाड मुख्यापक, तिरपागडा घालमोडे, संघटनेत काम करणारा सायंबर, पाट्या टाकणाऱ्या सानपबाई, आपल्याच पुरतं मग्न असलेल्या कास्तुके मॅडम आणि शिक्षणसेविका कु. शिल्पा गद्रे हे सहकारी. सरपंच, संघटनावाले, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षण अधिकारी, शिक्षण अधिकारीपासून थेट जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत या साखळातील अनेक संस्थाने भेटत जातात. त्यांचे स्वभाव, वागणे, कामाची पद्धत याचे अनेक नमुने त्याच्या अनुभवला येतात. यातून मुलांना शिक्षण किती आणि वैयक्तिक स्वार्थ, हेवेदावे किती याची स्पर्धा तो जवळून पाहत राहतो. शाळा आणि विद्यार्थी यांना केंद्रस्थानी ठेवून शिक्षणक्षेत्रात किती उलाढाली चालतात हे पाहून थक्क होतो. हेरंब सानेसारखी दिलासा देणारी काही ध्येयवादी माणसेही भेटतात. संघटनेच्या नावाखाली आपले शिकवण्याचे कर्तव्य न करणारे, वरच्याच्या आशीर्वादाने त्यांच्याभोवती फिरणारे महाभाग भेटतात. आदर्श शिक्षक पुरस्कारासाठीची धडपड हा वेळाच हौसेचा प्रकार अनुभवाला येतो. शाळा तपासणीचे नाटक तर मजेशीरच. तांदूळ, दूध, खिचडी या पोषक आहार योजनांचा होणारा मारा आणि त्यांच्या अंमलबजावणीत निर्माण होणारा गोंधळ, शाळेचे बांधकाम, शिक्षण साहित्य यासाठी मुख्याध्यापक आणि सरपंचाच्या नावे बँकेच्या खात्यात जमा होणारी शासन रक्कम,आणि तिच्यासाठीची धडपड हा प्रकार ही गमतीशीर. लेखक नारायणच्या निमित्ताने शाळा, शिक्षण आणि शिक्षक यांच्याभोवती गुंफलेले वातावरण अतिशय तपशिलाने रंगवून सांगत जातात. त्याचवेळी नारायणचे घर, त्याची गरिबी, आई व बहिणीविषयी वाटणारी तळमळ, स्वतः काटकसरीने वागून बहिणीच्या आजारावर उपचारासाठी पैसे जमवण्याची केविलवाणी धडपड, ही बाजूही तितक्याच समर्थपणे उभी केली आहे.नारायणचे साधेपण, वाचनाची आवड, शिक्षणाविषयी वाटणारी आस्था, चिंतन यातून नारायणचे व्यक्तिमत्त्व ठळकपणे नजरेसमोर उभे राहते.

कादंबरी ही ग्रामीण भागाचे वातावरण घेऊन येत असल्याने तिथल्या मातीचा, बोलीचा, वागण्याचा संस्कार तपशिलाने येत राहतो. बोलण्यात येणारा स्पष्टपणा, त्यातून निर्माण होणारे विनोद आणि सहजपणे येणाऱ्या म्हणी, वाक्प्रचार यामुळे भाषेचा गोडवा मातीचा गंध आल्यासारखा जाणवत राहतो.

'.. मोक्कार बेडकावाणी फुगलंय ते. लई तरास देतं. रात्री–बेरात्री नदीत येऊन धडकतं. टिटवीचे अंडे खाल्ल्यावाणी झोपच नाई तेला.'

'..बाहेरचा पाऊस थांबला तरी घरात रात्रभर झिरपून गरिबीला भिजवणाऱ्या पाण्यानं मला हे सारं शिकविलंय..'

हा गोडवा भाषेतला ओघ आणि लाघव वाचताना आनंद देत राहतो. लेखकाने संयमाने आणि तितक्याच मनोरंजकतेने हा विषय हाताळला आहे. चित्रकार सतीश भावसार यांनीही मुखपृष्ठ विषयाला साजेसे चितारले आहे. शाळेच्या घंटेवर आदळणारा हातोडा हा घंटेसोबतच शिक्षक आणि शिक्षणावरही आदळत आहे की काय असाच प्रश्न जणू ते वाचकाला विचारीत आहेत असे वाटते.




**सारांश शून्य – संजय कळमकर**

**पृष्ठसंख्या ३३१, किंमत रु. ३०० • सवलतीत रु. १८०**



# ग्रंथपान

## मे आय कम इन...? - कु. तन्वी दिनेश डोके

'शिक्षकांना माझ्याबद्दल कधी विश्वास वाटत नसावा. मला कधी संधी दिली गेलीच नाही. सगळे प्रॅक्टिसला जायचे, चर्चा करायचे. मी तासन्तास एकटी वर्गात बसायचे. माझ्या मनात कायम खंत राहील की मला कधीच गॅदरिंगमध्ये संधी दिली गेली नाही. माझा विचार कधी कुणी केलाच नाही.त्यामुळे एक झाले, एकटी बसून मी लिहू लागले. मी मला सुचलेल्या गोष्टी मोठ्या अक्षरात लिहून काढायचे.' लेखनप्रवासाला सुरुवात झाली ती अशी. तो प्रवास होता दवाने गवताच्या पात्यावर खेळण्याचा. किलकिल्या नजरेने आसपास पाहण्याचा. आपल्याच पंखाचे रंग न्याहाळण्याचा, कौतुकाने. स्वतःच्या मनाला रिझविण्याचा. त्यातून उभारी मिळाली. पंखांना बळाची जाणीव होऊ लागली. आणि एक दिवस घेतली भरारी. आपल्याच कोशातल्या दिवसांना टिपण्याची. ओंजळीत जमा झालेल्या मोत्यांना सूर्यकिरणांत पेरण्याची. त्याचे हे लहानसे झाड. गोंडस, लोभस, कोवळ्या वल्लभानी डवरलेले झाड- 'मे आय कम इन...?'

कु. तन्वी दिनेश डोके ही लेखिका आहे 'मे आय कम इन...?' या पुस्तकाची. नावावरून लक्षात आले असेलच की विषय शाळेशी संबंधित असावा. ही एका शालेय प्रवासाची कथा आहे. म्हटले तर इवलीशी, म्हटले तर खूप मोठी. लाजाळूच्या झाडासारखी. लेखिकेच्या नावारूनही अंदाज आला असेलच वयाचा. तर तोही बरोबर आहे. लेखिका आहे एक विद्यार्थिनी. अवघी दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेली. मग तिच्याकडे सांगण्यासारखे काय असेल, असे कुतूहल वाटणे अगदी स्वाभाविक आहे. म्हणजे जे काही सांगायचे ते मोठ्यानीच सांगावे असा काही नियम नाही. लहानांनाही त्यांचे विश्व असते. त्यांनाही भोवताली घडणारे दिसत असते त्यांच्या बाळ नजरेतून. तशा त्यांनाही भावभावना असतातच की. त्याचा प्रत्यय म्हणजे 'मे आय कम इन...?'

पुस्तकाचे निवेदन हे प्रथमपुरुषी असल्याने स्वाभाविक आहे की, तन्वी तिची कहाणी सांगते आहे. ज्युनिअर केजीपासून ती दहावीपर्यंतची. वडिलांच्या बदलीमुळे बदलाव्या लागलेल्या जवळपास आठ शाळा. त्या शाळांचे नियम, शिस्त, गुरुजन, विद्यार्थी, खेळ, खेळाचे मैदान, प्रयोगशाळा, स्पर्धा, गॅदरिंग... हे सारे वरवर दिसणारे घटक.परंतु हेच घटक या वयात जे संस्कार करतात ते कुणीही विसरू शकत नाही, कधीही. किंबहुना त्या आठवणी प्रत्येकाने जपून ठेवलेल्या असतात मनाच्या मखमली कप्प्यात. म्हटले तर तन्वी या साऱ्या घटकांविषयीच बोलते या पुस्तकातून, परंतु तेवढेच नाही. सर्वसामान्य विद्यार्थ्याच्या वाट्याला येणारे हे अनुभव नाहीत. हे असामान्य विद्यार्थिनीच्या वाट्याला आलेले अनुभव आहेत. जिच्याकडे बौद्धिक पातळीचा स्तर वरच्या क्रमांकाचा आहे,स्मरणशक्तीचा स्तर उत्तम आहे. अडचण आहे ती काही शारीरिक हालचालीच्या संदर्भात. त्यामुळे आलेले काहीसे परावलंबित्व. तिचे हे अनुभव आहेत. दैनदिन अनुभवास आलेले. ज्यांना सामोरे जाताना स्वतःच प्रगल्भ करीत जाणारे. समाजात व्यक्ती तितक्या विकृती, शाळेत मात्र सगळेच विद्यार्थी हा समज दृढ करणारे.

पुस्तकाचे निवेदन सरळ,सोप्या पद्धतीने झालेले आहे. पहिलेच आणि अनाघ्रात वयातले असूनही अनुभवात कुठे उणेपणा जाणवत नाही. तसेच आपल्या अबनॉर्मलपणाचा कुठे बाऊ नाही. कुणाविषयी आकस नाही. उलट अतिशय तरल मनाने घेतलेला उत्कट अनुभव असेच वाचताना जाणवत राहते. मुखपृष्ठ पुस्तकाला साजेसे आहे. शाळा आणि विद्यार्थी पाहून आपली शाळा आठवावी असे.

**मे आय कम इन...? कु. तन्वी दिनेश डोके**
**पृष्ठसंख्या ७४, किंमत रु.१२५ ● सवलतीत रु. ८०**



ग्रंथाली



# ग्रंथपान

## संवाद-डॉ. नीना सावंत

ग्रंथालीच्या परंपरेतील आणखी एक पुस्तक 'संवाद.' लेखिका आहेत डॉ. नीना सावंत, मानसोपचार तज्ज्ञ आणि केईम व ग्लोबल हॉपिस्टलमधील प्राध्यापक. सहजसोप्या भाषेत आणि प्रत्येकाला विनासायास आकलन होईल अशा पद्धतीने लिहिलेले हे पुस्तक आहे. आधुनिक धावपळीत हरवत चाललेल्या संवादाची अचूक नस पकडून त्याचे होणारे दुष्परिणाम आणि वेळीच सावरण्याचे उपाय यावर केलेले समुपदेशन म्हणजे 'संवाद'.

संवाद स्वतःशीही करता येतो, पण खरा संवाद व्हायचा तर किमान दोन माणसांची आवश्यकता असते; नात्यातल्या, आपली वाटणाऱ्या माणसांची.त्यांच्यातल्या संवादावर आधारित विषयाची एकूण चौदा प्रकरणांत विभागणी केलेली आहे. विषयाचा आवाका मोठा असूनही अत्यंत सुटसुटीत व समर्पक पद्धतीने त्याची उकल केलेली आहे. संवादाची सुरुवात ही घरापासून केलेली आहे. संवाद असेल तर घरात निरोगी वातावरण खेळत राहील. यासाठी आपली पूर्वीची संयुक्त कुटुंब पद्धती आदर्श का होती, तिची आठवण मुद्दाम करून देण्यात आली आहे.

बालक-पालक यांच्यातील सुसंवादाची मूळ तत्त्वे आणि पद्धती यांची सविस्तर माहिती दिली आहे. पालकांनी आचरणात आणावी अशी ही माहिती आहे. मात्र तसे करताना मुलांच्याच पायाच्या मापाचे बूट घाला असा आवर्जून सल्ला देतात. लैंगिक शिक्षणाबाबत पालकांनी मुलांशी मनमोकळेपणाने बोलायला हवे. त्याचबरोबर नैतिकताही शिकवायला हवी, याचे भानही स्पष्ट केले आहे. शरीर व मनाच्या बदलाच्या वळणावर मुलांसाठी पालकाच मोठा मार्गदर्शक ठरू शकतो.

सासू-सुनेच्या नात्यातही सुसंवादाची आवश्यकता मोठी आहे. सुनेने काय करावे आणि काय टाळावे, आणि उत्तम सासू कशी असावी व ती कशी असू नये याचेही विवेचन रंजक पद्धतीने केलेले आहे. मी पाट्यावर वाटून स्वयंपाक केला म्हणून तू मिक्सर न वापरता स्वयंपाक कर हा आडमुठेपणा ठेवू नये, उलट मला तू हवी आहेस ही भावना दोघींच्या निकोप नात्याची बांधणी असावी असे सांगतात. पती-पत्नीच्या सुसंवादी रेशीमगाठीविषयी तर फार काळजी घेण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या समस्यांवर समुपदेशन करताना बँकेच्या खात्याशी नात्याची तुलना केली आहे. तुमचे पैसे काढण्याच्या प्रमाणापेक्षा बचतीचे प्रमाण अधिक असेल तर असे खाते सुरळीत चालू राहते. मात्र बचतीपेक्षा पैसे काढण्याचे प्रमाण अधिक असेल तर असे खाते बंदच होऊ शकते. म्हणून नकारात्मक व अवास्तव अपेक्षा ठेवण्यापेक्षा आनंदाच्या क्षणांची पुंजी संसारात वाढवत ठेवा. तू-तू मी-मी करण्यापेक्षा एकमेकाला समजून घ्या असा सल्ला देतात. तीच तऱ्हा कामाच्या ठिकाणची. तुम्ही बॉस असाल वा कर्मचारी, प्रत्येकाने भान कसे ठेवायला हवे याचा आलेख आखून दिला आहे.

लेखिका संवादातल्या एका जबरदस्त शब्दाकडे लक्ष वेधतात.तो शब्द म्हणजे 'नाही.' याची ताकद फार मोठी आहे. हा शब्द स्वतःतला कमकुवतपणा नाहीतर ठामपणा व्यक्त करतो. भावना, भीती, भिडस्तपणा हे सारे गृहीत धरून या शब्दाबाबत कसे जागरूक असावे याचे महत्त्व त्या स्पष्ट करतात.

संवादात मन, भावभावना, मृदूपणा, स्पष्टपणा, आपलेपणा यांना असलेले महत्त्वही या पुस्तकात अधोरेखित करण्यात आले आहे. त्याच्याविना संवाद हा सुसंवाद होऊ शकत नाही. तेव्हा संवाद साधला पाहिजे पण त्यासाठी या गुणांची जपणूक करायला हवी हे आपोआपच आले.

असे हे संवादावरील पुस्तक म्हणजे घरच्याघरी आपले समुपदेशन म्हणायला हरकत नाही.

मुखपृष्ठही छान झाले आहे. चक्रव्यूहाची योजना आणि त्याला हिरव्या रंगाची झळाळी देऊन मध्येच काळ्या रेषांची पडछाया दिलेली आहे. संवादाअभावी जीवन हेच असे चक्रव्यूह ठरेल आणि आनंदाचे ताटवे झाकोळले जातील हेच यातून व्यक्त झालेले दिसते. विषयाशी जुळलेले असे हे मुखपृष्ठ आहे.




**संवाद-डॉ. नीना सावंत**
**पृष्ठसंख्या ८६, किंमत रु. १०० • सवलतीत रु. ६०**

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

## डॉ. रघुनाथ माशेलकर : भारतीय बौद्धिक संपदेचा उद्गाता – अ.पां. देशपांडे

डॉ. रघुनाथ माशेलकर यांना २६ जानेवारी २०१४ रोजी 'पद्मविभूषण ' या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. एका आव्हानवादी ध्येयाचा हा सन्मान आहे, बौद्धिक संपदेचा गौरव आहे. आपल्यासाठी ही अभिमानाची बाब म्हणायला हवी. परंतु त्यांना मिळालेला हा काही पहिलाच पुरस्कार नाही. लेखक अ.पां. देशपांडे यांनी लिहिलेल्या या चरित्रातील पृ.क्र.१४५ ते १६२ वरील तपशील पाहिला तर लक्षात येईल, की राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय अशा किती पुरस्कार आणि सन्मानांनी त्यांच्या कारकिर्दीत स्वतःला पावन करुन घेतले आहे. त्यांच्यातील क्रमवारीचे कुतूहल म्हणून लेखक जेव्हा चरित्रनायकालाच सवाल करतात तेव्हा ते पहिला क्रमांक देतात, 'एफआरएस' फेलोशिप ऑफ रॉयल सोसायटीला. नोबेल पुरस्कारानंतरचा सर्वोच्च पुरस्कार! त्याचे कारण ही तसेच आहे. रॉयल सोसायटीच्या साडेतीनशे वर्षांच्या इतिहासात हा सन्मान प्राप्त झालेले डॉ. माशेलकर हे एकमेव मराठी शास्त्रज्ञ आहेत!

डॉ. माशेलकरांवरील हे पुस्तक म्हणजे एका प्रवासाची गाथा आहे. हा प्रवास आहे त्यांच्या बौद्धिक पातळीचा,ज्याच्या पावलांसाठी जगाच्या ज्ञानपीठांनी आपले दरवाजे उघडे केले. हा प्रवास आहे कल्पकतेचा, ज्याद्वारे भारतीय सर्जनशीलतेला जागतिक पातळीवर स्वतःचे स्थान प्राप्त झाले. हा प्रवास आहे त्यांच्या ध्येयाचा, जे आपले आहे ते सिद्ध करण्याचा, त्याचे हक्क मिळवण्याचा, भारताला सर्जनशील भारत म्हणून ओळख देण्याचा. ज्या मातीतून आलो आहे तिचा दरवळ जगभर पसरवण्याचा. याचा प्रत्यय येतो त्यांच्या एका व्याख्येतून, इंडियातील आय हे अक्षर इमिटेशन म्हणजे नक्कल करणे अथवा इनहिबीशन म्हणजे प्रतिबंध करणे असे नसून त्याचा अर्थ आहे इनोव्हेशन म्हणजे नावीन्य,सर्जनशीलता.

पेटंट हा शब्द आज परवलीचा समजला जातो, त्यापाठी असलेली जिद्द आणि लढा हा डॉ. माशेलकरांचा आहे. ही लढाई हळदीच्या पेटंटपासून सुरु झाली. माशेलकरांनी ही लढाई सोडून दिली असती तर नुसती हळदच नाही तर परंपरेने, वारशाने हजारो वर्षे ज्या ज्ञानावर, संशोधनावर भारतीयांचा हक्क आहे, तो हक्कच दुसऱ्या देशांकडे गहाण पडण्याची शक्यता अधिक होती. आज भारताकडे जी पेटंट आहेत त्यापैकी ४० टक्के पेटंट डॉ. माशेलकरांनी त्यांच्या सीएसआयआरमार्फत मिळवलेली आहेत.

डॉ. माशेलकरांच्या ठायी असलेली जिद्द ही त्यांना त्यांच्या आईकडून मिळालेली देणगी आहे. आईने स्वतःच्या कष्टाचा वा गरिबीचा बाऊ न करता त्यांना शिक्षणाची कास धरायला लावली. पोस्ट डॉक्टरल रिसर्च करायला हवे असे सुचवले. त्याविषयी लेखक एका वाक्यात वर्णन करतो, की माशेलकरांच्या अत्युच्च शिक्षणाच्या यशाला त्यांच्या आईच्या महत्त्वाकांक्षेची रुपेरी किनार लाभली आहे. स्वतः डॉ.माशेलकर ते आजन्माचे ऋण मान्य करतात.त्याच जिद्दीने परदेशाचा मोह सोडून आपल्याच देशाला आपल्या ज्ञानाचा लाभ अर्पण करतात. एकूण ४५ वर्षांच्या कारकिर्दीपैकी ३८ वर्षे ते भारतात राहून त्याला जगाचे ज्ञानकेंद्र करण्यासाठी झटत राहतात ते याच जिद्दीने.

भारताच्या बौद्धिकतेविषयी असलेले मत जीईची दंतकथा बनलेला महान नेता जॅक वेल्च याने व्यक्त केले आहे.तो म्हणतो, 'भारत हा मला विकसित झालेला देश तर वाटतोच, त्याहीपेक्षा हा देश म्हणजे मला बुद्धिमत्तेची राजधानीच आहे असे वाटते.' या बुद्धिमत्तेच्या सर्जनशीलतेचा विकास, संशोधन आणि त्याचे हक्क याबाबतची तळमळ डॉ. माशेलकरांच्या कर्तृत्वातून व्यक्त होते. असामान्य बुद्धिमत्ता असलेल्या, कर्तृत्वाचे क्षितीज काबीज केलेल्या, आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले स्थान अढळ केलेल्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व आपल्या लेखणीतून अक्षरांकित करणे सोपे नाही. ते आव्हान लेखकाने समर्थपणे पेलले आहे. अनेक महापंडितांच्या सोबतचे फोटो छापले आहेत. त्यांच्यावरुन या आव्हानाची कल्पना यावी. या चरित्रग्रंथासाठी लेखकाने भरपूर मेहनत घेतली आहे हे संदर्भसूचीवरुन लक्षात येतेच, शिवाय लेखनात आलेली माहिती आणि तपशीलही त्याची साक्ष देतात. तीही सोप्या आणि ओघवत्या लयीत. त्यामुळे हा केवळ चरित्रग्रंथ न राहता संदर्भ ग्रंथ झाला आहे. ग्रंथालीने हा ग्रंथ सुबकतेने प्रकाशित करुन आपल्या दृष्टीचा पल्ला किती अचूक आहे याचा अंदाज सार्थ ठरवला, पद्मविभूषण मिळण्यापूर्वीच. त्यासाठी ग्रंथाली आणि लेखक यांना सलाम! डॉ. माशेलकर यांचे अभिनंदन!




**डॉ. रघुनाथ माशेलकर**
**भारतीय बौद्धिक संपदेचा उद्गाता**
**अ.पां. देशपांडे**
**किंमत २२५ रुपये**
**सवलतीत १३५ रुपये**

ग्रंथाली

# ग्रंथपान

## जेनेटिक्स कशाशी खातात? – डॉ. उज्ज्वला दळवी

सध्या एका रोगावर सर्वांसाठी एकच उपाय ठरलेला असतो. रोगाचं निदान झालं की जनुक-तपास न करता त्या अक्सीर इलाजाचा ठरलेला डोस सर्वांसाठी लिहायचा सरधोपट शिरस्ता आहे. त्यामुळे काही रुग्णांत गंभीर दुष्परिणाम होतात. हे औषधांच्या दुष्परिणामाचं प्रमाण मोठं आहे. अमेरिकेत दरवर्षी सुमारे एक लाख लोक औषधांच्या दुष्परिणामांनी मृत्युमुखी पडतात.

'कॅन्सरसारख्या रोगात रुग्णाची जन्मकुंडली तर महत्त्वाची असतेच,पण कर्करोगाच्या पेशींना स्वतंत्र जनुकटिपणी असते. ज्या स्त्रियांच्या स्तनाच्या कॅन्सरमध्ये एचईआरटू हे जनुक अधिक व्यक्त होतं त्यांच्यात हरसेप्टीन हे एरवी प्रभावी असणारं औषध लागू पडत नाही, ते निष्प्रभ ठरतं. कॅन्सर फिरफिरुन डोकं वर काढतो. म्हणून ते जनुक आधीच तपासून पाहायला हवं.' हे आहेत अनुभवाचे बोल. डॉ. उज्ज्वला दळवी सांगताहेत जनुकाबाबतचं महत्त्व आणि त्याचं कार्य 'जेनेटिक्स कशाशी खातात?' या पुस्तकातून.

डॉ. उज्ज्वला दळवी हे वैद्यकीय क्षेत्रातलं अनुभवसंपन्न व्यक्तिमत्त्व. हिंदुजा रुग्णालयात कन्सल्टंट, डी.वाय. पाटील मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकशास्त्राच्या विभागप्रमुख. देशी-परदेशी वैद्यकीय क्षेत्रात काम केलेल्या. त्यांच्या या अनुभवाचा लाभ वाचकांना व्हावा या हेतूनं लिहिलेलं हे पुस्तक किती आशयगर्भ आहे याचा अनुभव पुस्तक वाचताना पदोपदी येत राहतो. हा केवळ स्टेथोस्कोपी सल्ला नाही. तर सोबत कलमकसबही तितकंच लीलया मोरपीसासारखं पानापानावर फिरलेलं जाणवतं. विज्ञान विषय सोपा करुन सांगण्यासाठी शब्दकोशातल्या शब्दांना वेठीला धरण्याऐवजी आपल्या प्रचलित शब्दांना कल्पनेच्या चंचीतून काढल्यामुळे. आनंदाचा डंका..मेंदूच्या बुडाशी चिंचोक्याएवढ्या ग्रंथी..भळभळत्या जखमा, अशा रचनेतून वाचनाचा वेगळाच आनंद मिळल्याचे समाधान मनात रेंगाळत राहते. याचं कारण त्याना असलेली ललित लेखनाची आवड. 'ग्रंथाली'नंच प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या 'सोन्याच्या धुराचे ठसके' या लोकप्रिय पुस्तकातून, वेळोवेळी विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या लेखनातून ही आवड वाचकांच्या भेटीला यापूर्वी आलेली आहेच.

जनुक आणि डीएनए हा विषय डॉली या मेंढीच्या क्लोनमुळे सगळ्यांच्या परिचयाचा झाला. तसे हल्ली ऊठसूट कुठल्याही गुन्ह्यासाठी डीएनएची तपासणी करण्याची बातमी नित्यनेमानं वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. त्यामुळे या विषयीचं कुतूहल प्रत्येकाच्या मनात सतत डोकावत आहे. त्यास सापेक्ष अशी कितीतरी उदाहरणं या पुस्तकात दिलेली आहेत. जनुकाच्या तपासणीतून बाहेर पडणारं सत्य हा आता न्यायालयीन निवाड्यासाठी मोठाच वैज्ञानिक आधार ठरला आहे हे त्यावरुन लक्षात येतं. तसंच कॅन्सरसारख्या आजारात या जनुकांची भूमिका किती प्रभावी असते याचं सखोल विवेचनही यात आलेलं आहे. जनुकं, पेशी, ग्रंथी आणि डीएनए यांचा शोध, तपासणी आणि कार्य यांची माहिती शास्त्रीय पद्धतीला कुठेही फाटा न देता सहजसुंदर भाषेत करुन दिली आहे.त्यासाठी भरपूर आकृत्या दिलेल्या आहेत. त्यामुळे विषयाचा आवाका आणि आकलनाशी पटकन नाळ जुळली जाते. गर्भावस्थेपासून वयाला उतार लागतो तिथपर्यंतचा जनुकाचा प्रवास थक्क करणारा आहे. त्यातली उदाहरणे पाहिल्यानंतर नकळत स्वतःच्या अनुभवांना त्याच्याशी ताडून पाहण्याचा मोह होतो. जनुकांची भानगड नसती तर युरोपचा इतिहास थोडा वेगळा झाला असता, या वाक्याला पुष्टी देणारं रशियाच्या शेवटच्या झारचा एक मुलगा अलेक्सी याचं उदाहरण दिलं आहे. त्याचा इतिहास पाहिला की जनुकाची वारसदारी किती प्रभावी आहे याची खात्री पटते.

डॉलीप्रमाणेच बीटी वांगं आणि कापूस यासारख्या अनेक पिकांच्या निर्मितीवरुन बराच गोंधळ मधल्या काळात उडाला होता. त्याचीही माहिती यात आलेली आहे. इंग्रजी शब्दांची शब्दावली आणि टीपा पुस्तकाच्या शेवटी दिलेल्या आहेत. त्यामुळे जनुक विषयावरील हे पुस्तक संदर्भग्रंथ म्हणून मोलाचं वाटतं. मेघातून अवतरलेली डॉली, बीटी वांगं आणि मेंडलचे वाटणे भरलेली थाळी आणि पीळदार शिडी असलेल्या डीएनएनं भरलेला कटोरा, काटेरी चमच्यानं उचललेला त्यातला एक तुकडा आणि खाण्यासाठी उघडलेलं तोंड, यातून पुस्तकाच्या नावाचा उखाणा घेतल्यासारखा वाटतो. त्यामुळे आशय आणि कल्पना दाखवणारं मुखपृष्ठ आकर्षक झालं आहे.




**जेनेटिक्स कशाशी खातात?**
**डॉ. उज्ज्वला दळवी**
**किंमत २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

## तांबट – प्रल्हाद जाधव

'जाडी–भरडी चोच, आखूड शेपटी, काळ्या डोळ्यांभोवती वरुन आणि खालून पिवळ्या रंगाचं अर्धवर्तुळ, मानेखाली पोटाच्या दिशेनं उतरणारे हिरव्या–पिवळ्या रंगाचे फटकारे आणि चोचीच्या बुडातून वर आलेले मिशांसारखे केस माझ्या नजरेत भरले होते. मात्र पक्षी नेमका कोणता याचा पत्ता लागत नसल्यानं अस्वस्थ झालो होतो.'

ही अस्वस्थता आहे लेखक प्रल्हाद जाधव यांची. तिचे वर्णन केले आहे 'तांबट' या पुस्तकात. ग्रंथालीने प्रकाशित केलेले हे पुस्तक म्हणजे पक्षीकोशातील एका पक्ष्याचा कोश, तांबट नावाच्या पक्षाचा. मुंबईसारख्या शहरात एका पक्षाचे निरीक्षण इतक्या तन्मयतेने करणे, ध्यास घेतला तरच शक्य होऊ शकते याचे उदाहरण म्हणजे हे पुस्तक. लेखकाने तो ध्यास घेतला, सोबत आपल्या कुटुंबालाही त्यातही सहभागी करुन घेतले. त्यातून मग सगळेच जण या ध्यासाने भारावून गेले. त्यांच्या निरीक्षणातून वेगवेगळे पैलू सापडत गेले. त्याच्या नोंदी बारकाईने करुन ठेवल्या. त्यातून आकाराला आले 'तांबट' हे पुस्तक. अर्थातच याचा मुख्य नायक आहे तो तांबट नावाचा पक्षी. वर वर्णन केलेला पक्षी. जो त्याच्या 'टुक...टुक' या नादाने लेखकाला नादाला लावतो. त्याची झाडावरची दिनचर्या, जी सकाळच्या गायनापासून सुरु होते. मग उडणे, फांदीवर बागडणे, घरटे तयार करणे, अंड्यांचे – त्यातून जन्माला आलेल्या पिलांचे रक्षण करणे, पिलांना चोंचीने भरवणे, उडायला शिकवणे, आपल्यासारखा आवाज काढायला शिकवणे, आणि एक दिवस त्या पिलांचा जोडीदारासह नवा संसार थाटणे, असा एक नाजूक, हळुवार प्रवास सुरु होतो. लेखक भान हरपून त्या प्रवासाचा सोबती होतो. सगळ्या घटनांच्या नोंदी कुतूहलाने करत राहतो, अगदी बारकाईने. त्याची प्रचिती या पुस्तकातून येते.

प्रवासाचा मार्ग ठरलेला असला तरी प्रवासात अनेक मार्ग आपोआप भेटीला येतातच, वारकऱ्याला गावकरी भेटतात तसे. लेखक तांबट या पक्ष्याच्या निरीक्षणात रममाण झाला तरी झाडावर केवळ तांबटच मुक्कामाला येतो असे नाही. इतरही अनेक पक्षी येतात. त्यात कावळा, कोकिळा, कबूतर, चिमणी, पोपट, साळुंकी, बगळा, बुलबुल, हळद्या असे काही पक्षी लेखकाचे डोळे आपल्याकडे खिळवून ठेवण्यास त्याला भाग पाडतात. त्यांची वैशिष्ट्ये नोंद करण्याच्या मोहात पाडतात. त्यामुळे या पक्ष्यांची निरीक्षणेही तरलतेने आणि तितक्याच भावूकतेने केलेली आहेत. एक पक्षी म्हटला की इतर पक्षी जसे येतात, तसे पक्षी आपला संसार थाटतात त्या वृक्षांना वगळून कसे चालेल? पांगिरा, निंब, जांभूळ, गुलमोहर, कॅशिया, वड यांसारखे वृक्ष म्हणजे, पक्ष्यांची गावे. त्यांच्या चित्रात या गावांना वगळून कसे चालेल? त्यांचे बहरणे, पानगळ, साल, फुले, खोडाचा रंग, त्यातली ढोली यांचीही निरीक्षणे अचूकतेने टिपलेली आहेत. प्रत्येकाची वैशिष्ट्ये उलगडून सांगितली आहेत. ती वाचताना दुर्गाबाईंच्या 'ऋतुचक्र'ची आठवण येते.

पक्षीनिरीक्षणे म्हटली की डॉ.सलीम अली आणि पक्षीकोशकार मारुती चित्तमपल्ली यांची नावे चटकन ओठावर येतात. अर्थात त्यांची तपश्चर्या फार मोठी आहे. त्यांच्या निरीक्षणांशी तुलना करता येणार नाही. हे शहरी भागातले निरीक्षण आहे. जेथे सिमेंटचीच जंगले आहेत. तरी यातली निरीक्षणे कुठेही उणेपण येऊ देत नाही. उलट प्रत्येकाला असे निरीक्षण सिमेंटच्या जगंलात राहूनही करता येऊ शकेल असा विश्वास हे पुस्तक देते. भाषाही सोपी आणि सहज आहे. त्यामुळे वाचनातला ओघ आणि उत्सुकता कायम राहिलेली आहे. सिमेंटच्या जंगलात स्वतःचा रंग हरवलेल्या माणसाचा शुभ्र चेहरा आणि त्याच्या नजरेच्या ठिकाणी तांबट पक्षाची योजना केल्याने मुखपृष्ठ उठावदार झाले आहे. तसेच मलपृष्ठावर हाच तांबट पक्षी दाखवलेला आहे. मात्र इथे तो नजरेच्या ऐवजी कापलेल्या शुष्क खोडाच्या कडेवर विसावला असून भयग्रस्त नजरेने चोच आ करुन येणाऱ्या संकटाची चाहूल घेताना दिसतो. यातून भविष्यातील संकटाचा वेध चित्रकाराने घेतलेला दिसतो. आत अनेक रेखाटने दिली आहेत, तशी रंगीत चित्रेही दिली आहेत. त्यामुळे संदर्भात आणि सौंदर्यात भर पडलेली आहे.




**तांबट**
**प्रल्हाद जाधव**
**किंमत १५० रु.**
**सवलतीत ९० रुपये**

॥ग्रंथाली॥

## ग्रंथपान

### बुद्ध परंपरा आणि बोधिवृक्ष – हेमा साने

सम्यक् दृष्टी, सम्यक् आचार, सम्यक् वाणी, सम्यक् कृती, सम्यक् उपजीविका, स्मृती आणि समाधी यांच्याद्वारे दुःखावर मात करणे. या आठ गोष्टी म्हणजे अष्टांगिक मार्ग, असे सम्यक् म्हणजे योग्य वागणारा तो ज्ञानी, जाणकार. अर्थात ज्ञानी, सम्मासम्म बुद्ध.

मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा या चार तत्त्वांचा आधार घेतला की जीवन सुह्य होते, सुखाचा लाभ होतो. जग अनित्य आहे, जीवन संपणार आहे ही जाणीव म्हणजे प्रज्ञा, सदाचार म्हणजे शील, मनाची समतोल अवस्था म्हणजे समाधी, हे विचार, तत्त्वज्ञान ज्याला समजले, त्याने ते आत्मसात केले, तो जाणकार म्हणजे बुद्ध झाला.

बुद्ध या संकल्पनेविषयी केलेले हे विवेचन 'बुद्ध परंपरा आणि बोधिवृक्ष' या पुस्तकात आहे. त्याच्या लेखिका आहेत हेमा साने. म्हणजेच डॉ. हेमलता साने. अध्यापन आणि संशोधन क्षेत्रातले व्यासंगी व्यक्तिमत्त्व. त्यांच्या प्रकाशित ग्रंथसंपदेची यादी बरीच मोठी आहे. त्याचाच एक भाग म्हणजे 'बुद्ध परंपरा आणि बोधिवृक्ष' हे पुस्तक होय.

पुस्तकाच्या शीर्षकावरुनच त्याच्या व्यापकतेची कल्पना यावी. त्याची विभागणी सोयीसाठी दोन भागांत केलेली आहे. पहिला भाग बुद्धचरित्र ते बौद्ध वाङमयावर दृष्टिक्षेप इथपर्यंतचा आहे. तर दुसऱ्या भागात, एकूण झालेले प्रसिद्ध बुद्धपुरुष आणि ज्या वृक्षाखाली त्यांना ज्ञान प्राप्त झाले त्या बोधिवृक्षांची माहिती दिलेली आहे.

बुद्ध म्हणजे ज्ञानी गृहस्थ. सर्वपरिचित असलेले ज्ञानी पुरुष म्हणजे गौतम बुद्ध. बुद्धत्व ही परंपरा आहे आणि बुद्धवंस या ग्रंथात अठ्ठावीस बुद्धांची परंपरा दिलेली आहे. तिच्यानुसार गौतम बुद्ध यांचा क्रमांक येतो अठ्ठाविसावा. परंतु 'ललित विस्तार' व 'महावस्तू' या ग्रंथांप्रमाणे ही संख्या शंभराच्या पुढे जात असल्याचे लेखिका नमूद करतात.त्यांनी यातील पंचवीस बुद्धांची आणि त्यांच्या बोधिवृक्षांची स्थळासहित माहिती दिलेली आहे. बुद्धत्व प्राप्त करुन घेण्यासाठी साधकास ज्या भूमिका पार पाडाव्या लागतात त्यांची यादी दिलेली आहे. मुदिता, शीलपारमिता, धैर्यपारमिता, वीर्यपारमिता, ध्यानपारमिता, प्रज्ञापारमिता, दुरंगमा, अचला, साधुमती आणि धर्ममेघ या त्या पायऱ्या होत.यातील पारमिता म्हणजे काही सद्गुण प्राप्त करणे. तसेच गौतम बुद्धाच्या आयुष्यातील महत्त्वाची स्थळे, लुम्बिनी, बोधिगया, सारनाथ, कुशिनगर, श्रीवस्ती, सांक्ष्या, राजगृह, वैशाली यांचीही माहिती यात दिलेली आहे.

बोधिसत्त्व म्हणजे जगाच्या कल्याणासाठी झटणारे बुद्ध. बुद्ध स्वतः प्रतिमापूजनाच्या विरोधात होता. त्याच्या परिनिर्वाणानंतर भक्ती, आराधना, प्रतीक स्वरुपात सुरू झाली. ही प्रतीके म्हणजे पदचिन्हे, बोधिवृक्ष, वज्रासन, स्तूप, आणि त्रिरत्न म्हणजे बुद्ध,धर्म आणि संघ यांचे त्रिशूलात्मक स्वरुप. पुढे बुद्धमूर्तीचा पाया घातला गेला. त्यातील वैराचन, अक्षोभ्य, रत्नसंभव, अमिताभ आणि अमोघसिद्धी हे पाच ध्यानी बुद्ध होत. बौद्ध धर्मग्रंथ हे आगम म्हणजे त्रिपिटक आणि इतर वाङ्मय अशा दोन गटांत विभागलेले आहेत. अशी कितीतरी माहिती यात आलेली आहे.

सखोल संशोधनाच्या चिंतन आणि मननातून साकारलेला हा ग्रंथ वाचनाचा आनंद तर देतोच, शिवाय या विषयानुसार आलेली स्थळे, वृक्षे यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही देतो. पावन स्थळांना भेट देण्याची लालसा निर्माण करतो. बौद्ध धर्म या विषयातली जाण वृद्धिंगत करतो. ज्ञात माहिती आणि अज्ञात माहिती यात किती अंतर असू शकते त्याचा उलगडा हे पुस्तक वाचल्यानंतर होतो. तसा हा विषय मोठा आहे. त्याची भुरळ पाश्चात्य देशानाही डावलता आलेली नाही.या विषयाच्या अभ्यासकांना हे पुस्तक गाईड म्हणून नक्कीच उपयुक्त ठरु शकेल असा विश्वास वाटतो. त्यातला सुबोधपणा हे लेखिकेचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. जवळपास पंचवीस शिल्पचित्रे यात दिलेली आहेत.त्यांचा ठळकपणा आणि स्पष्टता दृष्ट लागावी अशी आहे. बोधिवृक्षांचे रंगीत फोटो दिल्याने ते ओळखण्यात सुलभता आली आहे. मुखपृष्ठावरही बोधिवृक्ष आहे.




**बुद्ध परंपरा आणि बोधिवृक्ष**
**हेमा साने**
**किंमत १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

'आयदान' प्रथम वाचलं ते साल असावं २००४. पटकन लक्षात यावं असं काही ते नाव नव्हतं. या शब्दाशी तसा परिचयही नव्हता. मुखपृष्ठ पाहूनही त्याचा उलगडा झाला नव्हता. उलट विणलेल्या टोपल्याच्या विणीनं कुतूहलाचा गोफ अधिक घट्ट केला होता. मात्र पुस्तक वाचलं आणि सारीच वीण लक्षात आली. एकेक काडी वेगळी केल्यासारखी. दोन अर्थांची गुंफण या नावाभोवती आहे. आय म्हणजे आई आणि तिने दिलेलं संस्काराचं अमृतदान, तर दुसरा आहे वारसा, आईकडून आलेला, करंडी-टोपली विणण्याचा प्रयत्न म्हणजे आयदान. एक वेगळ्या प्रकारचं चरित्र, चरित्र प्रवास, एका लेखिकेचं जीवन. लेखिकेच्या भाषेत सांगायचं तर आत्मकथन! एकटीच हे निमित्त. ते आहे आपल्यासोबतच्या सगळ्या माणसांचं, विशेषतः स्त्रियाचं! गावाचं, परिसराचं, नात्याचं, नात्यापलीकडची असूनही नात्याइतकीच जवळीक वाटावी अशांचं.

**आयदान**

**उर्मिला पवार**




आत्मकथन हा वाङ्मयप्रकार तसा कुतूहलाचा आणि उत्कंठेचा. त्यावेळी अशा आत्मकथनांची जणू मालिकाच सुरू झाली होती. दया पवारांचं 'बलुतं' आलं. पाठोपाठ 'उपरा' आलं. 'उचल्या', 'कोल्हाट्याचं पोर', 'अक्करमाशी' अशी यादी वाढतच गेली. एक नवा प्रवाह सुरू झाला. वाचकांच्या हाती नवा अनुभव, नवं विश्व शिदोरीच्या रूपानं आलं. त्यावर भलंबुरं कराय ते समीक्षकांनी ठरवायचं होतं. वाचक म्हणून मात्र हे काहीतरी नवीन रसायन हाती आलं होतं. यातली बहुतेक पुस्तकं धुंडाळून ती प्रकाशात आणायची खटपट केली ती 'ग्रंथाली'नं. त्यामुळे प्रत्येक वेळी आपल्याला नवीन काहीतरी वाचायला मिळणार अशी अपेक्षा ग्रंथालीकडून मनात आपोआप रुजली. तर ही आत्कथनं जणू एक वादळच ठरली. पण ती बहुतेक होती ती पुरुषांच्या अंगानं जाणारी. त्यात स्त्रीचरित्राचा भाग नव्हता असं नव्हे, पण ती पूर्णार्थानं स्त्री चरित्रं नव्हती. बेबी कांबळे यांचं 'माझ्या जल्माची चितरकथा' त्या प्रवाहात आलं आणि स्त्री म्हणून आलेले भोग काय असतात याची वर्गवारी स्पष्ट झाली ती दोन दोन स्तरावर. एक स्त्री म्हणून आणि दुसरी जातीच्या कातीची. त्यानंतर आलं ते 'आयदान'. उर्मिला पवार नावाच्या स्त्रीचं आत्मकथन. साहित्याचा प्रवाह रुंद करणारं आत्मकथन!

आयदान या आत्मकथनात आलेली वर्णनं, व्यक्तिचित्रं, माणूसपण, भावभावना यांचा स्तर वाचकाच्या मनाला उजवा वाटला. यात केवळ स्वतःवरील अन्याय, अत्याचार, दुःख, वेदना वा भावभावनांची कोंडी यांचा आक्रोश नसून प्रत्येक प्रसंगाला सामोरं जाणं आहे ते समजूतदारपणाचं, स्वतःला तपासून पाहण्याचं. त्यामुळे आत्मकथनाला स्वतःची मर्यादा असूनही त्याचा आवाका कक्षेबाहेर झेपावणारा दिसतो. कथन एका स्त्री लेखिकेचं आहे तरी ते एकांगी नाही. आपल्यासोबत ते समाजमनावर चढलेली पारंपरिक कात ओरबाडून काढताना दिसते, आपल्यात झालेल्या परिवर्तनाचा शोध घेताना दिसतं. म्हणूनच असं साहित्य मोठं ठरतं. त्याच्या आवृत्त्या पुन्हा पुन्हा वाचकांच्या भेटीला येतात. लाटांनी किनाऱ्याकडे धाव घेत यावे तशा. माझ्या हातात आलेली आवृत्ती सहाव्या पुनर्मुद्रणाची असून तिचा दिनांक आहे २५ डिसेंबर २००८.

कोकण म्हटला की निसर्गाची कृपादृष्टी लाभलेला इंद्रवनाचा भूभाग. त्यातल्या रत्नागिरी-फणसावळेच्या झोपडीवजा घरातून सुरू झालेला हा 'इमल'चा प्रवास आहे. मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण वडिलांच्या आग्रहानं पार पडल्यानंतर आपल्या प्रिय व्यक्तीशी संसार थाटते. मुंबईत स्थायिक झाल्यानंतर एमएपर्यंत शिक्षण घेणं, पतीची साथ त्यासाठी मोलाची ठरते. नोकरी करते. सामाजिक चळवळीत सहभागी होते. खेळ-नाटकाच्या मैदानाला फेरी मारून येते. म्हटलं तर सुखी आयुष्य. वरवर सहज कुणाच्याही वाट्याला यावं असं आयुष्य म्हणता येईल. पाणी पाटातून वाहतं, निसर्गातून वाहतं, नदीच्या पात्रातून वाहतं प्रत्येकाचा वेग, आवेग आणि आवाका वेगळा असतो. 'हे पाणी वेगळं आहे' असं म्हणतात ते का? खरोखर काहीतरी वेगळेपण असल्याशिवाय त्याची दखल कोण घेणार? वाचकांनी ती नोंद घेतली आहे. निघालेल्या आवृत्त्यांवरून आपल्यासमोर आहेच. वाचक उगाच कुणावर प्रेम करत नाही. साहित्य त्याला प्रेमात पडायला भाग पाडतं. 'आयदान'ने ते प्रेम मिळवलं आहे.

या आत्मकथनाचं प्रयोजन काय, आपलं जगणं वाचकांच्या समोर उघड करण्याचं कारण काय, असा साधा प्रश्न मनात डोकावला. खोडसाळपणा म्हणतात तो असा. लेखिका परिस्थितीच्या भट्टीत चांगल्या भाजलेल्या. स्वतःच्या भूमिकेशी ठाम असलेल्या. मध्यंतरी नागनाथ कोत्तापल्ले यांनी म्हटलं होतं, 'लेखकानं लेखन करताना निश्चित भूमिका घ्यावी.' त्याचा प्रत्यय आला. लेखिका म्हणतात, 'अहो, आपण जगतो, मोठे होतो म्हणजे काही एकटेच नसतो. आपल्यासोबत आपला समाज, आपली माणसं, आपल्या आजूबाजूची माणसं, परिसर हे सारे असतात. ते आपल्याला मोठं करतात, अनुभवानं समृद्ध करतात. आपली जडणघडण करतात. त्यांचं ऋण आपण मान्य करायला नको का? बरं, मी एक स्त्री आहे, गरिबीच्या भट्टीत भाजून आले. पण माझ्याभोवती अशा अनेक स्त्रिया होत्या; त्यांचं जगणं, जगण्यासाठी चाललेली त्यांची धडपड,

# ग्रंथपान

## हुमान
संगीता उत्तम धायगुडे




हुमान म्हणजे कोडं. जगण्याचं, जिद्दीचं, कर्तृत्वाचं आणि स्वतःला सिद्ध करण्याचं. ते सोडवताना होणारी दमछाक व्यक्तिगणिक वेगवेगळी असू शकेल इतकाच काय तो फरक. यात स्त्रीच्या पदरात पडलेलं दान पुरुषांना मागं टाकणारे असतं हे मात्र नक्की. माहेर ते सासर, शिक्षण ते संसार, आईबाप ते सासूसासरे, पती–मुलंबाळं या सगळ्यांच्या चक्रव्यूहात सापडलेल्या जगण्यातून काही उरलं तर स्वतःचं करिअर, व्यक्तिमत्त्व. त्यात ताणतणाव, मानापमान, टक्केटोणपे यांचे घाव वेगळेच. होणारा कोंडमारा, असहायता आणि तरीही आपल्या माणसांसाठी जगण्याची धडपड. हे सारं वाट्याला आलं नाही अशी स्त्री अपवादात्क भाग्यवान! अशा भाग्यवानांच्या पंक्तीला बसणाचं भाग्य लेखिकेच्या पदरात पडलेलं नव्हतं, तरीही हार न मानता अपवादात्मक ठरेल असं स्वतःला सिद्ध करणारं कर्तृत्व दाखवण्याची जिद्द पदरात पडलेली होती असं या आत्मकथनातून प्रत्ययाला येतं.

आई–बापाच्या आग्रहापुढे मान झुकवून दहावीला रामराम केलेली लेखिका संसाराच्या गाड्याला जुंपली जाते, तिच्या मनाचा, इच्छा–आकांक्षाचा विचार हिशोबात न घेता. खाकी वर्दीशी इमान राखलेल्या माणसाशी संसार करताना त्याची चकाकणारी, पॉलिश कुठे मलीन होणार नाही यासाठी तारेवरची कसरत करत राहते. माहेरच्या संस्काराच्या कवचकुंडलाच्या जोरावर सासरच्या झळांची झळ संसाराला न लागू देता माणुसकी आणि आपलेपणात भिजवून घेते. स्वतःचं वेगळेपण न दाखवता स्वतः काहीतरी करू पाहते. राजा राणीचा संसार सुखाचा राहील या स्वप्नाला साकार करण्याचा ध्यास ठेवून राहिलेलं शिक्षण, शिवणकाम यावर लक्ष केंद्रीत करते. स्वतः डिझाईन करून शिवलेले कपडे एक्पोर्ट करण्यापर्यंत मजल मारते. परंतु संसारसुखाच्या वेलीवरचा गंध अंगात पाझरत असतानाच आधाराचा वृक्षच कोसळतो. आप्तांचे काटे, वास्तवाचा खडक आणि असहायतेचं तप्त ऊन पदरात बांधलं जातं. तरी ती परिस्थितीसमोर गुडघे टेकण्याचं नाकारते. आपल्या जिद्दीला कसोटीच्या मशालीवर धरते, कस लावण्यासाठी. पोटी उमललेल्या फुलांना सावली देण्यासाठी आकांतानं उन्हातान्हाला सामोरी जाते. आणि एक दिवस एमपीएससीची परीक्षा उत्तीर्ण होऊन आपल्या कोसळलेल्या परिस्थितीलाच नापास करते. असा हा लेखिकेचा अथक जीवनसंग्राम आहे. एका हुमानची सोडवणूक आहे. आपणच आपल्याला सिद्ध करण्याच्या ध्यासाचा प्रवास आहे. ज्याचा शेवट हा समाधानाला सलाम करणारा आहे. कोडं सोडवल्यानंतर वाटतं, ते समाधान काय असतं हे सोडविल्याशिवाय कसं कळणार?

आत्मकथनात कोंडमारा आणि दुःखाची भडकस्वरूपाची मांडणी करून स्वतःला सहानुभूती मिळवण्याची शक्यता अधिक असते. परंतु लेखिकेनं दाखवलेला संयतपणा परिपक्वतेची ग्वाही देतो. काय काय करावं लागलं याचं रडगाणं न गाता काय काय करता येतं याची वाट शोधण्यावर भर दिला. माणुसकी, आपुलकी, परकेपणा, निष्ठूरपणा, बेफिकिरी, स्वार्थ आणि अज्ञान अशा भावनांचे अनेक कंगोरे ओरखडे न ओढता उलगडून दाखविलेले आहेत. पोलीसखात्याचे साह्य करण्याचे मोठेपण, मंत्रालय, शिक्षणखाते, आप्त यांचे आलेले कटू अनुभव, तर आपलेपणाने जवळ आलेले मित्र–मैत्रिणी यांची वर्णनं माणसांच्या वागण्याची तऱ्हा दाखवितात. सहन करण्याची परिसीमा आहे पण त्यात कुणाविषयी द्वेष नाही. जळते निखारे पायी तुडवत जाताना कुणावर त्याचे खापर फोडले नाही. मुलगी, सून, पत्नी, आई या भूमिकांवर आपला ठसा कसा उमटेल हेच ध्येय ठेवलं. मुलांच्या भवितव्याला प्राधान्य देताना, आपले अस्तित्व टिकवू पाहताना आपल्यातल्या आईपणाला कुठे उणेपण येऊ दिलं नाही. हाती आलेल्या अधिकाराचा उपयोग सत्कारणी लावला तो भल्यासाठी, न्यायासाठी. निर्भीडपणे, सचोटीनं आणि निःस्वार्थीपणानं. आपण आपल्याशी ठाम असू, ध्येय गाठण्याचा निर्धार मनाशी पक्का असेल, तर आपल्याला झुकवू पाहणारेच आपल्यासमोर कसे झुकतात याचं उदाहरण म्हणजे 'हुमान' हे आत्मकथन.

लेखनात आलेला प्रगल्भपणा लेखिकेच्या प्रवासाला आणि प्रयत्नाला साजेसा आहे. निवेदन फ्लॅशबॅक पद्धतीनं केलेलं असल्यानं एकाच वेळी ते भूतकाळ व वर्तमानकाळ अशा दोन पातळ्यांवर चालते. भाषाही सहज आहे. ओघवती आहे. त्यामुळे लेखन एकसुरी न होता ते वाचनाचा तरल आनंद देतं. वाचत असताना लेखिकेच्या यशाचं, प्रयत्नाचं आणि मोठी स्वप्नं सत्यात उतरवण्याचं कुतूहल कायम मनात रेंगाळत राहतं. आणि लग्नाच्या वेळी दहावीपर्यंत शिक्षण असलेली, तीही दुसऱ्यांची पुस्तकं वापरून अभ्यास करणारी, अशी मुलगी पतीनिधनानंतर एमपीएससीची परीक्षा उत्तीर्ण तर होतेच, त्याची मार्गदर्शिका होण्यापर्यंत झेप घेते. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर जर्मनीला जाते. या आत्मकथनाचं प्रयोजन हे स्वतःचं थोरपण सांगण्यासाठी नव्हे तर, इतरांना प्रेरणा मिळावी यासाठी लेखिकेनं मनातल्या भावनेचं सोडलेलं मौन आहे, हे लक्षात घेण्यासारखं आहे.

- **मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

''जेव्हा कुणी आपलं काही वाईट करेल तेव्हा ते वाळूत लिहावं; कारण क्षमाशीलतेचा वारा सुटला की ती अक्षरं पुसून जातात. पण कुणी आपल्यासाठी काही चांगलं केलं तर ते मात्र नेहमी कोरावं. कारण मग कोणताही वारा ती अक्षरं पुसून टाकू शकत नाही.''

''भरजरी कपडे आणि दागिने हे एक तर राजघराण्यातील माणसं शोभेसाठी घालतात किंवा मूर्ख माणसं मूर्खपणा झाकण्यासाठी परिधान करतात. मात्र साधेपणा हीच सज्जनाची शोभा असते; हे कधीही विसरू नका, बाईसाहेब!''

''स्वतःच्या मनाचा सल्ला न घेता आणि स्वतःवर विश्वास न ठेवता आपण इतरांचंच ऐकत बसलो तर आपल्या हाती शब्दांचे बुडबुडेच लागतात.''

''आधी तुम्ही स्वतःचा शोध घ्या. आपण कोण आहोत याचा तपास लावा. तुम्हाला तुमचा स्वतःचा पत्ता लागला, की मग तुम्ही देवाचा पत्ता शोधायला सुरूवात करायला काहीच हरकत नाही.''

ही वाक्ये आहेत 'बोधकथा – भाग एक आणि भाग दोन' या पुस्तकांमधील. नमुना म्हणून दिली आहेत, शितावरून भाताची परीक्षा या न्यायाने तशी ती प्रत्येक कथेत आहेत. मात्र प्रत्येकीने स्वतःचे वेगळे आशयपण राखले आहे. आणि ते राखण्याचे भान लेखकाने जपले आहे. त्यामुळे कथांचे वेगळेपण जसे जाणवते तसे लेखकाचे कसलेलेपणही जाणवत राहते. लेखक स्वतः मुरलेले गझलकार म्हणून उभ्या महाराष्ट्राला परिचित आहेत. कथा, विनोद, लेख या इतर लेखनातही त्यांची कलमदानी निरामयवृत्तीने विहार करीत असल्याची नोंद रसिक वाचकांच्या वाचनकप्प्यात यापूर्वीच झालेली आहे. या बोधकथा त्यांच्या लेखनप्रवासाचा वेगळा टप्पा. काहीसा परिचित; काहीसा अपरिचित. पण छान जमलाय. खरं तर असा सलगपणे प्रयोग करणे, तीही पुनरावृत्ती वा कंटाळवाणेपणाच्या सावलीला टाळून, अवघड प्रवास आहे. पण लेखकाने तो प्रवास सुखरूप पार पाडला आहे याचा प्रत्यय या कथा वाचताना येतो. बरे, कथा काही एक–दोन नाहीत, तर प्रत्येकी सव्वाशे म्हणजे अडीचशे कथा. म्हणजे एकूण अडीचशे मैलांचा प्रवास केल्यासारखे. तरीही वाचताना ना दमछाक होते ना रंजकता हरवते. उलट, सुखावल्याचीच भावना मनात तरळत राहते.




'बोधकथा' या शीर्षकावरूनच त्यांच्या आशयाची कल्पना वाचकाला येणे स्वाभाविक आहे. त्यामुळे इसापनीती आणि पंचतंत्र यांची आठवण येणे अपरिहार्य आहे. सदरच्या कथांचा बाज तसाच असणेही अपरिहार्य आहे. त्यांचा आवाका मर्यादित ठेवून आशयाला प्राधान्य देणे, आपल्याला जे सांगायचे आहे ते कमीत कमी शब्दांत चपखलपणे व्यक्त करणे महत्त्वाचे असते. त्यातील रंजकता आणि चतूरपणाही सांभाळावा लागतो. त्या निकषांचा साज या कथांनी सहजपणे स्वीकारलेला आहे. परंतु कथांमधील भाबडेपणा आणि काहीतरी सांगायचा सोस म्हणून पाने, फुले, झाडे, वारा, पाणी, डोंगर या निसर्गातील घटकांचे मानवीकरण करण्यावर अधिक भर देण्याऐवजी आपल्यातील माणसे निवडण्यावर लेखकाने अधिक भर दिला आहे. बुद्ध, विवेकानंद, रामशास्त्री, राजाभोज, शिकंदर, अब्राहम लिंकन, गांधीजी, शास्त्रीजी अशा अनेक थोर व्यक्ती या कथांमधून वाचकाच्या भेटीला येतात. झेनकथा, बुद्धकथा यांचा बोध येतो. गुरू–शिष्य यांचे संवाद येतात. पौराणिक–ऐतिहासिक दाखले येतात. ते सारे दैनंदिन जीवनाचे सार, आचरण, संकेत, दया–औदार्य, मोठेपणा, डोळसपणाचे अंजन हळुवारपणे पापणीच्या कडेवर रेखतात. वाचकाच्या अनुभवाला समृद्ध करतात. प्रत्येकीत बोधतत्त्वाचा पारा कमीअधिक प्रमाणात भरलेला आहे. त्यामुळे या कथा वयाच्या सिग्नलपाशी न थांबता आबालवृद्धांना आनंद देणाऱ्या आहेत. कुठलेही पान उघडा आणि वाचायला सुरुवात करा, आपोआप सुरुवातीपासून वाचण्याचा मोह होईल अशा या कथा. कुठेही केव्हाही संदर्भ किंवा दाखला म्हणून सांगता येतील अशा सहजसोप्या भाषेतील आटोपशीर कथा. रंजकतेच्या दोरीवरून चालताना नकळत तोल सांभाळताना तत्त्वाची काठी हाती दिलेल्या कथा. लहान लहान एकपानी कथा, सुटसुटीत व स्वतंत्र कथा.

या धावपळीच्या काळोखात सापडलेल्या जीवनाला प्रकाश देणारा दिवा आणि अवकाशाचा वेध घेणाऱ्या अँटिना बसविलेली हेल्मेट घातलेला, विस्मयीत नजरेने पाहणारा मुलगा भाग एकच्या मुखपृष्ठावरून भेटीला येतो. तर भाग दोन पुस्तकावरील पाने, फुले, मयूरपक्षी यांनी बहरलेला बोधवृक्ष आपले लक्ष वेधून घेतो. त्याखाली बसलेला ध्यानमग्न तपस्वी. बाजूला आज्ञातुल्य शिष्यंद्वय आश्रमाची कल्पना साकारतात. दोन्ही मुखपृष्ठे आकर्षक झाली आहेत.

- **भाग १ – मूल्य १२० रु. सवलतीत ७० रु.**
- **भाग २ – मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**



# ग्रंथपान

''१९८४, मार्च महिन्याच्या सुमारास दर आठवड्यात १६००० लोक मृत्युमुखी पडत होते! उपासमारीने हैराण झालेल्या कृश लोकांचे लोंढे अन्नाच्या शोधात मैलोन्‌मैल चालत जाऊ लागले होते.''

''१९९४, जून. रूवान्डातून वाहत आलेल्या कागेरा नदीच्या पाण्याला खूप जोर होता. मार्क त्यातून वाहत व तरंगत येणारे मृतदेह मोजत होते. प्रत्येक मिनिटाला दोन ते तीन मृतदेह दिसायचे. बरेचसे नग्न किंवा तोकड्या कपड्यातील. काहींचे हात-पाय बांधलेलं, तर काहींचे तोडलेले!

''ही जी परकीय मदत येऊ घातलीय, ती आपण कशी खर्च करतो यावर कोणी लक्ष ठेवणार नाही. मला वाटते मुक्तिआघाडीला चिरडून टाकायची ही आयती संधी चालून आली आहे.''

## शापित भूमी

उमेश कदम




ही आहेत विदारक सत्य सांगणारी काही वाक्ये, आफ्रिकेतील परिस्थितीची तोंडओळख देणारी. प्रत्यक्ष संपूर्ण पुस्तक वाचल्यानंतर ही परिस्थिती किती भयावह आहे याचे चित्र समोर दिसू लागते. मन अस्वस्थ होते. आणि आपणच आपल्याला विचारू लागतो, जगाच्या नकाशावर एखादा प्रदेश असाही असू शकतो? पण आहे, हे वास्तव विसरता येत नाही. हे वास्तव जगासमोर येऊ नये म्हणून जागरूक असलेली हुकूमशाही सत्तापिपासू राजवट पाहिली तर, माणुसकीला कंलक लावणारी ही क्रूर यंत्रणा राबवणारी शक्ती माणसांची आहे यावर विश्वास कसा ठेवायचा हाच प्रश्न पडतो. उपासमारी, दारिद्र्य, दुष्काळ, अत्याचार, क्रूरता, जुलूम, लैंगिकशोषण, कत्तल आणि हुकूमशहांची मनमानी हे सारे माणुसकीला काळिमा फासणारे वास्तव या पुस्तकात उघड करून दाखवलेले आहे.

या पुस्तकात एकूण १६ कथा आहेत. या कथा कथेच्या आकृतिबंधाने नटलेल्या आहेत इतकेच. मुळात तो आहे तप्त लाव्हारसात न्हालेला इतिहास. मनाला पिळवटून टाकणारे एक वास्तव. यात इदी अमीन, मोबुटू, एफडब्लूडी क्लार्क, अब्दी रशीद, निमेरी यांसारखे अनेक क्रूर हुकूमशाही राजवटीचे राक्षस नरभक्षकासारखे वागताना दिसतात. अत्याचाराला कुणी सामोरे जावे याला कुठलाच विधिनिषेध नाही. ना वयाचा ना स्त्री-पुरुष भेदाचा. अंगुझा कार्ल, ए बाँड, फना, एमा मॅक्क्युन, डॉ. सलिमा, मुचेरी यांसारख्या अनेक व्यक्ती भोग, अत्याचार, जुलूम आणि गरिबीचे प्रतिनिधित्व करतात. तर जीवाचा धोका पत्करून या परिस्थितीला वाचा फोडू पाहणारे मार्क टेम्पलटन, फिलीप व्हॅन होवर, मोहंमद, फ्रेड व टायटस यांसारखे अनेक साहसी पत्रकार भेटतात. नेल्सन मंडेला यांचीही भेट होते. हिरे, खनिजसंपत्तीची संपन्नता आणि उपासमारी व रोगराई यांची लढाई हेसुद्धा पात्रांप्रमाणेच कथेचा कॅनव्हास आपल्या ताब्यात घेत वाचकाना खिळवून ठेवतात. ही सगळी पात्रे वेगवेगळी परिस्थिती आणि माणसांचे हरवलेले, भरडलेले, आणि भरकटलेले जीवनचक्र समोर ठेवून वाचताना थक्क करतात.

लेखकाला आंतरराष्ट्रीय रेडक्रॉससाठी काम करण्याच्या निमित्ताने आफ्रिकेत जाण्याची संधी मिळाली. माणसे, जनजीवन, चालीरीती, राजकारण आणि भौगोलिक-सामाजिक वातावरण यांच्याविषयी असलेल्या कुतूहलापोटी त्यांनी सजगतेने अभ्यास केला. गुलामगिरीच्या रक्तरंजित खुणा इतिहासाच्या पानांतून चाळून काढल्या. पत्रकाराच्या रूपाने मुलाखती घेतल्या. काही अनुभव स्वतः घेतले. त्यातून मनाला अस्वस्थ करणारे वास्तव वाचकांसमोर मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न या कथांरूपात केला. पात्रांच्या माध्यमातून अनेक विषयांना आकार देताना तटस्थता राखली. तरीही त्यात अस्वस्थता, तळमळ, संवेदनशीलता आणि संयमितपणाचा प्रत्यय येत राहतो. लेखकाचा 'शापित भूमी' हा वाचकाच्या मनाचा दीर्घकाळ ताबा घेणारा कथासंग्रह त्यांच्या आधीच्या पुस्तकांप्रमाणेच वेगळेपण घेऊन आला आहे आणि एका लेखकाचा वारसा तितकाच समर्थपणे पुढे प्रवाहित झाला आहे, याचा विश्वास हा कथासंग्रह वाचकाला देतो हे आणखी विशेष! दहशतवादी आणि काळावर उमटलेली हाताची मुद्रा दाखवणारे मुखपृष्ठ शीर्षकास साजेसे झाले आहे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**



# ग्रंथपान




मला वाटतं त्यावेळी जर
कागदावर लिहिलेली एक कविता
कुठूनतरी उडत उडत सूर्यावर पडली,
तर तो पुन्हा पेटेल, पुन्हा पेटेल

कवितेच्या उर्जेविषयी वाटणारा हा विश्वास हा फक्त कवीच दाखवू शकतो. ही कविता त्याला शब्द देते, विझत्या नसांमध्ये जेव्हा वेदनेचे डोळे मिटू लागतील तेव्हा त्यांच्यासमोर त्याची सखी असेल. आत्म्याला श्वास फुटण्याचा भरवसा कविता देते. कवी निवारा शोधण्यासाठी कवितेच्या अंगणात उभा राहतो. मात्र तिच्या निर्मितीविषयी बोलताना हळवा होतो.

क्षणावर बसलेल्या कवितांना
फुलपाखरांसारखे जाळीत पकडायचे
मग काट-कूट करून आकार द्यायचा
अन् त्या टाचून ठेवायच्या अल्बममध्ये, हा जुलूम नाही तर काय?

कवी आत्म्याला सुंदर शरीर देण्याच्या विचार करतो, ज्यावर सुरकुती नसेल, डाग नसेल, त्याला जखम होणार नाही की दाह-दुःख शिवणार नाही. आणि त्याला सापडतं असं शरीर, कोऱ्या कुंवाऱ्या सकाळचं शरीर. त्याला ऐकू येतं दाणे भरलेल्या कणसांच्या शेतात गप्पगार पडलेल्या पायवाटेचं स्वगत. ती म्हणते, माझी कूस अशी तुडवली नसती वाटसरूंनी जर, तर माझीही मुलं नसती का आतावर तरुण झाली? त्याच्या नजरेला दिसतो पावसासाठी झुरणारा खैरू, जो आपल्या शेतातली सुकी माती सुरकुतलेल्या हातात धरून वर पाहतो भिजलेल्या डोळ्यांनी. लॉनमध्ये पिवळी गळून पडलेली पानं पाहून त्याला वाटतं खंगलेला पिवळा चंद्रही कदाचित असाच सुकलेल्या पानांसारखा लॉनमध्ये उतरेल, तरंगत तरंगत. सरदार सरोवरामुळे होणारे विस्थापित, शहरात फिरणाऱ्या रणगाड्यांनी भयकंपित झालेली सून, दंगलीच्या आगीत भस्मसात होणारे प्रार्थनास्थळातले भाविक, संगणकाच्या दहशतीमुळे काचेच्या बंद कपाटात उसासे टाकणारी पुस्तके, कचरा करणारा पिंपळ आणि त्यावरील कावळे-चिमण्या. अशी विविध शब्दचित्रं, भावभावना, कल्पना, संवेदनशील मनाने टिपलेली आहेत, यात सुख-दुःख,वेदना,आशा-अपेक्षा,नात्यातलं हळुवारपण, प्रेम, जवळीक, उदासपण अशा अनेक छटा इंद्रधनुष्यातल्या रंगासारख्या भेटीला येतात. नेमकेपणात साठवलेलं असूनही त्यांचं व्यापकपण जाणवत राहतं.

गुलजारसाहेब हे आपणास परिचित आहेत ते रुपेरी झगमगाटामुळे. चित्रपट आणि गाणी यांच्या तरल, संवेदनशील अनुभवामुळे ते लक्षातही राहिले. ते कवी आहेत हे ठाऊक आहे परंतु ते उर्दूमधील. उर्दूची तऱ्हा ही शेर-शायरीच्या पठडीतली. दोन ओळींत सारा सारांश सामावलेला. समजली तरी व्वा व्वा! नाही समजली तरी व्वा वा! त्यामुळे त्यांच्या कवितांशी तसा संबंध थेट नाही. तो जोडण्याचं श्रेय या अनुवादी पुलाकडे जातं. एक सुप्रसिद्ध कवी थेट आपला वाटू लागतो. तसं हे काम अवघड आहे, परंतु ते अनुवादकांनी समर्थपणे पेललं आहे. अर्थात त्यासाठी दोन्ही भाषांवर प्रभुत्व आणि प्रेम असावं लागतं. ती आत्मियता अनुवादकांकडे नक्कीच आहे. त्यांनी एका उत्तम कवीची कविता सोपेपणानं तरीही मूळ कवितेच्या लयीत वाचकांच्या समोर ठेवली, शेरोशायरीच्या मोहात न पडता मुक्तछंदातील विविधतेनं नटलेली कविता चोखंदळपणे निवडली, त्यासाठी त्यांचं अभिनंदन! या संग्रहात एक चांगलं केलं, मूळ कविता अनुवादासोबत दिलेली आहे. त्यामुळे दोन्ही भाषांतील कवितांचा आनंद घेता येतो. मूळ भाषेचा लहेजा आणि नजाकत अनुभवण्याचा आनंद वेगळाच! यासाठी प्रकाशकाना धन्यवाद द्यायला हवेत. अंबरीश मिश्र यांनी ब्लर्बवर केलेलं कौतुक किती सार्थ आहे याचा प्रत्यय कविता वाचून झाल्यानंतर येतो. मुखपृष्ठावर गुलजारसाहेबांचा फोटो दिला आहे. त्याबाबत त्यांच्याच शब्दात म्हणता येईल,

तुझं नावच पुरेसं आहे,
याहून चांगली कविता तरी काय असणार?

- **मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**



# ग्रंथपान




मृगातला हलका निळा पाऊस भिजवतो
काळ्यातांबड्या मातीचे अस्तर
गुराढोरांना, पाखरांना, बायामाणसांना फुटू
लागतात हिरवे पोपटी कोंभ

या ओळी वाचल्यानंतर लक्षात येते, ही कविता म्हणजे शेत आणि शेतकरी यांच्या नात्याचा रुजलेला कुंदा. असा कुंदा जो दुष्काळात कधी आपली नाळ सुकू देत नाही. पावसाळ्यात कधी पिकापेक्षा मान वर करून पाहत नाही. मातीशी नांदत राहणे हा त्याचा स्वभाव. आणि एकूण कविता वाचल्यानंतर हा अंदाज खरा ठरतो. कवितेला मृद्‌गंध आहे तसा कवीही या गंधाने भारलेला आहे. मातीचे चंद्र, वाढदिवस, भूमी, भूमी सावरण्याची गोष्ट, तहान, पाऊस यांसारख्या कविता पाहा. सर्वत्र हाच गंध दरवळताना जाणवत राहतो. औताने जमिनीचा पोत अलगदपणे उघडा करत जावे तशी ही कविता ग्रामीण जीवनाची एकेक कुपी आपल्यासमोर उघडत जाते. गावापासून शिवारापर्यंत पाथ धरावी तशी या जीवनाच्या अनेक पैलूंचे गवत निंदत राहते. आणि त्याचवेळी होत असलेल्या ऱ्हासाचे भानही ठेवते.

दिसतात मला बाजारातलं सामान बांधून आणल्या रद्दी पेपरातून
देशभरात बॉम्ब पेरल्याच्या खुणा गावशिवारापर्यंत वाहात आलेल्या

गढी, बापजाद्यांनी लावलेली झाडं, उजळमाथ्यानं भूमिपुत्र, पूर्णाकाठ यांसारख्या कविता भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांना एकत्रित ठेवून चितारलेल्या चित्रांचा अनुभव देतात. आणि सहज मनात येते, गड्या आपला भूतकाळच सोन्याचा होता. वर्तमानाने त्याला गंजलेल्या मनाचे शिळे रंग फासण्यातच धन्यता राखलेली आहे. त्याविषयी कवी व्यक्त होतो,

माणसाच्या सडक्या मांसाची दारू काढण्याचे हे दिवस...
काळी माती सडवून दारू काढता आली असती तर किती बरं झालं असतं!

कवी श्रीकांत देखमुख यांचा हा तिसरा काव्यसंग्रह, 'बोलावें ते आम्ही...' भरभरून बोलणारा संग्रह. मन मोकळे करणारा संग्रह. अनेक विषयांना कवेत घेणारा संग्रह. स्वतःला तपासून पाहायला लावणारा संग्रह. मुक्तछंदात असलेल्या कवितांचा, मातीपासून मातीपर्यंतचा प्रवास म्हणजे हा संग्रह, बोलावें ते आम्ही...

कोसळणारा पाऊस आणि रुसलेला पाऊस, दुथडी भरून वाहणारी पूर्णा नदी आणि कोरडे ठाक झालेल्या पात्रावर उभा राहिलेला पूल, रांगत जाणारी रेल्वेगाडी आणि लाल रंगाची एसटी, नक्षत्र, डोंगर, वारा, जनावरे, ही गावाकडची प्रतिके मातीच्या कवितांना जोडून येतात. शहरातले बकालपण आणि हरवलेले माणूसपण, तरीही चिकटून राहणारी ग्रँटरोडवरची संस्कृती, बंद पडलेल्या गिरण्या, लाललाल दिव्याच्या सुदृढ गाड्या आणि आऊटडेटेड माझा बुद्धा आपलेपणाच्या जाणिवांना सोलून काढतो. मेधा पाटकरांच्या डोळ्यातलं पाणी, सखूच्या डोळ्यात खोलवर उतरलेला चंद्र, मालवत्या दिवसाला कवटाळून झोपलेली आई, मातीपासून परका होऊ नये दुसऱ्या पिढीचा देह, भुईची निरी आलटूनपालटून उकलणारी निंदणी, यासारख्या ओळी वाचताना आपल्याला ओळीशीच रुतून ठेवतात. 'उत्कट शांततेनं मेलेल्या डुकराचं प्रेत अजूनतरी कोणाच्या पाहण्यात आलेलं नाही, आणि आठवतात मला ठेचले जाणारे तरणेबांड बैल' यासारखी खोलवर आघात करणारी वास्तववादी निरीक्षणे अंतर्मुख करायला लावणारी आहेत.

श्रीकांत देखमुख यांचा हा कवितासंग्रह तरल आणि तितक्याच उत्कट संवेदना व्यक्त करणारा संग्रह आहे. कवितांचा आवाका हा प्रदीर्घ आणि बहुआयामी आहे. विषयांचे वैविध्य आणि प्रतिभेचे हळवे धुमारे यामुळे वाचून झाल्यानंतरही कविता मनात रेंगाळत राहते. वाचकाच्या मनात घर करणारे साहित्य कोणते? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे हा संग्रह, बोलावें ते आम्ही... त्याच्याच शब्दात म्हणायचे तर,

मातीपासून परका होऊ नये दुसऱ्या पिढीचा देह म्हणून.

- **मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

'ग्रामीण बोलीचा शब्दकोश' हा नुकताच हाताशी आलेला नवीन शब्दकोश. शब्दकोश म्हटला की त्याचे मनापासून स्वागत! नवीन शब्द, नवीन अर्थ, नवीन संदर्भ या अर्थाने त्याचे मोल अधिक, म्हणून त्याचे स्वागत अगत्यपूर्वक! परंतु त्यात आलेला 'ग्रामीण हा शब्द आणखी जवळीक साधणारा, आपला वाटणारा, कुतूहलाने आकृष्ट करणारा. तशी मराठीत शब्दकोशांची संख्या आता चांगलीच बाळसं धरू लागलेली आहे. ज्ञानकोश, विश्वकोश किंवा अभिनव मराठी शब्दकोश इतकीच मर्यादित ही संख्या राहिलेली नाही. शासनस्तरावर होणारे प्रयत्न स्वागतशील म्हटले तरी अनेक नामवंत प्रकाशन संस्था याबाबत आग्रही आणि आघाडीवर आहेत. परिणामी, शब्दकोशांचे भांडार समृद्ध होत असल्याचे दिसत आहे. ही भाषा वृद्धी आणि संमृद्धीची नांदी म्हणायला हरकत नाही. नुकताच 'ग्रंथाली'च्या 'संकल्पना कोशा'चा पाच खंडांत प्रकाशन समारंभ झालेला आहे आणि आता ग्रामीण शब्दकोशाची त्यात भर पडली आहे. त्यामुळे वाचक आणि अभ्यासक त्याचे स्वागत नक्कीच करतील.

**ग्रामीण बोलीचा शब्दकोश**
**डॉ. द.ता. भोसले**




खरे तर लेखकांच्या समोर नसलेली तरीही काही मूठभरांना वाटणारी चिंता आज अनेकदा कानावर येते, ती म्हणजे त्याने वापरायची भाषा कोणती असावी? प्रमाण असावी की बोली? मूळ प्रश्न खरा चिंताजनक आहे तो, लेखकाने वापरलेली भाषा किती खणखणीत आहे याचा. ग्रामीण भाषेचाच विचार केला तरी, त्या मातीचा गंध घेऊन आलेले शब्द किती आहेत आणि बोलण्याचा ढंग किंवा ढब किती जोपासली आहे, हा विषय संशोधनाचा होऊ शकेल. हा मुद्दा उपस्थित करण्याचे कारण, आज अनेक अस्सल ग्रामीण शब्द कल्हई लावल्यासारखे झाले आहेत किंवा तांब्यापितळेच्या भांड्यासारखे मोडीत निघालेले आहेत. त्याबाबत सर्वच स्तरावर उदासीनपणा दिसून येतो. तो उदासीनपणा झटकला, आपल्याच मातीच्या शब्दांचे सोने खोदून पाहिले तर डोळे दिपून जावेत असा खजिना महाराष्ट्राच्या बोलीभाषेत सापडेल. सरोजिनी बाबर, दुर्गा भागवत, शांता शेळके यांच्यासारख्यांनी हा धांडोळा घेतला, आणखीही काहीजण घेताना दिसतात. परंतु त्यांच्या हाताला जे लागत आहे त्यापेक्षा मातीआड जाणाऱ्या शब्दांची संख्या प्रचंड आहे. आणि त्यावर परकीय भाषेची माती आपणच आपल्या हाताने ढकलीत असल्याने दोष तरी कुणाला द्यायचा? अशा प्रसंगी अशा शब्दकोशाचे अप्रूप वाटले नाही तरच नवल!

डॉ. द.ता. भोसले हे मराठी साहित्यात मानाचे स्थान असलेले व्यक्तिमत्त्व. ग्रामीण भाषा चंद्रभागेच्या नितळ आणि पवित्र पाण्यासारखी नसानसात भिनलेली. याचा प्रत्यय त्यांच्या पहिल्याच कांदबरीत, 'मी आणि माझा बाप'मध्ये आला होता. पुढे त्यांनी या क्षेत्रात केलेल्या दमदार लेखनवाऱ्या आणि केलेली प्रवचने याची नोंद चोखंदळ वाचकानी कधीच घेतलेली. आता त्यांनी समृद्ध केलेला कोश ही त्याची पुढची पायरी म्हणायला हवी. भाषेविषयीचं प्रेम म्हणायला हवे. भाषा टिकावी यासाठीची आंतरिक तळमळ म्हणायला हवी.

हा कोश साकार करण्याचा ध्यास आणि त्यापायी घेतलेले परिश्रम याबाबत त्यांचे मत अतिशय जिव्हाळ्याचे दिसून येते. आपल्या मातीत असलेले हे अस्सल बावनकशी सोने आपण का मातीआड जाऊ द्यायचे? भाषा समृद्ध करायची तर तिचा शब्दसंग्रह विपुल असायला हवा, त्याच्या वापरासाठी आपण आग्रही असले पाहिजे, ज्ञानभाषा म्हणून तिचा समाजाला उपयोग झाला पाहिजे, त्या भाषेविषयीची अस्मिता आणि आत्मीयता ती भाषा बोलणाऱ्या मंडळींकडे असली पाहिजे, आणि त्या भाषेत उत्कृष्ट दर्जाची साहित्यनिर्मिती झाली पाहिजे. डॉ. द.ता. भोसले यांची किती साधी तरीही रास्त अपेक्षा भाषेच्या वृद्धीच्या तळमळीतून व्यक्त झाली आहे.

हा कोश साकारण्यासाठी द.ता. यांनी ज्या साहित्य आणि साहित्यकारांचा मागोवा घेतला आहे त्यांचा आणि आपला परिचय नाही असे नाही, परंतु आपण डोळसपणे त्यांची दखल घेतली नाही असेच म्हणावे लागेल. ज्ञानेश्वर माउली, संतकवी एकनाथ, तुकाराम, संत निळोबा, रामदास, मोरोपंत, वामन पंडित, मुक्तेश्वर, होनाजी बाळा, शाहीर प्रभाकर, शाहीर रामजोशी, सरोजिनी बाबर यासारखी थोर मंडळी ज्यांनी या अस्सलतेचा पाया रचलेला आहे. आपल्या साहित्यात आवर्जून त्याचा उपयोग केला आहे. डॉ. भोसले यांनी जागृत आणि जागरूकपणे या पायापर्यंत जाण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. सारेच या ग्रंथात सामावलेले आहे असा दावा ते करीत नाहीत, परंतु जे आहे त्याचे मोल कमी नाही. एक शब्द घेतला आणि त्याचा अर्थ सांगितला, असे या कोशाचे स्वरूप नाही. सोबत ते त्याची उत्पत्ती स्पष्ट करतात. त्याची व्याप्ती काय आहे तेही सांगतात. त्यामुळे त्याचे स्वरूपसंदर्भ कोशासारखे झाले आहे. हे कष्ट सोपे नाहीत. हा संशोधनाचा विषय आहे. दतांनी चिकाटीने हे संशोधन केले आहे. संस्कृत, कानडी, पारशी यांचा जिथेजिथे स्पर्श झाला आहे तिथे तिथे त्यांचीही माहिती दिली आहे, तीही वृथा अभिमानाचे सोवळे न बाळगता.

या कोशात आलेले शब्द हे शेती, शेतकरी, चलन, गावगाडा, नाती, संस्कृती, रूढी आणि परंपरा यांच्याची असलेले दृढ नाते सांगतात. बरेच शब्द आपल्याही कानावरून जातात, या ना त्या कारणाने. जसे मराठा आरक्षणात 'कुणबी', भाववाढीच्या कारणावरून कांदा म्हणजे 'कृष्णावळ', घाईगर्दीत लग्न उरकून घेताना मागे पडलेले 'बोहले', खेकटे, घोरडदेव, चांगभले, जोहार, यळकोट, उजवणे, कलगीतुरा, तिरसिंगराव, धटिंगण, पदरमोड, बाशिंग, मलिदा, रामप्रहर असे आणखी बरेच शब्द. ज्यांची या संग्रहाने नोंद घेतली आहे. आपल्याला समृद्ध करायचे तर नुसता चाळून नव्हे तर संग्रही असावा असा हा संग्रह आहे.

अस्सल सोन्याची नाणी मुखपृष्ठावर दाखवून या कोशाची तुलना त्या खजिन्याशी केलेली आहे. ही कल्पकता कोशाइतकीच सुंदर म्हणायला हवी. यासाठी चित्रकार सतीश भावसार यांचे अभिनंदन

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**



# ग्रंथपान

''वीरभोग्याः वसुंधरा' हे आहे सैनिकांचं एक वाक्य.''

''कठीण' असा शब्दच सैनिकासमोर नसतो. असतो फक्त आखलेला मार्ग आणि त्यावरून पुढे जाणं.''

''सैनिक होण्यामागची पहिली भावना आहे प्रेम. मनात अपार प्रेम असल्याशिवाय खरा सैनिक होता येत नाही. आधी प्रेम देशावर, मग आपल्या साथीदारावर, मग स्वतःवर. हे सैनिकी ट्रेनिंगचं ब्रीदवाक्य आहे.''

''स्वतःला सर्वात मागे ठेवणं म्हणजे सैनिक होणं.''

## सोल्जर इन मी

शिल्पा जितेंद्र खेर




कादंबरीच्या नावाशी आपलं नातं सांगणारी ही वाक्ये आपल्या भेटीला येतात ती तिचे वाचन करीत असताना. अशा अनेक वाक्यांशी आपला परिचय होत जातो. सैनिक नावाशी जोडलेली कर्तव्ये आणि भावना यांचा गोफ उलगडत जातो. सैनिक होण्यातली प्रेरणा वाचकाच्या मनाला आवाहन करीत जाते. मुळातच सैनिकी जीवनाविषयी वाटणारे कुतूहल हे दोन स्तरांवर जाणवत राहते. देशाची सुरक्षा राखण्याचे इमान पार पाडताना सर्वस्वाला बंदुकीच्या अग्रावर टांगलेला गणवेषातील सैनिक आणि त्याचे शिस्तीतले जगणे. तर दुसरे असते, एक व्यक्ती म्हणून. जी असते भाव भावनांनी भारलेली, कुटुंबवत्सल व्यक्ती. त्या कुतूहलापोटी वाचावी अशी ही कादंबरी म्हणजे 'सोल्जर इन मी.'

ही कादंबरी आहे कॅप्टन भास्कर नावाच्या सैनिकाची. ज्याच्या ध्येयाच्या शब्दकोषात 'कठीण' हा शब्द नाही. तो नुसताच सैनिक नाही, तर सैनिक घडविण्यातही पुढाकार घेणारा सैनिक आहे. अहोरात्र सीमेवर दक्ष असणारा सैनिक सुटीच्या काळात तरुणांना प्रेरणा देण्याचे कार्य करण्यात स्वतःला झोकून देतो. आपल्यापरीने तरुणांना पुढे नेण्याचे, पर्यायाने समाज सुधारण्याचे कार्य करीत राहतो. यासाठी त्याला साथ आहे ती खंबीर मन आणि अतूट जिद्द यांची. माझ्या देशातील मागास राहिलेल्या घटकाला स्वतःविषयी जागृत करणे हे मला माझे कर्तव्य वाटते, हे त्याचे ध्येय. ही कादंबरी आहे कॅ. भास्करच्या सहवासात आलेल्या आणि नंतर भास्करमय झालेल्या अदितीची. सैनिकाची पत्नी म्हणून मिरविताना स्वतः सैनिकाच्या पात्रतेला सिद्ध ठरलेल्या अदितीची. सुखवस्तू आयुष्याला ठोकर मारणारी, फसलेल्या क्षणातून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेणारी अदिती भास्करच्या कार्याला पुढे नेण्याचेच बळ दाखवत राहते, त्याच्यासोबत आणि अनुपस्थितीतही. 'भास्करच्या मार्गावरून चालण्यासाठी अनेक निष्ठावान सैनिकांची आवश्यकता होती पण आधी स्वतः एक सैनिक होणं खूप आवश्यक होतं,' याचे भान जपणारी अदिती सैनिकाप्रमाणेच निष्ठेने शिबीरातून, बालसुधारगृहातून परिवर्तनाचे काम पुढे घेऊन जाताना दिसते. त्यामुळे सैनिक म्हणून कॅ. भास्कर हे प्रभावी व्यक्तिमत्त्व आहे, तरी कादंबरीत नायिका ठरते ती अदिती. आणि कथनकाची नाळ जोडली जाते ती तिच्यात निर्माण झालेल्या सैनिकाशी. ज्यामुळे ग्रंथाच्या शीर्षकाला अर्थ प्राप्त होतो. तिच्यासोबत आहे रूपा. सामान्य परिस्थितीला बुद्धीच्या जोरावर झुकवणारी रूपा. घरकाम करणारी रूपा डॉक्टरकीपर्यंत मजल मारते. भास्करच्या कार्याने प्रेरीत होते आणि पुढे त्याचे ध्येय आपले जीवनाचे ईप्सित मानून समाजकार्यात स्वतःला झोकून देते, अगदी कठीण प्रसंगातही न डगमगता कार्य करीत राहते. ही असते तिच्यात निर्माण झालेली एका सैनिकाची निरपेक्ष निष्ठा. सैनिकी दवाखान्यात, विशेषतः युद्धकाळात अहोरात्र सेवेचा ट्रे हातात घेऊन तळमळीने कर्तव्य बजावणारी नर्स इथे आपल्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देते. तिचे नाव आहे सॅली. जीवनाला कसे सामोरे जायचे याचा पाठ ती आपल्या वागण्यातून इतराना देते.

कादंबरीचा आवाका हा सैनिकीबाण्याशी जोडलेला आहे. युद्ध, युद्धात जखमी वा शहीद होणारे जवान, सैनिकी दवाखाना यांची वर्णने सुरुवातीला येतात. तशी बाह्य जगतात वावरणारी माणसे, त्यांची भौतिकतेकडे पाहण्याची मानसिकता, परस्परांना छेद देणारे स्वभाव यांचीही वर्णने चपखलपणे यात आलेली आहेत.

'मित्रमैत्रिणी सारी पाखरं फांदीवरून उडावी तितक्या सहजपणे उडून गेली.'

'मनुष्याची योग्यता त्याच्या पूर्व आयुष्यावरून ठरत नसते, तर ती ठरत असते त्याच्या मनाच्या खरेपणावर आणि आयुष्य आकाराला येत असतं मेहनत घेण्याच्या तयारीवर.'

यासारखी वाक्ये सहजपणे कथानकाच्या धाग्याची पकड घट्ट करीत जातात.

या कादंबरीच्या मुखपृष्ठावर तिरंग्याचे ठळकपण अधोरेखित केलेले असून त्याचे एक बोधचिन्ह वाटावे असा साकारलेला सशस्त्र सैनिक. त्याच्या पावलांकडे लागलेले त्या सैनिकाचे भाग्यलेणे ल्यालेले आश्वासक नयन आणि कादंबरीचे अंतरंग उलगडून सांगणारे एक इंग्रजीतले वाक्य,' इन्स्पिरेशन फ्रॉम द रीअल हिरोज.' ते साकारले आहे, भाग्यश्री फाउंडेशनने, ज्याची स्थापना स्वतः लेखिकेने पती डॉ. जितेंद्र यांच्या मदतीने केलेली आहे. शक्ती, चातुर्य, शिक्षण व सहकार्य या चतुःसूत्रीवर या फाउंडेशनची उभारणी आहे. सदर कादंबरीची जडणघडण ही त्याच सूत्राला अनुसरूनच झालेली दिसून येते. 'सोल्जर इन मी' ही लेखिकेची दुसरी कादंबरी आहे. पहिल्या कादंबरीचे नाव आहे, 'सत्यमेव जयते.' या दोन्ही नावांतील ठळकपणा लक्षात घेता लेखिकेची भूमिका अधोरेखित होते. आणि डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी हेच तर म्हटले आहे, 'लेखकाने लेखन करताना निश्चित अशी भूमिका घेतली पाहिजे.'

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

चॅनल 4 लाईव्ह

समीरण वाळवेकर




चकाकणारे सारे सोनेच असते असे नाही, कधी कधी ते सापाचे डोळेही असू शकतात. अशी म्हण इलेक्ट्रॉनिक दृश्य प्रसारमाध्यमाच्या बाबतही लागू करायला हरकत नसावी. सत्याच्या नावाखाली जगाचा चेहरा फाडून दाखविणारे हे माध्यम. लोकशाहीचा चौथा स्तंभ. प्रचंड ताकदीचे अनभिषिक्त सिंहासनधारी पहारेदार. याचा चेहरा मात्र प्रत्यक्षात मुखवटा घातलेला असतो, शुद्धतेचा आक्रोश करणारे अंतरंग गढूळही असते, याचा प्रत्यय देणारी कादंबरी नुकतीच 'ग्रंथाली'ने प्रकाशित केली आहे. तिचे नाव आहे 'चॅनल 4 लाईव्ह'. लेखक आहेत समीरण वाळवेकर. दूरदर्शनच्या अनेक वाहिन्यांवर विविध कार्यक्रमांतून वाळवेकरांना आपण अनेक वर्षे पाहत आलो आहोत. त्यांचा नादमधूर आवाज आपल्या कानात अजूनही निनादतो आहे. मात्र त्यांच्या धारदार लेखणीतून उतरलेली कहाणी मनाला सून्न करणारी आहे. वरवर कल्पित वाटणारी परंतु वास्तवाला भिडणारी कादंबरी म्हणजे 'चॅनल 4 लाईव्ह'. 'सिंहासन', 'मुंबई दिनांक' या अरुण साधूंच्या कादंबऱ्यांची आठवण ताजी व्हावी अशी कादंबरी.

ही कहाणी गुंफलेली आहे चॅनल फोरचा प्रसिद्ध पत्रकार सलील देसाई आणि त्याच्यासोबत अँकर, प्रोड्युसर म्हणून काम करणारी रावी यांच्या प्रेमसंबंधाच्या कोषाभोवती. आघाडीवर राहून पहिली बातमी आपल्या चॅनलवर झळकवण्यासाठी सलीलची धडपड आणि जिद्द. त्यासाठी मुख्यमंत्री, विरोधीपक्ष नेता आणि इतर राजकारण्यांशी चातुर्याने जोडलेले संबंध. त्याच्या जोरावर मिळविलेली हुकमी यशाच्या पावती. परंतु एका निर्णायक टप्प्यावर स्वतःच्या स्वार्थासाठी त्याने त्याच्यावर जीव ओवाळून टाकणाऱ्या रावीची केलेली फसवणूक. वरवर ढोबळमानाचे वाटावे असे मात्र हे वास्तव नाही. बुद्धिबळाच्या पटावर असावेत असे अनेक प्यादे, घोडा, हत्ती, उंट व वजीर येथे आपापली चाल खेळताना दिसतात. चॅनलला स्पर्धेत अग्रेसर ठेवण्यासाठी वाटेल ती किंमत मोजायची तयारी असलेला चॅनलचा आग्रही मालक कन्हैयालाल मोदी आहे. चॅनलरूममध्ये वेळेशी स्पर्धा करणारे आणि आपसात एकमेकावर कुरघोडी करणारे न्यूज एडिटर चंकी, एक्झिक्युटिव्ह प्रोड्युसर मिताली, प्रोड्युसर नताशा, कॅमेरामन संदीप यांसारखे सहकारी आहेत. तर दुसऱ्या बाजूला राजकारण. प्रसारमाध्यमाच्या फ्लोअरसाठी सर्वात जवळचा आखाडा. प्रसार माध्यमाला हाताशी धरणारे आणि माध्यमाच्या आहारी गेलेले राजकारणी. यात आघाडीवर आहेत मुख्यमंत्री, मदन पाटील. आपल्या इशाऱ्यावर प्रत्येकाला नाचवू पाहणारे, खुर्चीशी स्पर्धा करणाऱ्या मंत्र्यांना चूप करण्याचे राजकारण खेळणारे मुख्यमंत्री. दुसरी महत्त्वाची जबाबदार राजकारणी म्हणजे विरोधी पक्षनेते दादा सामंत, गडगंज संपत्ती असलेले. अलीकडे तयार झालेली प्रतिमा जपणारे सामाजिक कार्यकर्ते तात्या, आणि त्यांच्या जोडीला आलेले डी.के. जैन. मंत्रालय आणि राजकारणी यांच्यात सहज वावर असणारा, हिकमतीने प्रत्येकाला आपला वाटावा असा धनंजय. महसूलमंत्री आणि अर्थमंत्री, या सगळ्यांची राजकारणे व त्यापायी टोकाला जाण्याची भूमिका ही या कादंबरीची दुसरी बाजू. आणि दहा टक्क्यांमधून घर दिले नाही याचा खुन्नस म्हणून मुख्यमंत्र्याच्या खुर्चीलाच सुरुंग लावणारा महसूलखात्याचा सतीश परब. ही सगळी मंडळी कादंबरीच्या पटावर इतक्या बेमालूमपणे आपापली चाल खेळताना दिसतात, की बुद्धिबळाचा पट अपुरा वाटावा. प्रत्येकाची चाल ही स्वार्थ, मतलब, हुकूमत, अस्तित्व यांसाठीची जणू लढाईच. या सगळ्यांचे वागणे, बोलणे आणि त्याप्रमाणे कृती करणे, सारेच थक्क करणारे आहे. त्यांच्याकडे पाहताना ही पात्रे काल्पनिक वाटत नाहीत. दोन स्तरांवरील वावरणारी म्हणून वेगळी पण प्रत्यक्ष एकाच नाण्याच्या दोन बाजू वाटाव्यात इतकी अस्सल, जिवंत व्यक्तिमत्त्वे आपल्यासमोर साकारलेली दिसतात.

माध्यमाच्या निमित्ताने न्यूज बुलेटिन, न्यूजरूम, ब्रेकिंग न्यूज, फ्लोअर, रेकॉर्डिंग, अँकर, ओबी व्हॅन, सॅटेलाईट सिग्नल, फ्रिक्वेन्सी अपलिंक, डाऊन लिंक, पॅनल, काऊंट डाऊन असे शब्द सहजपणे आलेले आहेत. तर त्याचवेळी सरावाचा भाग वाटावी अशी माध्यमात वापरली जाणारी आणि राजकारण्यांना अपरिचित नसलेली भाषा सराईतपणे संवादाच्या रूपात वाचकाच्या भेटीला येते. वातावरणाचा गडदपणा अधिक गडद होत जातो. वास्तवाच्या रूपाने 'बोल्ड' तरी अपरिहार्य वाटावी अशी, रांगडेपणाला जवळची वाटावी अशी भाषा. तरी ती अनाठायी वाटत नाही. लेखकाने ओढूनताणून तिला कोंबण्याचा प्रयत्न केला आहे असे वाटत नाही. राजकारणातला रांगडेपणा आणि रंगेलपणा, तसा माध्यमात पसरलेला उथळपणा, ही त्या त्या ठिकाणची जीवनशैली लेखकाने जवळून पाहिली आहे, अनुभवली आहे याचाही प्रत्यय हे लेखन वाचत असताना येतो. काही ठिकाणी तर आपल्या भाबड्या समजुतींना धक्काही बसतो. सारे विश्व घराघरात पोहोचविणाऱ्या माध्यमाचे कुतूहल प्रत्येकालाच आहे. हे अंतर्गत विश्व वाचल्यानंतर ते नक्की शमेल असा विश्वास ही कादंबरी देते. लेखकाने कुठेही कादंबरीचा प्रवाहीपणा खंडीत होणार नाही याची काळजी घेतलेली आहे. आपण वाचन करीत असताना एखादा बोलपट पाहत आहोत तशी प्रसंगांची गुंफण केलेली आहे. प्रकरणांना क्रमांक दिलेले आहेत. या कादंबरीवर प्रत्यक्षात बोलपट काढावयाचा ठरविल्यास संवाद आणि पटकथा वेगळे लिहिण्याची गरज भासणार नाही.

खुर्ची आणि माणूस हे मुखपृष्ठावरील चंद्रमोहन कुलकर्णी यांचे चित्र विषयाच्या शीर्षकाला साजेसे झाले आहे. मान कलम झाली तरी चालेल पण खुर्ची सोडणार नाही! चॅनलची वेळ, तत्परता आणि अग्रक्रम हेच महत्त्वाचे आहे, त्यासाठी तुम्हाला स्वतःला मोडून त्या फ्रेममध्ये बसविले पाहिजे असेच यातून स्पष्ट होते.

- **मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**




# ग्रंथपान




संगणकाचे युग सुरू झाले तेव्हा आपण कुठे पोहोचणार आहोत याचा काही आपल्याला पत्ता नव्हता. परंतु संगणकाने विळखा घातला, जग मुठ्ठीमें आले, आणि भान आले, आता आपण आपले राहिलेलो नाही. मुक्त छंदाने पारंपरिक छंद-वृत्तातील कवितेला आपल्या साच्यात बसविले, तेव्हाही असेच वाटत होते, हे कितीसे चालणार? परंतु अंदाज खोटे ठरले. तिचाच दबदबा पुढे निर्माण झाला. दिवसेंदिवस तिच्यात बदल होत आहेत. नवनवी परिमाणे लाभत आहेत. शब्दांची कळा बदलत आहे. मराठीच्या अंगणात बहूभाषा खेळायला आल्या. आणि आता तर त्या इथंच नादावलेल्या दिसू लागल्या. बदलत्या युगाची चाहूल आणि कवितेची बदलती रूपे एकमेकांच्या सोबतीने पावले टाकू लागली आहेत. या नव्या प्रारंभाचे स्वागत करणारा एक कवितासंग्रह 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला आहे. त्याचे नाव आहे 'नेटक्या कविता.' यातला नेट हा शब्द इंटरनेटचे प्रतिनिधित्व करतो आहे. थोडक्यात या नेटच्या जगातल्या कविता आहेत असे म्हणायला हरकत नसावी. त्याचे कवी आहेत मिलिंद लांजेवार.

कवी हा कवी असतो. तरीही तो माणूस असतो. माणूस म्हणून जगताना तो सभोवताल आपल्यासोबत घेऊन चालत असतो. नव्हे, सभोवतालचे वास्तव त्याला आपल्या कवेत वागवत असते. त्याच्याशी एकरूप झालेले असते. याचा प्रत्यय लांजेवारांच्या कवितांमधून येतो. 'मी हळहळत राहिलो' या २६/११ च्या हल्ल्यावरील कवितेत कवी म्हणतात,

*किडलेल्या राजकारण्यांना ब्लॉगवर शिव्या हासडल्या*
*'मुंबई कुछ कर' हा एसएमएस सर्वांना फॉरवर्ड केला*

तर 'टेररिस्ट' या कवितेत आश्वासक बळ देतात,

*टिफीन बॉक्स उघडा करून दाखवत ते पुटपुटले*
*साब दाढी बढानेवाला हर आदमी टेररिस्ट नहीं होता*

पावसाला टाळून कुठलाच कवि पुढे जाऊ शकत नाही. लांजेवारही त्याला अपवाद नाहीत. पावसाविषयीच्या अनेक कविता या संग्रहात आहेत. त्याचे ते वर्णन करतात,

१) *मी माझा आयडी विसरलो नाही*
*तुझाच हिरवा पासवर्ड डिलीट होत चालला.*

२) *म्हणून तर तू इएमआयसारखा*
*इन्स्टॉलमेंटमध्ये पडत आहेस*

कवीचे हळवे मन इतरांच्या दुःखाकडे पाहताना अंतर्मुख होते. स्त्रीच्या मनाचा शोध घेताना ते स्वःतच्या मनाला 'मनात राम आहे?' या कवितेतून विचारतात,

*पण कागदावर असते माझीच सही*
*हे घर तिचे की हा आसराच आहे?*

कवी संगणकीय युगात वावरत आहे. बोलण्यात, व्यवहारात, संगणक-नेटशी संबंधित शब्दांचा वापर अपरिहार्य आहे. त्याचा प्रत्यय अनेक कवितांमधून येतो. हे इंग्रजी शब्द आता आपलेच वाटू लागले आहेत. परंतु 'मराठी soup song' ही संपूर्ण कविता जवळपास इंग्रजीतून आहे. तशाच काही कवितांमधून हिंदी ओळी आल्या आहेत. परंतु 'जिंदगी इस तरह गुजारते रहे' ही कविता पूर्णपणे हिंदीतून उतरली आहे.

गुलजार या हिंदी कवीच्या 'त्रिवेणी' या काव्यप्रकाराला समोर ठेवून लांजेवार यांनी लिहिलेल्या काही कविता या संग्रहात आहेत. शिरीष पै यांच्याप्रमाणे काही हायकू सादर केलेले आहेत. चंद्रशेखर गोखले यांच्या चारोळ्यांप्रमाणे काही चार ओळींच्या कविता आहेत. तर काही कोलाजच्या कविता. काही गझल आहेत, त्या अलिकडच्या ए.के. शेख, चंद्रशेखर सानेकर यांची आठवण जागी करतात. काही कविता गद्यमय पद्धतीने आपला कथाभाव दाखवत उलगडत जातात. असा हा बहुपेडी कवितासंग्रह आहे. मुखपृष्ठावर नेटचे चिन्ह दाखवून आशय आणि शीर्षक यांच्याशी सहभाव व्यक्त केला आहे. काव्यप्रांतात या नव्या प्रणालीचे स्वागत करायला हवे.

- **मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**




मराठवाड्यातील शिल्पे आणि मंदिरे असा विषय निघाला की आपल्या नजरेसमोर उभी राहतात त्या अजिंठा आणि वेरूळ येथील लेण्या, घृष्णेश्वराचे मंदिर, परभणी जिल्ह्यातील औंढा नागनाथ आणि परळीची शिवमंदिरे. परंतु संपूर्ण मराठवाड्याचा विचार करता ही माहीत असलेली ठिकाणे आपल्या अपूर्णतेची ग्वाही देतात. मराठवाडा हा आठ जिल्ह्यांचा बनलेला असून त्यात असलेल्या मंदिर-शिल्पांची संख्या फार मोठी आहे. त्यापैकी लातूर आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांतील अनेक शिल्प-मंदिरांची संपूर्ण तपशिलासह माहिती देणारा ग्रंथ म्हणजे, डॉ. माया पाटील यांचा मंदिर-शिल्पे हा ग्रंथ होय.

सदर विषय हा त्यांच्या अभ्यासाचा असल्याने त्याला मर्यादा घालणे आवश्यक ठरले. त्यामुळे त्यांनी या दोन जिल्ह्यांची निवड केली. त्याचे कारण लातूर भागात ३० सप्टेंबर १९९३ रोजी झालेला ६.३ रिश्टर स्केलचा भूकंप. या भूकंपात या दोन जिल्ह्यांतील अनेक गावे उद्ध्वस्त झाली. मदिरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.

या जिल्ह्यांतील मंदिरांच्या बाबतीत विचार करायचा तर तो विटा आणि दगड, इतका मर्यादित अर्थ लेखिकेला अपेक्षित नाही. धर्म, तत्त्वज्ञान, अधात्म यांचे सर्वांगपरिपूर्ण दर्शन अशा मंदिरांतून अपेक्षित असते. त्यातील मूर्ती ही केवळ दगडाची प्रतिकृती नव्हे तर, भारतीय तत्त्वज्ञान आणि धर्म यांचे साकार रूप होय. मूर्ती आणि मंदिर हे एकमेकांचे प्राण आहेत असे लेखिका नमूद करतात.

राष्ट्रकुट, चालुक्य, होयसळ, कलचुरी, आणि यादव यांच्या काळात महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मंदिर-शिल्पांची उभारणी फार मोठ्या प्रमाणत झाली. उस्मानाबाद व लातूर या जिल्ह्यांचा विचार केला तर ही कामगिरी चालुक्य आणि यांदवांच्या काळात झाल्याची माहिती लेखिका देतात. अभ्यास करतानाच त्यांनी त्याची दोन भागांत विभागणी केली; मंदिर स्थापत्य हा एक आणि मूर्तिशिल्प हा एक. मंदिर स्थापत्याचा विचार करताना त्याच्या शैलीचा अभ्यास करण्यात आला आहे. अधिष्ठान, पद्म, उपान, कणी, कुद, कीर्तिमुखथर, गजथर, मण्डोवर, त्यावरील शिल्पे, देवकोष्ठ आणि शिखर, मुखमंडप, मंडप, अंतराळ, गाभारा, गर्भगृह, प्रदक्षिणापथ, स्तंभ, वितान, यांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यांची मोजमापे घेण्यात आली. प्रत्येक मंदिराला स्वतःचा इतिहास असतो, त्याचा शोध घेण्यात आला आहे. मंदिरावर कोरण्यात आलेल्या शिल्पे आणि कोरीव कामांत कोणते प्राणी, पक्षी, पुष्पपत्री, वाद्ये, यक्ष, किन्नर, अप्सरा, गण यांचा वापर करण्यात आला आहे, त्यांची नावासहित माहिती घेतलेली आहे. तर मूर्तिशिल्पात ज्यांचा समावेश होतो, ती आहेत गणपती, शिव, ब्रह्मदेव, नटराज, शक्तिदेवता, मातृदेवता, उमामहेश्वर.

या विषयाची माहिती संकलित करण्यासाठी लेखिकेने किती परिश्रम धेतले आहेत याची प्रचिती या पुस्तकातील तपशिलावरून येते. सोबत मंदिरे, लेण्या, मूर्ती यांचे रंगीत तसेच कृष्णधवल फोटो दिलेले आहेत. यांची संख्याही मोठी आहे. या फोटोंची प्रतिमा जशीच्या तशी वाचकांपर्यंत पोच व्हावी यासाठी आर्ट पेपरचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे ललित आणि कलात्मक अशा दोन्ही पातळीवर पुस्तकाचे गुणात्मक मूल्य वर्धिष्णू झालेले आहे, तसे त्याचे निर्मितीमूल्यही नजरेत भरणारे आहे. या पुस्तकाच्या मुखपृष्ठाची सजावट नीलेश जाधव यांनी अतिशय सुबकपणे केलेली आहे. मंदिराचा मण्डोवर, देवकोष्ठ आणि यांच्या पार्श्वभूमीवर सूरसुंदरीची प्रतिमा, मलपृष्ठावरही तशीच प्रतिमा. यामुळे पुस्तकाच्या उठावदारपणावर मोहर उमटल्यासारखी वाटते. या विषयावर अधिकार असणारे डॉ. गो.बं.देगलूरकर यांचे मार्गदर्शन आणि त्यांची लाभलेली प्रस्तवाना, पुस्तकाच्या शेवटी दिलेली संदर्भसूची, यामुळे या विषयात सुची असणाऱ्यांसाठी एका नव्या संदर्भग्रंथाची भर पडली आहे. पुरातत्त्वशास्त्र विभागाशी लेखिकेचा असलेला अनुभव उपयुक्त ठरलेला दिसून येतो. त्यामुळे त्यांच्याकडून अशा तऱ्हेचे आणखी भरीव लेखन होईल अशा अपेक्षाही निर्माण झाल्या आहेत.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

पूर्वी गावाकडचा माणूस मुंबईत गेला तरी कोण अप्रूप वाटायचे. मुंबईतल्या माणसाला दुबईची ओढ असायची. पण काळ बदलला. पाहता पाहता माणूस अमेरिकेलाच पोचला. तिथेच स्थाईक झाला. कुठे पूर्व आणि कुठे पश्चिम! आता अमेरिका म्हणजे पुण्याहून मुंबईला जाण्याइतके सोपे झाले की काय कोण जाणे. अमेरिकन दूतावासासमोरची प्रचंड गर्दी पाहिली की शंका येते. अनेकांच्या तोंडूनही सहज वाक्य ऐकायला मिळते, 'काही नाही हो, मुलांकडे गेलो होतो अमेरिकेला.'

संगणकाच्या युगात अमेरिका आता अगदीच जवळ आली हे खरे. पण म्हणून सगळ्यांनाच तिथे आमंत्रण आहे असे समजण्याचे कारण नाही. स्वतःजवळ काहीतरी विशेषत्वाची किल्ली असण्याची गरज आहे, तरच अमेरिकेच्या वेशीचे कुलूप तुमच्याकडून उघडले जाण्याची शक्यता आहे. आणि अशा भाग्यवंतांची संख्या आता बोटांवर मोजण्याच्या पलीकडे गेलेली आहे. मोठ्या प्रमाणात आपले लोक अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. आपल्या अंगी असलेल्या कौशल्याच्या जोरावर नावलौकिकास पोचले आहेत. यात मराठी माणसांची संख्याही मोठी आहे. या कर्तृत्ववान मराठी माणसांपैकी काहींचा परिचय करून देणारा, त्यांच्या कर्तृत्वाचा महिमा सांगणारा लेखसंग्रह नुकताच 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला आहे. त्याचे नाव आहे 'क्षितिज पश्चिमेचे.' लेखिका आहेत, विनता कुलकर्णी.




विनता कुलकर्णी यांची ओळख म्हणजे त्या संगणकशास्त्र आणि संख्याशास्त्राच्या प्राध्यापक आहेत. त्यातच त्यांनी डॉक्टरेट मिळवलेली आहे. अमेरिकेतील मराठी माणसांना एकत्रित जोडण्याचे जे माध्यम आहे नियतकालिकांचे, त्यांच्या संपादकाची जबाबदारीही त्यांच्याकडे आहे. भारतातल्या अनेक नियतकालिकांतून प्रकाशित झालेले त्यांचे लेखन आपण वाचले आहे. अमेरिकेतील काही कर्तबगार व्यक्तींचा, त्यांच्या कार्याचा वेध त्यांनी आपल्या लेखांमधून घेतला आहे. त्यांचा हा संग्रह म्हणजे, 'क्षितिज पश्चिमेचे.'

या संग्रहात जवळपास ३५ लेख आहेत. या लेखांमधील व्यक्ती किती वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या आहेत, आणि त्यांनी दाखवलेले नैपुण्य किती उजळ आहे याचा परिचय आपल्याला होतो. जीवाश्म वनस्पती/झाडे यांची उत्पत्ती, रचना व विकास या विज्ञानशास्त्रात मानाचे स्थान मिळवलेल्या डॉ. श्यामला चितळे, मराठी-संस्कृतच्या लेखिका आणि अध्यापिका डॉ. विद्युल्लेखा अकलूजकर, महाराष्ट्र मंडळाच्या संस्थापकांपैकी एक असलेल्या जया हुपरीकर, अनेकांना मदतीचा हात देणाऱ्या सुनंदा माने, नृत्यांगना गौरी जोग, कॅनडातील पहिली महाराष्ट्रीय महिला न्यायाधीश मंजुषा पावगी यांच्यासारख्या अनेक महिला. तर मानसोपचारतज्ज्ञ डॉ. दिलीप जेस्ते, उद्योगश्री डॉ. विजय ढवळे, वास्तूकला निपूण दिलीप खळे, किशोर पाठारे, संस्कृत आणि हिंदू संस्कृती अभ्यासाचे प्राध्यापक डॉ. माधव देशपांडे, अमेरिकन दूरदर्शनवर झळकणारा मराठी चेहरा सुनील नारकर, शास्त्रीय संगीत गायक महेश काळे...

मराठी भाषिकांसाठी जवळपास तीन दशके अव्याहतपणे कॅनडाहून प्रकाशित होत असलेले 'एकता' त्रैमासिक, गेल्या चार दशकांहून अधिक काळ सुरू असलेले शिकागो येथील महाराष्ट्र मंडळ, १९७८ पासून सुरू केलेली सेवाभावी संस्था म्हणजे महाराष्ट्र फाउंडेशन, यांची स्थापना, प्रेरणा, कार्य आणि यात सहभागी झालेल्या व्यक्ती, यांचा परिचय उद्‌बोधक वाटतो. या विषयी वाटणारे कुतूहल समाधानात पाझरत जाते. सेवाभावी वृत्तीने कार्य करणारे डॉ. जगन्नाथ वाणी, यशवंत कानिटकर, विनायक आणि प्रतिभा हे गोखले दाम्पत्य, यांच्या परिचयातून सेवाभावाचा वेगळाच अर्थ उमगत जातो.

या संग्रहातील सर्वच लेख हे व्यक्तीनिष्ठ आहेत. त्यातल्या व्यक्ती या उच्च विद्याविभूषित आहेत, तशाच आपापल्या क्षेत्रात लौकिक प्राप्त केलेल्या आहेत. त्यांचे क्षितिज लेखाच्या आवाक्यात पकडणे तशी कठीण गोष्ट. तरी देखील लेखिकेने त्याला जास्तीत जास्त कवेत घेण्याचा केलेला प्रयत्न स्तुत्य म्हणायला हवा. प्रत्येकाचा पैलू वेगळा आहे, तो चमकदार दिसेल याची घेतलेली दक्षता सहज लक्षात येते. अमेरिकेसारख्या खंडप्राय देशात दीर्घकाळ राहूनही आपल्या मातृभाषेचे वैभव टिकवून ठेवता येते, याचा प्रत्यय हा संग्रह वाचताना येतो. आवश्यक तेथेच इंग्रजी शब्दांचा वापर केलेला आहे.

ज्येष्ठ साहित्यिक आणि पत्रकार, पद्मश्री कुमार केतकर यांची प्रस्तावना या संग्रहाला लाभली आहे. ही प्रस्तावना म्हणजे मोत्याच्या हारात गुंफलेला हिरा. सतीश भावसार यांनी सजवलेले मुखपृष्ठही आकर्षक झाले आहे. महाराष्ट्राचे तारे पश्चिमेच्या क्षितिजावर चमकताना दाखवलेले आहेत.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

## ग्रंथपान

# झोके अमेरिकेतले

डॉ. अनंत लाभसेटवार




''मनुष्य कधीच जन्मतः अप्रामाणिक नसतो. नंतर परिस्थिती त्याला तसं बनवते हेच खरं.''

''आपण मुलगा म्हणजे वृद्धापकाळाची काठी समजतो. ती मानसिकता या देशात लोप पावली आहे. मुलगा किंवा मुलगी कमावती झाली किंवा त्यांचे हात पिवळे झाले की स्वतंत्र घर थाटायची इथे प्रथा आहे. घर सोडून गेलेली मुलं कधीच परत येत नाहीत.'' ''एकदा मत्ता संपादन केली की, माणसाला सत्ता हातात असावी असं वाटतं.''

ही व यासारखी मनाला स्पर्श करणारी अनेक वाक्ये ज्या पुस्तकात आहेत, त्याचे नाव आहे, 'झोके अमेरिकेतले.' आणि त्याचे लेखक आहेत, डॉ. अनंत लाभसेटवार. अनंतरावांचा परिचय त्यांच्या नियमित लेखनातून आपणास आहेच. कथा, कादंबरी,प्रवास अनुभव, चरित्र, लेखसंग्रह अशा विविधतेने नटलेल्या जवळपास २० प्रकाशित पुस्तकांतून यापूर्वीच ते आपल्या भेटीला आलेले आहेत. 'अमेरिकेतील धावपळ ' या चरित्रातून त्यांच्या लौकिकाचा परिचय झालेला आहे. 'लाभसेटवार प्रतिष्ठान'च्या कार्यामुळे या लौकिकाला वेगळेच परिमाण लाभलेले आपण पाहात आहोत. दीर्घकाळापासून अमेरिकेत स्थायिक झालेले असूनही आपल्या मातीशी असलेली नाळ त्यांनी तुटू दिलेली नाही. हेच त्यांच्या कार्यातून आणि विपुल मराठी लेखनातून अधोरेखित होत आहे.

दीर्घकाळ अमेरिकेत वास्तव्य आहे, म्हणून दिसले ते लिहिले असे या पुस्तकाचे स्वरूप नाही. वरवर दिसणारा अद्‌भुत देखावा वाचकांच्या समोर मांडावा, असा हेतू त्यात नाही. तर वरवर दिसणाऱ्या नितळ पाण्याखाली किती गाळ आहे, स्वप्ननगरी वाटणाऱ्या देशात किती खाचखळगे आहेत, याचे वास्तव म्हणजे हे पुस्तक आहे. अमेरिका हा जगावर राज्य करायला निघालेला देश. महासत्ता म्हणून तिची ओळख. परंतु याच अमेरिकेच्या माथी असलेला कर्जाचा डोंगर पाहता लेखक वर्णन करतात, 'अमेरिकन सरकारचे पाय अंथरुणाबाहेर पडलेले आहेत. ते स्वतः दरवर्षी १२०० अब्ज डॉलर कर्ज काढून कसंबसं जगतं.' या देशात मजूरवर्ग हा सर्वात महागडा प्रकार आहे. म्हणून त्यांनी यांत्रिकीकरणावर भर देऊन मजूरवर्ग कमी केला. तसेच कामांचे आऊटसोर्सिंग केले. किराणा दुकान, बँका, विमान, पेट्रोलपंप या सेवा देणाऱ्या संस्थांमध्ये ग्राहकांसाठी स्वयंसेवा लागू केली.

इथली राजकीय पद्धती, निवडणूक पद्धती, अध्यक्ष-राज्यपाल यांना कराव्या लागत असलेल्या कसरती यांची माहिती; इथले सामाजिक प्रश्न आणि अनिवासी स्थलांतरांचे प्रश्न; गरिबी आणि द्याव्या लागत असलेल्या सुविधा; उच्च गुणवत्ताधारकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली व्हिसा पद्धती, तिथले वृत्तपत्र, ग्रंथ प्रकाशन आणि इ-बुक संकल्पना; अमेरिकन कुटुंब व्यवस्था, विवाह व्यवस्था, आणि स्त्रीचं व्यक्तिमत्व व तिचे प्रश्न; शिकागो शहराने फिनिक्स पक्ष्याप्रमाणे घेतलेली भरारी; झालेली वादळे, वित्त घोटाळे आणि तेलकांड यांची माहिती आकडेवारीसह लेखकाने सादर केलेली आहे. अमेरिकेचे अंतःकरण उलगडून दाखवले आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये. हे करत असताना त्यांनी प्रत्येकवेळी भारताची तुलनाही केलेली आहे. त्यामुळे भारत आणि अमेरिका कोणत्या क्षेत्रात प्रगत आहेत किंवा मागासलेले आहेत याचे चित्र नजरेसमोर उभे राहते.

भारतातून अमेरिकेत गेलेल्या अनिवासी भारतीयांची संख्या, त्यांचा तिथला एकूण दर्जा, त्यांच्यामुळे भारतावर होणारे परिणाम याचेही तपशील लक्षवेधक म्हणावे लागतील इतके ठळक आहेत. तसेच तिथे झालेल्या वित्त घोटाळा प्रकरणात सहभागी असलेले भारतीय वशांचे राजरतनम आणि राजत गुप्ता, यांच्यावरील लेख वाचताना आपल्याकडील हर्षद मेहताची आठवण येते. जगातल्या अब्जाधीशांच्या यादीतील मित्तल आणि अंबानी, राष्ट्राध्यक्ष पदासाठी उभे राहिलेले मिट रॉमनी यांच्यावरील लेखही वेगळेपण दाखवतात.

'झोके अमेरिकेचे' हा लेखसंग्रह आहे. यात सुमारे ३२ लेख आहेत. ते बहूतेक सारे ताजे वर्तमान दाखवणारे आहेत. त्यामुळे आजची अमेरिका कशी आहे याचे चित्र नजरेसमोर उभे राहते. सारेच चकाकणारे सोने नसते असे म्हणतात. अर्थात त्यालाही अपवाद असतात. जे चांगले आहे त्याचाही उल्लेख लेखकाने कलुषित वृत्ती न दाखवता केलेला आहे. सर्वच लेख स्वतंत्र आहेत. सुटसुटीत तरी अभ्यासपूर्ण आहेत. अमेरिकेत असूनही इंग्रजी शब्दाना जास्तीत जास्त समर्पक शब्द योजना केलेली आहे. आवश्यक तेवढाच शब्द इंग्रजीत दिलेला आहे. भारतापेक्षा मी अमेरिकेत जास्त पावसाळे काढले, असे लेखक म्हणतात. तरीही त्यांनी मातृभूमीच्या मृदाचा गंध पावसात सोडून दिलेला नाही हे विशेष!

सतीश भावसार यांनी सजवलेले मुखपृष्ठ सुरेख झाले आहे. राष्ट्रीय ध्वजाचे चित्र असलेल्या कॉफीच्या कपातला अमेरिकन माणूस गळ्यापर्यंत बुडाला तरी खूश आहे. कपाचा दांडा तुटला आहे, याची खंत ना त्याच्या हसऱ्या चेहऱ्यावर आहे ना टपोऱ्या निळ्या डोळ्यांत आहे. पुस्तक वाचून समाधान वाटत असले तरीही एक वाक्य मनातून जात नाही, 'त्यावेळी ब्रिटनला अमेरिकेनं कर्ज देऊन तरंगतं ठेवलं होतं. आता तेच काम चीन करत आहे. तो अमेरिकेचा सर्वात मोठा सावकार झाला आहे. ( ८९० अब्ज डॉलर) अमेरिकेची मान चीनच्या मुठीत आहे.'

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

## माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३

नारायण विष्णू आठवले

संकलन : डॉ. रजनी भिसे




महात्मा गांधीनी ९ ऑगस्ट १९४२ रोजी 'चले जाव'चा इशारा इंग्रज सत्तेला दिला. तसा 'करेंगे या मरंगे' हा नाराही दिला. देशातला देशप्रेमी तरुण पेटून उठला. स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात स्वतःला झोकून दिले. प्रत्येकाची कृती वेगवेगळी होती. कुणी शिक्षणाला रामराम ठोकला, कुणी सरकारी नोकरीला. तर काहींनी सरकारी नोकरीत राहून बिटिश सरकारच्या धोरणात खीळ घालण्याचा प्रयत्न केला. यात घातपाताच्या कृत्यांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता. अशाच एका घातपाताच्या कृतीची आणि त्यापायी सोसाव्या लागलेल्या हालअपेष्ठांची हकीगत सांगणारे पुस्तक वाचण्यात आले. त्याचे नाव आहे, 'माझा देहूरोड बॉम्बस्फोट खटला, १९४३. त्याचा नायक आहे, नारायण विष्णू आठवले.

१९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाले. ब्रिटिश सरकार यात सहभागी झाले होते. पुण्याच्या देहूरोड येथे मिलिटरीचा डेपो होता. यात युद्धसामग्रीचा साठा मोठ्या प्रमाणात करण्यात येत होता. हँडग्रेनेड्स, निरनिराळ्या वजनाचे बॉम्ब, सुरुंग, विमानविरोधी तोफांचे गोळे असा दारुगोळा होता. या साठ्याचा उपयोग युद्धासाठी करण्यात येत होता. या डेपोत काम करणारे अनेक तरुणांनी 'चलेजाव'ची हाक आपले ध्येय मानले होते. युद्धप्रयत्नात व्यत्यय आणणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्याचाच एक भाग म्हणून ही सामग्री युद्धआघाडीवर न पाठवणे, पाठवण्यात दिरंगाई होईल अशी परिस्थिती निर्माण करणे, साहित्य निकामी करणे, यावर त्यानी लक्ष केंद्रित केले. ते तरुण होते, नारायण आठवले, अनंत आगाशे, भालचंद्र बेंद्रे, लालजी कुलकर्णी, गणपत तेलंग. यांनी डेपोत ही युद्ध सामग्री उद्ध्वस्त करण्यासाठी स्फोट घडवून आणला. घातपाती कृत्यासाठी उपयोगी पडावी म्हणून डेपोतून दारुगोळ्याची चोरी केली. परंतु त्याचा सुगावा लागला आणि सगळेच पकडले गेले. प्रत्येकाला शिक्षा झाली. येरवडा, आर्थररोड, विसापूर, नाशिक अशा तुरुंगशाळांचा प्रवास सुरू झाला. या सगळ्याच प्रकरणाचा साद्यंत वृत्तांत आपल्याला या पुस्तकातून वाचायला मिळतो. एक गाजलेला खटला नव्याने आपल्यासमोर उभा राहतो.

नारायण आठवले यांचा बॉम्बस्फोट खटला, एवढीच या पुस्तकाची मर्यादा नाही. त्यानिमित्ताने त्यांची जडणघडण, संस्कार, आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेटलेल्या व्यक्ती, जेजुरीचा दरोडा, मूषक महाल यांचाही मागोवा यात घेण्यात आलेला आहे. तळहाताचे/बोटांचे ठसे यांचे महत्त्व सांगणारे 'हर्षलचे ठसे' हे प्रकरण विषयाचे कुतूहल निर्माण करते. तसा भास्कर पांडुरंग कर्णिक यांचा धाडशीपणा आणि त्याग अनेक थोर क्रांतिकारकांची आठवण ताजी करून जातो. डॉ. रजनी भिसे यांनी त्यांच्या वडिलांच्या या आठवणी संकलित करण्याचे अवघड काम उत्तम रीतीने पार पाडले आहे. त्यामुळे या खटल्याची इत्थंभूत माहिती, स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास आणि त्यावेळची सामाजिक परिस्थिती वाचकापर्यंत पोचण्यास मदत झाली. डॉ. भिसे बाबांना लाभलेले दीर्घ आयुष्य आणि त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात केलेले कार्य, याची माहिती त्या प्रस्तावनेच्या स्वरूपात वाचकांच्या समोर नम्रपणे ठेवतात, हे विशेष! स्वातंत्र्याच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त दिलेला ताम्रपट पुस्तकाच्या सुरुवातीलाच दिलेला आहे. तो आठवलेंच्या कर्तृत्वाची सरकारने घेतलेली नोंद दाखवतो तसा पुस्तकाच्या ऐश्वर्यात भर देखील घालतो. बॉम्बस्फोट, आग, तुरुंग आणि ब्रिटिश ध्वजाच्या सोबतीने त्यांचे सशस्त्र सैनिक यांची एकत्रित केलेली गुंफण मुखपृष्ठावर दिसते. आशयाला साजेशी ही गुंफण सतीश खानविलकर यांनी सुरेखपणे केलेली आहे.

- **मूल्य २२५ रु. सवलतीत १२५ रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

''हजारो लोकांच्या पायाला लागनाऱ्या पायतानाचं कातडं मी रंगीवलं आसंल, पन सोताला इतभर चपलाचं चामडं कधी मिळत नसायचं. आनवानीच ऱ्हायचो. याचं कधी कधी वाईट वाटायचं. पन ती कुनाला सांगायचं?...''

या एकाच वाक्यावरून आत्मचरित्राचं अंतरंग आपल्यासमोर उघड व्हायला हरकत नसावी. कातडं कमावणं आणि त्याची संपूर्ण उस्तरवारी करणं हे काम काही साधं नाही; सहज चप्पल पायात सरकवण्याइतकं. ढोर मेहनत म्हणतात तिला. आणि ही ढोर मेहनत करणारी जी माणसं यात राबतात त्यांनाही 'ढोर' हेच नाव चिकटलेलं आहे. हा जाती-जमातीचा प्रकार म्हणून याकडे पाहता येणार नाही किंवा पोट जाळण्यासाठी करावी लागणारी मेहनत कुणालाही करावीच लागते, असं म्हणून याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. ढोरासारखं राबूनही पोटभर मिळेल याची शाश्वती नाही. कष्टानं कमावलेलं ते हक्कानं खाता यावं, समाजात मानानं जगता यावं, असं म्हणावं, तर तेही नाही. चोर समजून कधीही कुठेही लाठीकाठीचा, नाहीतर लाथाबुक्क्यांचा चोप मिळणार तो निराळाच. अशा समाजातला एक तरुण आपल्या जीवनाचं चित्रण करतो, आपल्या वाट्याला आलेल्या जगण्याचा आलेख रेखाटतो, त्या आत्मकथनाचं नाव आहे 'ढोर.' लिहिणारा तरुण आहे, भगवान इंगळे. ज्याला त्याची आपली माणसं आपुलकीनं हाक मारतात ती 'शाहीर' या नावानं.




हा एक जीवनप्रवास आहे. याची सुरुवात होते खर्डा या ऐतिहासिक लढाईच्या गावापासून. आणि हा प्रवास येऊन ठेपतो तो मुंबईच्या कुशीत. भगवान हा नुसता आपल्या हलाखीचं वर्णन करतो, भोगाव्या लागणाऱ्या परिस्थितीचं दर्शन करवतो, आणि स्वतःला सहानुभूती मिळवतो, असा लेखनामागचा उद्देश नाही, हे पुस्तक वाचल्यानंतर लक्षात येतं. लेखक ज्या मातीत रुजला, पोसला. त्या मातीचा पोत, त्याचा व्यवसाय, चालीरीती, संस्कार, भोवतीचा परिसर, गाव, गावातली शाळा, मास्तर, तिथली माणसं, स्वतःची माणसं, नातेवाईक; पुढे शिक्षणाच्या निमित्तानं भेटलेली बार्शी, अहमदनगर, संगमनेर ही गावं. तिथला परिसर, माणसं, विद्यालयं, प्राध्यापक, मित्र, त्यांची एकेकाची तऱ्हा; नोकरीच्या निमित्तानं ठाणे, वसई, धारावी, चेंबूर, बोरीवली इथले अनुभव; असा एक विस्तीर्ण पट लेखकानं वाचकांच्या हाती सुपूर्द केलेला आहे. हलाखीतही सुख शोधणारे भाऊ महादेव,बरमदेव, बहीण पदाबाई, खंबीरपणे उभी असलेली आई, मित्र कांतिलाल, सुधीर कुलकर्णी, बाजीराव कांबळे, पत्नी आशा आणि यांच्या सोबत संस्थाचालक, सहयोगी प्राध्यापक, मदत करणारे आणि मदत नाकारणारे, अशा अनेक व्यक्तिमत्त्वांचा परिचय विविध अंगांनी घेतलेला आहे, तो यात वाचायला मिळतो. अनेक प्रसंग बेतलेले, अंगावर कोसळलेले, कधी गमतीचे तर कधी शरण जायला लावणारे. ते मनाला चटका लावून जातात.

कातडं कमावणं म्हणजे काय याची खरी ओळख करून घ्यायची तर यातलं प्रकरण १७ अवश्य पाहावं. कुंडाची हालवनी, कातड्याची पाटनी, छिलनी, हाळ, तिरगा, डोल, भरू घाल, नांद ढाळ, खांद शिव या शब्दांची कृतीसह ओळख यातून होते. आपण ज्या सहजतेनं चामड्यांच्या वस्तू वापरतो, त्यापाठी असणारे कष्ट कसे असतात, याची जाणीव यातून झाल्याशिवाय राहणार नाही.

लेखकानं वापरलेली भाषा ही या पुस्तकाची सगळ्यात मोठी जमेची बाजू. लेखक ज्या भाषेत घरीदारी बोलत असे, तीच बोलीभाषा लेखनासाठी प्रमाण ठेवलेली आहे. त्यामुळे कथनातला प्रवाहीपणा एका नादात प्रवास करताना दिसतो. 'लय निमताचा कुला आन धुतानी गेला', 'आरं, बाईल गेली, डाव्या बाजूचं श्याट गेलं! लेक गेली, नाक गेलं भाड्यानो नाक!' 'चोरी न शिंदळकी झाकत नसती' यासारखी सहज उच्चारली जाणारी वाक्यं या लेखनावर साज चढवताना दिसतात. बोली भाषेत साधारणतः अपरिचित शब्दांशी वाचकांची झोंबी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे भान लेखकानं ठेवलं आहे. त्यासाठी प्रत्येक पानावर आवश्यक तिथे त्या त्या शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. लेखक जेव्हा शहरी भागात स्थिरावतो, तेव्हा त्याची ही बोली भाषा आपोआप विरळ होत जाते. प्रवासाचा काळ-काम-वेग म्हणतात तो हा.

माझ्या हातात आलेली ही या पुस्तकाची सहावी आवृत्ती आहे. हल्ली मराठीचा खप कमी झाला असा कांगावा सुरू असताना १९९९ ते २०१४ पर्यंत सहा आवृत्त्या निघण्याचं भाग्य या पुस्तकाला लाभावं, हा काही योगायोग म्हणता येणार नाही. बी कसदार असेल तरच पीक चांगलं येणार. त्याची पावती म्हणजे या आवृत्त्या. पुस्तकाच्या शेवटी एक यादी जोडलेली आहे. ज्यानी हे नाणं कलदार आहे, असा या पुस्तकाविषयी निर्वाळा दिला, त्यांच्या नावांची आणि अभिप्रायाची. शंकर सारडा, प्रा. उमाकांत कामत, प्रा. अविनाश देशपांडे, रामदास फुटाणे, विजय कुवळेकर, डॉ. प्रा. रावसाहेब कसबे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. शरणकुमार लिंबाळे, माधव कोंडविलकर आणि आणखी... अशी भली मोठी यादी आहे.

चित्रकार सतीश भावसार यांनी मुखपृष्ठाची सजावट केलेली आहे. कातडं कमावण्याच्या सगळ्या छटा त्यांनी साकारल्या आहेत. कुत्री, गिधाडं, मांजरं यांची नाळ ज्याच्याशी जोडलेली असते, तिथे त्या वस्तीतल्या माणसालाही आपली नाळ तोडता आलेली नाही, हे साम्य त्यांनी बारकाईनं चितारलेलं आहे.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

''शिक्षक हा मुलांचे मानसशास्त्र उत्तम जाणणारा व आशावादी असावा. कारण आशावादी शिक्षकच सकारात्मक वृत्तीमुळे मुलांच्या अधिक जवळ, त्यांच्या मनात स्थान मिळवू शकतो. ज्यामुळे वर्गात शिकवणे सहज व सोपे होते.''

''शिक्षकांचे शिष्यांविषयीचे प्रेम, माया, जिव्हाळा, आपुलकी, जवळीक हे सारे जरी एकवटून गोळा केले तरी त्यांच्याकडून मिळालेल्या आजच्या निर्व्याज-निरपेक्ष प्रेमाची व त्यातून निर्माण झालेल्या आनंदाची ते बरोबरी करू शकेल का? वाटले, याच्यातून उतराई होणे नाही.''

ही आहे एका शिक्षिकेची शिदोरी, आयुष्यभराच्या ज्ञानयज्ञावर लाभलेली. शिदोरी याचा अर्थच आहे, बरोबर घेतलेलं अन्न. डॉ. सरोजिनी बाबर यांच्या भाषेत सांगायचे तर,'मुलगी सासरी जाताना तिच्या गणगोताला वाटण्यासाठी माहेरच्या मंडळींनी तिच्याबरोबर दिलेले खाद्यपदार्थ.'

'मैना सासवीऱ्याला जाती संगं शिदुरी साकरची...'

तर मोरोपंत 'आर्याभारत'मध्ये म्हणतात,' कथिली विदुरे सन्मतिजाणो दिधली तया शिदोरी ती.' इथे शिदोरी शब्द प्रवासातील अन्न असा आहे. त्याचा संदर्भ सुधा देसाई यांच्या या पुस्तकाच्या शीर्षकाशी जुळणारा आहे.




सुधा देसाई यांनी आयुष्याचा बहुतेक काळ घालवला तो विद्यादानात. त्या शिक्षिका म्हणून वावरल्या त्या चेंबूरच्या जनरल एज्युकेशन ॲकॅडेमी या शाळेत. परंतु या काळात त्याचे नातं केवळ राहिलं ते आपला विषय आणि आपले विद्यार्थी, असं झालं नाही. आपले सहकारी शिक्षक, विद्यार्थ्यांचे पालक यांच्याशीही त्यांचे नातेसंबंध जुळले, वाढले आणि वाढतच गेले, जिव्हाळ्याची छाया देणाऱ्या वृक्षाप्रमाणे. शाळेत आलेल्या विद्यार्थ्याला शिकवणं हे शिक्षकाचं कर्तव्य. पण नुसतं शिकवणं नाही, तर त्याची मानसिकता ओळखणं, त्याच्या सुखदुःखात सहभागी होणं, हेही शिक्षकाचं कर्तव्य आहे. हे त्यांनी नुसतं उपदेशाद्वारे शिकवलं नाही, तर कृतीतून दाखवलं. त्यामुळे त्या केवळ शिक्षिका म्हणून ओळखल्या जात नाहीत तर 'आमच्या बाई' ही त्यांची खरी ओळख निर्माण होते. त्याचा प्रत्यय येतो तो प्लेझंट सरप्राईज या लेखात. एके काळी त्यांचे विद्यार्थी असलेले आणि आज मोठमोठ्या हुद्यांवर नाव कमावलेली मुलं-मुली एकत्रित येतात. आपल्या बाईंना भेटण्याचा कार्यक्रम आखतात, ही केवढी अपूर्वाई! ती बाईंच्या वाट्याला येते. त्या दवाखान्यात जातात तिथे त्यांचेच विद्यार्थी सेवेला हजर असतात. रितेश कामत, सोनल शहा. अमरिकेत असलेला परंतु भारतात येताच आवर्जून बाईंना भेटायला येणारा देवांग शहा. नागपूरला असलेला कॅन्सर रिसर्चमध्ये नाव कमावलेला अजय मेहता. वक्तृत्वस्पर्धेत नाव कमावलेला अमित गायकवाड. अशी मोठी यादी असलेली ही मुलं आज नाव लौकिकास प्राप्त ठरली आहेत. परंतु बाई दिसताच विनयाने पुढे येऊन विचारतात, 'ओळखलंत मॅडम!'

आपल्या विद्यार्थ्यांचं वाटणारं कौतुक अनेक लेखांतून व्यक्त झालेलं आहे, तसे पालक आहेत, ज्यांना आपल्या पाल्याची काळजी आहे. जे आपुलकीनं बाईंच्या चांगुलपणाला कवटाळून आहेत. जितूची आई, विनयची आई, निशाचे वडील. शाळेची सहल, वक्तृत्वस्पर्धा, स्वगतस्पर्धा, आपल्यासोबतचे सहकारी शिक्षक असे अनेक लेख या पुस्तकात समाविष्ट आहेत. ज्यातून प्रत्येकाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन दिसून येतो, जो आत्मियता, धडपड आणि जिव्हाळा दाखवतो. एसएससी बोर्डाची परीक्षक आणि बोर्ड परीक्षेसाठी उपकेंद्र संचालक म्हणून आलेले अनुभव नवीन शिक्षकांना मार्गदर्शक ठरावेत असे आहेत. आपली शाळा, आपले विद्यार्थी यांचं वर्णनदेखील आपुलकीनं केलेलं आहे. शिक्षकानं विद्यार्थ्यांना शिकवलं म्हणजे त्यांच्यावर उपकार केले अशी भावना कुठेही नाही. उलट त्यांच्यामुळे लाभलेलं कृतार्थपण मोठं आनंददायी आहे असं त्या मानतात. त्यातच राहणं पसंत करतात. हा त्यांच्यातला मोठेपणा लेखांना वेगळेच परिमाण देतो.

शिक्षिका म्हणून आलेले अनुभव, शाळेत आणि शाळेबाहेर, शिक्षिका म्हणून केलेलं काम आणि आलेले अनुभव यांची ही शिदोरी आहे. बहुतेक शिक्षकांच्या प्रवासात ही सोबत असतेच, परंतु सगळेच काही तिचे गाठोडे इतरांच्या समोर सोडत नाहीत. सुधा देसाई यांनी मात्र ते आपल्यासमोर सोडलं आहे. नक्कीच चवदार वाटावं असं. सतीश खानविलकर यांचं मुखपृष्ठही शीर्षकास अनुसरून रेखाटलं आहे. शिक्षिकेची शबनम पिशवी दाराच्या मुठीला अडकवलेली. सदैव तिला सोबत करणारी. म्हटलं तर भरलेली, म्हटलं तर निवांत विश्रांती घेत असलेली, कृतार्थपणे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान




''वर्गात मी आयुष्यात कधीही खुर्चीवर बसलो नाही. फळ्यावरील लिखाण सुवाच्य व शेवटच्या विद्यार्थ्याला दिसेल याची काळजी घेतली. शेवटच्या विद्यार्थ्याला समजेल व अगदी शेवटचा विद्यार्थी पाठ्यांशात भाग घेईल याची काळजी घेतली. निष्णात माळी अगदी शेवटच्या झाडाला पाणी जाते की नाही याची काळजी घेतो हे उदाहरण मी आयुष्यभर विसरलो नाही.''

हे वाक्य आहे 'कथा माझ्या घडण्याची' या पुस्तकातील. याचे लेखक आहेत प्रभाकर राणे. काही वाक्यं माणसाचा स्वभाव सांगतात तर काही त्यांचा व्यवसाय, पेशा. परंतु लेखक इथे स्पष्ट करतात ते त्यांचा शिक्षकी पेशा आणि त्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन. हाडाची म्हणून जी काही मंडळी या पेशात आहेत, ती स्वतःला यात पूर्णपणे झोकून देतात. पेशा आणि आयुष्य यांचा एकच गोफ विणतात. तोच ध्यास घेऊन त्यांच्या कोशात वावरत असतात. त्यांपैकी एक असलेले हे प्रभाकर राणे.

प्रभाकर राणे, हे तसे सुखवस्तू कुटुंबातील. परंतु दैवाचे फेरे फिरले आणि सुख नावाच्या वस्तू घेऊन गेले. वडील मुंबईला तुटपुंज्या पगारावर राबू लागले. गावी कुटुंब राहिले. त्यात आईचं पाठी लागलेलं आजारपण. त्यामुळे तिचं औषधपणी करणं, घरातली दळणापासून ते कण्यांची पेज करणं, बहिणींच्या वेण्या घालणं ही कामं प्रभाकरकडे आली. शाळा करून ती पार पाडावी लागत. म्हणूनच शाळेतून परतला की आई कौतुकानं म्हणायची, ''आता माझी पोर आली.''

''वयाच्या बाराव्या वर्षापासून मी पोक्त झालो.'' ही त्याची पावती.

प्रभाकरनं कष्टातही शिक्षणाची कास सोडली नाही. म्हात्रे पेन कंपनीत नोकरी करूनही शिक्षण सुरू ठेवले. रेशनिंग इन्स्पेक्टर म्हणून काम केलं. पुढे सचिवालयात नोकरी मिळाली. परंतु गडकरीसाहेबानं सल्ला दिला, 'सचिवालय हे तुमच्यासारख्या हुशारांसाठी नाही. कुठेही जा पण सचिवालयात राहू नका.' आणि त्याचवेळी दामलेसर, नाना जोगळेकर, डॉ. गोरे यांनी प्रभाकरला गावी शिक्षक म्हणून आमंत्रित केलं. आणि तिथून सुरू झाली एका शिक्षकाची कहाणी... गावापासून मुंबईच्या आर्यन हायस्कूलपर्यंत. एक आदर्श शिक्षक. भूगोल विषयाचा व्याखाता. शिक्षक संघटक. एसएससी स्टेट बोर्डाचा अभ्यास मंडळ सदस्य. पाठ्यपुस्तक निर्मिती सदस्य. एक कार्यकर्ता. सामाजिक भान जपलेला पालक. भूगोलाचा मित्र...

शिक्षकांनी उत्तम शिक्षक होण्यासाठी काय करायला हवं, वर्गात येण्यापूर्वी शिक्षकाची तयारी कशी असावी, आपल्या विषयाचा अभ्यास कसा करावा, आणि विद्यार्थ्यांचं भवितव्य घडवणारे आपण आहोत हे भान कसं जपावं, याचा गृहपाठ स्वतःच्या कृतीतून राणेसरांनी दिलेला आहे. 'केल्याने देशाटन' बिरुद हे शिक्षकासाठी कसं सत्य आहे, हेही राणेसर समजावून देतात. 'भूर्जपत्र' म्हणजे पत्रावळ नाही याचाही तपशील इथे देतात. आणि सहल म्हणजे नुसतंच फिरणं नाही, तर डोळे उघडे ठेवून आपण पाहतो त्या निसर्गाचा अर्थ समजून घेणं, समजावून सांगणं हा आहे, हेही ते अनुभवातून स्पष्ट करतात.

'कथा माझ्या घडण्याची' ही एका शिक्षकाची कहाणी वर वर वाटते, परंतु इतरांना घडण्यासाठी उपयुक्त ठरावी अशी ही कहाणी आहे. यात त्यांचा असलेला सहजपणा. मोकळेपणा. आणि आपण कुणीतरी वेगळे आहोत, असा गर्व न दाखवता इतरांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती. आपण आणि आपला परिसर याविषयी वाटणारी जागरूकता, स्वतःमध्ये असलेला कामगार, उत्तम बांधा, आणि स्वतः पुढाकार घेण्याचा निर्भीडपणा, यामुळे राणे यांचे व्यक्तिमत्त्व ठळकपणे उठून दिसते. लेखनातली परिणामकारकता आणि भाषेतला सरळपणा, हा राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या शिक्षकानं जोपासलेल्या आदर्शांशी जुळणारा आहे. ध्येयाकडे नजर लावलेला तारुण्यातला राजबिंडा चेहरा आणि अनुभवसंपन्न मागे वळून पाहणारा आजचा चेहरा, अशी दोन रूपं मुखपृष्ठावर साकारण्यात आली आहेत. ही चित्रकार भावसार यांची कल्पकता छानच.

- **मूल्य १६० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

## मुंबई ते काश्मीर सायकलसफर

अरुण वेढीकर




''सूर्य... प्रत्येकवेळी रंग,रूप, आकार आणि चमत्कार यांच्या आविष्कारातून प्रकटणारा हा दिव्यगोल कधी चिंचेनं घासलेल्या अवाढव्य ताम्रथाळीसारखा लखलखीत तर कधी भगवी कफनी घालून हिमालयात निघालेल्या सन्याशासारखा शांत दिसे. तोच दुपारी जेव्हा उकळत्या लोहरसाच्या वलयांकित कुंडासारखा फसफसून जाई तेव्हा कुणीतरी आकाशाच्या तप्त पटलावर हट्टानं ठोकून टाकलेली ही सुवर्णमुद्रा वितळून कोणत्याही क्षणी अंगावर ओघळू लागेलसं वाटे.''

प्रवास हा नुसता प्रवास नसतो; वाहनातून वा वाहनावरून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोचण्याचा. तो असतो एक अनुभव जगण्याचा, जगणाऱ्यांकडे पाहण्याचा; काळजाच्या तरल नेत्रांनी भवताल टिपण्याचा. त्याच्याशी परिचय करून घेण्याचा, जमलं तर त्याच्याशी एकरूप होण्याचा. किती पाहावं आणि किती घ्यावं अशी भेट म्हणजे प्रवास. निसर्गाचा, भूगोलाचा, पर्यावरणाचा, इतिहासाचा, देहाचा, मनाचा, अंतःकरणाचा, भावनेचा. सहकार्याचा, वेदनेचा, सुखदुःखाचा, एकमेकाला समजून घेण्याचा. हा प्रवास केला आहे अरुण वेढीकर यांनी. मुंबई ते काश्मीरपर्यंतचा. तोही सायकलवरून. एकट्यानं. 'चल अकेला, चल अकेला!' म्हणत. तो सुद्धा अवघ्या वीस दिवसांत. पूर्ण उन्हानं तापलेल्या कहरात. कावळा आणि बगळा अशा रंगात. एका धीरानं, निश्चयानं पूर्ण केलेल्या या सायकलसफरीचं वर्णन त्यांच्याच अनुभवसंपन्न लेखणीतून अवतरलं आहे. त्याचे नाव आहे 'मुंबई ते काश्मीर सायकलसफर.'

अरुण वेढीकर यांनी केलेला प्रवास थक्क करणारा आहे. मुंबई ते लडाख, बारामुल्ला हे सुमारे २५७७ कि.मी.चं अंतर त्यांनी सायकलवरून अवघ्या वीस दिवसांत कापलं. बरं सायकल काही खास वेगळी बनवून घेतली होती असं नाही, तर आपली नेहमीची वापरातील सायकल. तिच्या सोबतीनं पार केलेल्या प्रवासात अनेक गावांना भेटी देता आल्या. नाशिक, धुळे, सेंधवा, इंदूर, देवास, सारंगपूर, बिनागंज, शिवपुरी, ग्वाल्हेर, आगरा, मथुरा, दिल्ली, पानिपत, कुरुक्षेत्र, चंदिगढ, माहिलपूर, पठाणकोठ, जम्मू, श्रीनगर, लडाख, बारामुल्ला ही काही त्यातली ठळक नावं. तिथले जीवनमान, इतिहासाच्या खानाखुणा पाहता आल्या. नुसत्याच पाहिल्या नाहीत, तर त्यांचा इतिहासही बारकाईने अभ्यासला. आग्र्याचा ताजमहाल हे त्याचं उत्तम उदाहरण म्हणता येईल. तशा अनेक नद्यांना पायावरील मराठमोळ्या मातीचा गंध आपल्यात सामावण्याचं भाग्य लाभलं. तापी, नर्मदा, क्षिप्रा, चंबळ, सतलज, रावी यासारख्या मोठ्या पावन नद्या त्यापैकी काही.

प्रवासात निसर्ग वेगवेगळ्या रूपात भेटला. तशा वाटाही भेटल्या. काही वाईट अनुभव आले तशी काही चांगली माणसंही भेटली. द्राक्षं देणारी म्हातारी, निलूखेडीचा करणसिंग आणि त्याचे कुटुंबीय, दिल्लीचा सोवोनी, चंदिगडचा शाम बोडस, पानिपतचा हॉटेलवाला, रोपारचा रघुराम, माहिलपूरचा बलदेवसिंग बन्त आणि लेखकाच्या काळजाला फुलवणारी काश्मीरची सईदा यासारखी काही नावं सांगता येतील. प्रवासात चांगले प्रसंग घडले तसे वाईटही. रस्ता चुकणं, थंडी आणि उन्हाचा असह्य मारा, भूक लागली म्हणून मिळेल ते आणि मिळेल तिथे खाणं. त्यात काश्मीरच्या वाटेवर दरडीत घसरत जाणं ही जीवघेणी फजिती तर अंगावर काटा आणणारी. चंबळच्या खोऱ्यातला अनुभव आणि बेफाम वेगानं आलेल्या बैलाची धडक हेही असेच लक्षात राहणारे प्रसंग. मुरैना म्हणजे मोरांचं गाव, हेही वेगळंच गाव. गावकऱ्यांच्या सांगण्यानुसार या जिल्ह्यात लाखाच्या वर मोर आहेत. लेखक या गावात थांबावा अशी गावकरी विनंती करतात तेव्हा तो म्हणतो 'नो मोअर मोर.'

काश्मीरची उपपत्ती : कश्यप मीर, कश्यप ऋषीनं सतीसरोवर आटवून तयार केलेली भूमी. मीर म्हणजे पर्वत. बारामुल्लाची उपपत्ती : वारमूल, वराहमूल. आर्यांचं प्राचीन वसतिस्थान. लडाख : ल-डाख. 'ल' म्हणजे खिंड आणि 'डाख' म्हणजे उंचावरील रस्ता, यासारखी माहितीही लेखकानं यात दिलेली आहे. तशी थंडीत शेकोटी म्हणजे शे-कोटी. लाडू देणारा खि-लाडू, यासारख्या कोट्याही शब्दांशी खेळत सहजपणे केलेल्या आहेत. मुळातच हे प्रवासवर्णन असलं तरी त्याची पठडी वेगळी आहे. यात कुठेही मी मी नाही. भाषा तर अतिशय तरल आणि कसदार. कधी ती कवितेच्या जवळ जाते तर कधी आपल्या संवेदनेला हात घालते. त्याचे उदाहरण अगदी सुरुवातीलाच दिलेलं आहे, त्यावरून कल्पना यावी. काश्मिरी भाषेशी जितका परिचय झाला, त्याची यादी सोबत दिली आहे. प्रवासादरम्यान काढलेली प्रासंगिक रेखाचित्रं, काश्मीरमधील काही रंगीत फोटोही सोबत दिलेले आहेत. त्यावरून प्रवासवर्णनाचा रंग अधिक खुलून आला आहे. सायकलवरून प्रवास कराणाऱ्यांसाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरू शकेल. परंतु ज्यांना प्रवासाची आवड आहे, त्यांना प्रवासाची तयारी कशी करावी इथपासून प्रवास कसा करावा इथपर्यंत हे पुस्तक उपयुक्त ठरू शकेल. सायकलवरून प्रवास करणारा १९७९चा फोटो मुखपृष्ठावर आहे. तेही लेखकानंच सजवलेलं आहे.

- **मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**

# ग्रथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**




''मेहनत, सचोटी, अभ्यास ह्याच्यावर माणसाला काहीही प्राप्त करून घेता येणं शक्य आहे यावर माझा विश्वास होता.'' असा स्वतःवर पूर्ण विश्वास असणाऱ्या डॉक्टरची ही चरित कहाणी आहे, 'तसा मी...असा मी.'

या कहाणीत दोन वाक्ये आहेत, परस्परांना छेद देणारी. ती अशी–

'' तुला पैसेच हवेत ना? मग तू एक गँग ऑर्गनाइझ कर. म्हणजे तू कधी पकडलाही जाणार नाहीस. सध्या तू एकटा कितीसे मिळवतोयस? गँग केलीस तर आणखी कोट्यवधी रुपये मिळवशील.''

''मेहनत कर. सर्जरी कर. तिकडे मन लाव. म्हणजे तुझं भलं होईल. पैसे कदाचित कमी मिळतील. पण तरुण आहेस तू आणि मिळणाऱ्या पैशांवर सगळं नीट करू शकतोस.''

ही दोन वाक्ये आहेत डॉ. अजित फडके यांची. नामांकित युरॉलॉजिस्ट डॉ. फडके यांनी ही दोन वाक्ये वापरली नसती तर? युक्तीच्या चार गोष्टी सांगणारी व्यक्ती तितकीच तोलामोलाची असावी लागते. तसे आचरण करणाऱ्या व्यक्तीचा स्वतःवर पूर्ण ताबा असावा लागतो. आत्मविश्वास प्रचंड असावा लागतो. तो तसा होता, आहे, म्हणून खुल्या दिलाने डॉ. खरे आपल्यासमोर स्वतःला पेश करतात, 'होतो तसा आणि आहे तसा.'

डॉ. बाळ खरे म्हणजे प्रसिद्ध युरॉलॉजिस्ट. कुशाग्र बुद्धिमत्ता, अफाट स्मरणशक्ती आणि नवनवीन करू पाहण्याची प्रचंड जिज्ञासा यांचे माहेरघर म्हणजे डॉ. बाळ खरे. या बळावर त्यांनी एमबीबीएस,एमएस, सुपर स्पेशालिटी डिग्रीपर्यंतच्या शिक्षणात झेप घेतली. युरॉलॉजिस्ट म्हणून लौकिक मिळवला. परंतु तेवढीच त्यांची ओळख आहे का? नाही. गुणांचे संपन्न भांडार असलेली व्यक्ती एकाच क्षेत्रात रममाण राहिली तरच नवल. तसे ते अपवाद राहिले नाहीत. पण त्यांनी केलेली मुशाफिरी पाहिली तर आपल्यालाच नवलाचा धक्का बसतो. संस्कार आणि शिक्षण, अपेक्षा आणि वास्तव यांना छेद देणाऱ्या कलागती वाचताना पारंपरिक मानसिकतेलाच धक्का बसत असल्याचा प्रत्यय येतो. एक माणूस काय आणि कसा करू शकतो याचा आलेख, म्हणजे ही चरित कहाणी, 'तसा मी... असा मी.'

डॉ. खरे यांना लाभलेला संस्कारांचा वारसा सुरू होतो तो जगन्नाथपुरी पीठाच्या शंकराचार्यपदी असलेल्या आजोबांपासून. त्यांच्यामुळे अध्यात्म कळला. एकपाठी असल्याने अठरा अध्यायांची संपूर्ण भगवद्‌गीता,उपनिषदे बालपणीच तोंडपाठ झाली. आईवडील, चुलते आणि शिक्षक यांच्यामुळे शिक्षणाची गाडी भरधाव वेगाने धावली. 'जुगाराच्या पैशाला हात लावणार नाही. मेहनतीच्या पैशावरच संसार चालेल,' असे खंबीरपणे ठणकावून सांगणाऱ्या पत्नी कालिंदी, यांनी संसाराच्या गाडीचा ब्रेक सचोटीने आपल्या हाती ठेवला. डॉ. रेगे, डॉ. गोखले आणि डॉ. फडके यांनी आयुष्यालाच वळण दिले. अशी एकाहून एक सरस व्यक्तिचित्रे या कथनाला उठाव देतात. तसे शाळा–कॉलेज, जुगारखाने, आकड्यांचे गुत्ते,रेसकोर्स, दवाखाने,विदेश येथे आलेले अनेक प्रसंग आणि व्यक्ती चरित्र नायकाच्या गुणांचे रंग गडद करताना दिसतात. त्यामुळे नायकासोबत बाह्य वातावरणाचाही परिचय होत जातो. आत्मचरित्र म्हटले की ते बऱ्याचदा एकसुरी होण्याचा धोका असतो. परंतु इथे तसे झालेले नाही ते यामुळे.

डॉक्टर म्हटला की, रुग्णांच्या अनेक तऱ्हा आणि त्यांच्यावरील उपचार यांचा तपशील येणे अपरिहार्य असते. तसे अनेक नमुने यात आलेले आहेत. परंतु त्याचवेळी डॉक्टरकडे जाण्याची आवश्यकता वाटू नये असे अनेक उपचारांचे सल्लेही यात दिलेले आहेत. शरीराला काय योग्य आणि काय अपायकारक आहे, याची माहिती देण्याचे औदार्य डॉक्टरांनी दाखवले आहे.

हे आत्मचरित्र शब्दांकित करण्याचे मोठे आणि तितकेच नाजूक काम उषा मेहता यांनी उत्तमपणे पार पाडले आहे. नेटकेपण आणि रसाळपण जपले आहे. 'पैशाची लालूच, पैशाची ऊब आणि पैशाचे माहात्म्य, खोटं बोलायला सहज शिकवतं.' 'आपण किती आणि कुठपर्यंत करू शकतो, काय करू शकत नाही, सर्जनला हे आधीच कळायला हवं.' अशी जुगाऱ्याची मानसिकता आणि सेवाभावी डॉक्टरची मानसिकता यांची उकल करून दाखवली आहे. त्यामुळे पुस्तक हाती घेतल्यानंतर ते खाली येते ते पूर्ण झाल्यानंतरच. मुखपृष्ठावरील फोटोमधून जीवनप्रवासाची गती दिसून येते.

ही शस्त्रक्रिया आहे, एका सर्जनाने सर्जनशील मनाने स्वतःची केलेली. गुणांचे उदात्तीकरण आणि दोषांची पाठराखण, असा लपंडाव इथे नाही. जे आहे ते सरळ, प्रामाणिकपणे समोर मांडले आहे. त्यामुळे एक वेगळे आत्मचरित्र वाचल्याचा निखळ आनंद होतो. सुचवलेल्या आणि केलेल्या उपचार पद्धतींभोवती मन रेंगाळत राहते. हा साराच प्रवास मनोरंजन करणारा, तसा कुशाग्र बुद्धीची मुशाफिरी सिद्ध करणारा आहे.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**




ही एक सत्यघटना आहे, निसर्गोपचाराची. ती संबधित आहे हे उपचार करणाऱ्या आश्रमाशी. आणि त्याचवेळी ही कहाणी आहे एका कन्येची, तिच्या मातोश्रीने सांगितलेली. तिचे नाव आहे 'माझ्या काळजाची गोष्ट.' मूल हे आईचे काळीज असते ते सगळ्यांनाच मान्य. त्या अर्थाने हे शीर्षक. आणि गोष्टीचा विषय आहे काळजाला झालेल्या आजाराचा. म्हणून ही 'काळजाची' गोष्ट. म्हणजे आपणास 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' या पुस्तकाची आठवण होण्यास हरकत नसावी.

मधुमती या १३-१४ वर्षांच्या मुलीला हृदयाचा आजार होतो. त्याचे नाव 'ऱ्हुमॅटिक हार्ट डिसिज'. हजारांत एखाद्याला होणारा हा आजार. तो आपल्या लेकीला झाला आहे हे कळल्यानंतर आईची अवस्था काय झाली असणार? आणि ज्या कोवळ्या मधुमतीला झाला, तिला हे सत्य कळल्यानंतर काय वाटले असणार? असा आजार झाला की केवळ ती व्यक्तीच ग्रस्त होते असे नाही, संपूर्ण कुटुंबच खचून जाते. मग उपचारासाठी होणारी धावपळ हा नवाच अध्याय सुरू होतो. कुठल्या उपायांनी त्वरित आणि हमखास आजार बरा होईल, याचीच चिंता सतत पाठीशी लागलेली राहते. अशावेळी सल्ला देणाऱ्यांची संख्या काही कमी नसते. वेगवेगळे दाखले, अनुभव, दवाखाने आणि उपचाराच्या अनेक पद्धती समोर येतात. परंतु या सगळ्या प्रकारांना टाळण्याचा संयम मधुमतीच्या कुटुंबाने दाखवला. ठामपणे स्वतः निर्णय घेतला तो निसर्गोपचाराचा. त्यांचा योग्य धाडशी निर्णय ठरला. अथक परिश्रम, संयम आणि विश्वासाच्या जोरावर हृदयातून आजाराला हद्दपार केले. त्याची ही गोष्ट.

निसर्गोपचार म्हणजे निसर्गाला शरण जाणे. निसर्गाला शरण जाणे म्हणजे पंचमहाभूतांच्या (पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश) साहाय्याने रूग्ण बरे करणे. हा वसा ज्यांनी घेतला ते आहेत डॉ. जयनारायण जायस्वाल. त्यांनी 'विनोबा योग निसर्गोपचार आश्रमा'ची स्थापना केली आहे. तो आश्रम पूर्वी वडगाव-बुद्रुक येथे होता, तो आता पारगावला आहे. त्याचे कारण इथली परिणाम करणारी हवा. येथे मधुमतीला जीवनदान देण्याची किमया डॉ. जायस्वाल ऊर्फ दादांनी केली. ही किमया निसर्गोपचारांनी सांधली हे विशेष.

रोगनिर्मूलन म्हणजे अंतर्बाह्य विश्रांती. हिलिंग पॉवरला दुरुस्तीसाठी पूर्णवेळ देणे. रोगाचे डाग, नैसर्गिक आहार, माती, पाणी, योग, ध्यान, मॉलिश, वाफारा याद्वारे स्वच्छ करणे. दीर्घ लंघनाद्वारे रफू करवून घेणे, आणि शवासन ध्यानाची बैठक देणे होय. असा खडतर स्वरूपाचा उपचार म्हणजे अशा १३-१४ वर्षांच्या कोवळ्या जीवावर अन्यायच. परंतु जिद्दीच्या जोरावर काहीही साध्य करता येते, हे मधुमतीच्या अनुभवावरून सिद्ध होते. तिच्यापाठी तिची आई तितक्याच भक्कमपणे उभी राहिली. आईची जिद्दही वाखाणण्यासारखी आहे. मुलीप्रमाणेच लिंबूपाणी घेणे, लंघन करणे यासारखे उपचार ती घेते. तिच्यासोबत आश्रमात राहते, लेकीसाठी. तिला एककीपण भासू नये यासाठी. आईची ही धडपड संपूर्ण कथानकात प्रकर्षाने जाणवत राहते. तसाच डॉक्टरांनी दिलेला विश्वासही महत्त्वाचा ठरला.

लेखिकेने सांगितलेली ही गोष्ट सरळ सोप्या पद्धतीची आहे. काही केल्याचा अभिनिवेश नसून आत्मियतेचा भाग अधिक आहे. स्वतः निसर्गोपचाराचा डिप्लोमा केला, पुढे त्यातच एम.डी. केले. त्यामुळे या उपचार पद्धतीवर पूर्ण विश्वास. तरी या उपचार पद्धतीचा प्रचार आणि प्रसार करण्याचा शब्दही या कथानकात आलेला नाही हे विशेष!

काळजाचे लाल चित्र, त्यावर बहरलेली हिरवीगार पाने आणि खोडाच्या जागी दाखवलेली रुपकात्मक कन्या. पाठी ईसीजीसाठी वापरला जाणारा आलेखाचा कागद. सतीश खानविलकर यांची ही कल्पना शीर्षकाला आपलेसे करणारी आहे. त्यामुळे मुखपृष्ठ चटकन नजरेला साद घालते. अनुभव म्हणून वाचावे असे हे पुस्तक आहे.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**




''तुमच्या साहेबांना सांगा, मी मुख्यमंत्र्यांना बोलावलेलं नाही. ते स्वतः येत आहेत. कुत्र्यांनी न तपासलेल्या घरात यायला त्यांना भीती वाटत असेल, तर त्यांनी येऊ नये, माझा आग्रह नाही. तुम्हाला मी अडचणीत टाकत नाही. तुमच्या साहेबांना मला फोन करायला सांगा. मी त्यांच्याशी बोलेन.''माईने स्पष्ट सांगितले. माई म्हणजे सुनीता देशपांडे, जेव्हा पु.लं.च्या आजारपणात मुख्यमंत्री महोदय त्यांना घरी भेटायला येऊ पाहत होते.

पु.लं.च्या आजारपणाचा काळ आणि त्यांनी प्रयाग हॉस्पिटलमध्ये घेतलेली अखेरची विश्रांती, इथपर्यंतचा सगळा वृतांत 'दिनेश येईपर्यंत..' या लेखात आलेला आहे. 'बारा जूनचे लग्न' या लेखात पु.ल. आणि त्यावेळच्या सुनीता ठाकूर यांच्या आठ आण्याच्या खर्चात नोंदणी पद्धतीने पार पडलेल्या लग्नाची गोष्ट आहे. तर 'आमची माई' या लेखात सुनीताबाईच्या स्वभावाचे वेगवेगळे पैलू उलगडून दाखवलेले आहेत. पुल आणि सुनीताबाई यांच्याविषयीचे कुतूहल 'आहे मनोहर तरी' या सुनीताबाईंच्या पुस्तकामुळे वाचकांच्या मनात कायम आहेच. पुलंच्या आजारपणाच्या काळातल्या बातम्यांनी तर अख्खा महाराष्ट्र हळहळत होता. बाईच्या स्वभावाविषयीही अनेक प्रवाद पसरलेले होते. त्या साऱ्यांचा तपशील या लेखांमधून उलगडलेला आहे. लेखक हे बाईंचे बंधू असल्याने लेखात आलेला तपशील हा 'आहे मनोहर तरी' या पुस्तकाचाच एक भाग आहे, असे म्हणता येईल. त्यातला बारा जून हा दिवस मनाला चटका लावून जातो. कारण तो त्यांच्या लग्नाचा मंगल दिवस आहे; तसा तोच भाईंनी निरोप घेण्याचा दुःखद दिवस आहे.

एका चिंतनशील मनाने डोळस नजरेतून घेतलेला धांडोळा म्हणजे 'रत्नागिरी ते आइनस्टाइन' हे पुस्तक होय. यात चौदा लेख आहेत. हे सर्वच लेख वाचताना लक्षात येते की, लेखकाने त्या त्या विषयाचा सखोल आणि तितकाच तरलतेने वेध घेतलेला आहे. त्यामुळे केवळ हौसेखातर लिहिलेले वा वेळेची गरज पूर्ण करणारे तात्कालिक लेख, असे त्यांचे स्वरूप राहिलेले नाही. तर, कायम स्मरणात रेंगाळत राहावेत असे संदर्भमूल्य त्यांना लाभलेले आहे. 'मोठी राज्ये हवीत कशाला?' या लेखातला विचार पाहा, 'जर मोठे व्यावसायिक अतिमहत्त्वाच्या मुद्यावर भागधारकांची संमती घेणं आवश्यक मानतात, तसं जनतेचं सरकार चालवताना अतिमहत्त्वाच्या विषयावर लोकमत अजमावणं कठीण नाही.' या विचाराशी कुणी असहमत असेल असे वाटत नाही. 'रत्नागिरी' हे नाव येते तेव्हा गाव, तिथली माणसे, त्यांचे स्वभाव व वृत्ती, भवताल, व्यापार, निसर्ग आणि त्याचे वरदान, इतिहास अशा सर्व बाजूंनी लेखक तिच्या रूपाला सजवतात. आणि त्याचवेळी कागदोपत्री असलेला पुरावा देऊन सांगतात, रत्नागिरी हे नाव रूढ असले तरी तिचे अधिकृत नाव आहे 'रहाटागार.' 'विनोबांच्या सहवासात' हा लेख तर लेखकासाठी खूप मोठे अनुभवाचे संचित देणारा ठरावा. 'मराठी म्हणजे कोण?' 'मी लाच देत नाही, तुम्ही?' 'हे लढे कशासाठी?' या लेखांतील प्रश्न हे केवळ लेखकचे प्रश्न न राहता ते प्रत्येकाचे वाटतात. 'तुमची केस कठीण दिसते,' 'जगी या खास वेड्यांचा', 'आपण सारे आइनस्टाईन' या लेखांतून मांडलेले अनुभव आणि निरीक्षणे अंतर्मुख व्हायला लावतात. तर 'आइनस्टाइनची खोली आणि आपला इतिहास' या लेखातून उपरोधाची धार दिसून येते.

सर्वोत्तम ठाकूर हे गणित या विषयाचे प्राध्यापक. अमेरिकेत त्यांनी त्याच विषयाचे अध्यापन केले. आयबीएमसारख्या संगणक कंपनीचे प्रमुख म्हणून काम पाहिले. भारतात संगणकयुग येण्याकरता अथक प्रयत्न करणारे म्हणून सर्वांना परिचित. इतर अनेक मान्यवर संस्थांशी संलग्न. 'सांदिपनी गुरुकुल' संस्थेचे संस्थापक. आणि सुनीताबाईंचे बंधू म्हणजेच पुलंचे मेव्हणे ही त्याची ओळख. परंतु प्रस्तुत लेखसंग्रह वाचल्यानंतर त्यांची ओळख उरते ती, ते 'रत्नागिरी ते आइनस्टाइन' या पुस्तकाचे लेखक म्हणून. एक चांगले पुस्तक वाचल्याचा निखळ आनंद हे पुस्तक देते.

मुखपृष्ठावर रत्नागिरीचा सागरकिनारा आहे, सावरकरांचा वास्तव्याचा काळ इथेच होता म्हणून त्यांचा फोटो. आइनस्टाइन, पुल यांचे फोटो, लढ्यात उतरलेले तरुण, न्यायालयाचा दंडक, आणि पैशांची हातमिळवणी, अशा चौकटी एका गोलात सामावलेल्या आहेत. त्यावर भाष्य करणाऱ्या लेखणीचे टोक रोखलेले आहे. लेखातील विषयांशी जुळणाऱ्या चौकटीमुळे आतल्या संदर्भांची कल्पना यावी असे हे मुखपृष्ठ सजवले आहे सतीश खानविलकर यांनी. त्यामुळे पुस्तकाचे जणू प्रतिबिंब तळातून पृष्ठभागावर अवतरले आहे असे वाटते.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३




'प्राण्यात वैराची भावना नाही, सूडाची भावना नाही, युद्ध नाही. खरे कर्मयोगी प्राणी–पक्षीच असतात. सुगरण सुंदर घरटे बांधते पण पिल्ले घातली की , घरटे सोडून निघून जाते. प्राण्यांना कसलाही मोह नसतो, काळजी नसते, चिंता नसते, ते कसलाही संग्रह करीत नाहीत. माणूस आणि प्राणी यांच्यातील फरकामुळेच माणसापेक्षा आपण जंगलात जास्त रमलो.'

मारुतीराव चित्तमपल्ली यांचे हे मनोगत आहे. जंगल, पक्षी, प्राणी यांचा उल्लेख करताना मारुतीरावांना डावलून पुढे जाता येत नाही. त्यांच्या सहवासात ज्यांना जंगलाचा अभ्यास करण्याची संधी मिळाली, जंगलात भ्रमंती करता आली ते भाग्यवानच! प्रल्हाद जाधव हे त्यांपैकी एक. नागपूर–चंद्रपूरकडील नवेगाव, नागझिरा, मेळघाट जंगलात जी भ्रमंती केली, जे अनुभव टिपता आले, त्यावेळी त्यांना साथ आणि मार्गदर्शन मिळाले ते मारुतीरावांचे.

जंगलात फिरण्यासाठी कुठला एक काळ नसतो. प्रत्येक ऋतू वेगळा असतो. त्याची वेगवेगळी रूपे असतात. ती नुसतीच पाहायला मिळत नाहीत, तर ती काहीतरी आपल्याला शिकवून जातात. महाराष्ट्रात पस्तीस अभयारण्ये आणि सहा राष्ट्रीय उद्याने आहेत. दरवर्षी यापैकी एक पाहायचे म्हटले तरी चाळीस वर्षे लागतील, असे लेखक नमूद करतात. त्यापैकी काही जंगलांत शिरून त्याचे अंतरंग पाहण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी जो अनुभव आला, जी निरीक्षणे केली, त्यांची माहिती त्यांनी या पुस्तकात दिलेली आहे.

भीमाशंकर हे ज्योतिर्लिंगाचे एक ठिकाण. परंतु एक अरण्य म्हणूनही त्याचे महत्त्व आहेच. हे अरण्या प्रसिद्ध आहे ते 'शेकरू' नावाच्या प्राण्यासाठी. महाराष्ट्र शासनाने निसर्ग–मानचिन्ह म्हणून घोषित केलेला हा प्राणी म्हणजे मोठी खार. झुबकेदार लांबलचक शेपटी असणारी, वरून सोनेरी तांबूस तर पोटाच्या बाजूने पांढरा रंग असणारी, लालभडक गुंजेसारखे डोळे असणारी आणि झाडावरून जमिनीवर न उतरणारी मोठी खारुताई. तिच्या दर्शनासाठी लेखकाला बरीच पायपीट करावी लागली. याच अरण्यात आहेत 'कारवीची' बेटे. जी सात वर्षांतून एकदा फुलते.

नान्नज अभयारण्य प्रसिद्ध आहे माळढोक नावाच्या पक्ष्यासाठी. हक्काने राहतो आणि सहज नजरेला पडतो तो इथेच. वाघ जसा जंगलाच राजा, तसा माळढोक हा या माळाचा राजा. आपल्या सार्वभौमत्वाची त्याच्यातील प्रेरणा इतकी ओजस्वी आणि स्वयंभू आहे की त्यामुळेच तो कदाचित आपले अंडे घरट्यात न घालता उघड्या माळरानावर घालत असावा, असे लेखकाला वाटते. हा पक्षी म्हणजे शहामृगासारखा दिसाणारा राजबिंडा पक्षी. एक मीटरपर्यंत उंची. पंख पसरले तर अडीच मीटर रुंदी. वजन अठरा किलोपर्यंत. लेखक इतका अचूक तपशील देतात.

काळविटासाठी प्रसिद्ध ठिकाण म्हणजे अहमदनगर जिल्ह्यातील देऊळगाव–रेहेकुरी. काळवीट म्हणजे पाठीवर काळा तुकतुकीत रंग, पोटाच्या बाजूने पांढरा रंग, उंच वाढलेली पिळदार शिंगे आणि डोळ्याभोवती मोठे काळे भरीव वर्तुळ. काळवीट या नावाशी होणारी गफलतही लेखक नजरेत आणून देतात. काळविटाप्रमाणेच सांबर आणि चितळ हे दोन प्राणी आहेत. परंतु त्यांच्या शिंगाना फाटे असतात आणि ते दरवर्शी गळून पडतात. तीच गफलत चित्ता आणि बिबट्या यांच्या बाबतीतली. चित्त्याच्या अंगावरील ठिपके भरीव असतात तर बिबट्याच्या अंगावरील पोकळ असतात. रानकुत्र्यांना भुंकता येत नाही तर ते शीळ घालतात. माकडाला पोहता येते पण वानराला पोहता येत नाही. रानकुत्र्यांना झाडावरील वानराची शिकार करायची असेल तर वानर बसलेल्या झाडाखाली गोलगोल फिरत राहतात. त्याने ते भोवंडून खाली पडते. आयती शिकार होते. नवेगाव परिसरात पाणघोरपडी आहेत. त्या पाण्यात आणि झाडावरही राहू शकतात. हुमा जातीचे घुबड अनेक प्राण्यांचे आणि पक्ष्यांचे हुबेहुब आावाज काढू शकते. शिकाऱ्यांना घाबरवण्यासाठी व स्वतःचे रक्षण करण्यासाठी या कलेचा उपयोग होतो. पोपट आणि डोंगरी मैना हे दोन्ही पक्षी आपण शिकवू ते बोलतात. डोंगरी मैना आपल्याबरोबर गाणे म्हणू शकते. अशा कितीतरी नवीन माहितीचा रानमेवा लेखकाने या भ्रमंतीमध्ये गोळा गेला आहे. कुसुंब नावाचे वेगळे झाडही पाहिले. जे पंधरा ते बावीस मीटर उंच असून घनदाट पर्णसंभाराने नटलेले आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे उन्हाळ्यात याच्या पानाच्या टोकातून पाण्याचे तुषार बाहेर पडतात.

वाटा हरवल्या की भूल पडली म्हणतात. दिशा कळेनाशा होतात. रानभूल वाचताना आपल्याला सर्वच गोष्टीचां विसर पडतो. आपण त्यात स्वतःला हरवून जातो. जंगल आपल्यासमोर हजर होते की आपण जंगलात आहोत ते कळत नाही. प्राणी, पक्षी, झाडी, मासे, वारूळ, चांदणे, बांबू, निसर्गाची विविध रूपे, यांच्याशी एकरूप होतो. मारुती चित्तमपल्ली, विनूभाऊ काळे, माधवराव पाटील यांच्यासारख्यांचाही परिचय होतो आणि एक चांगली जंगलसफर केल्याचा आनंद मिळतो.

- **मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**




'आजच्या तरूण पिढीवर माझा प्रचंड विश्वास आहे. भविष्यात स्थैर्य आणि भरभराट आणण्याकरता ही पिढी फार महत्त्वाची आहे. म्हणूनच अजूनही वेळ गेलेली नाही. आजच असाध्य ते साध्य होऊ शकते, फक्त प्रयत्नाची जोड महत्त्वाची.'

डॉ. पी.एस.रामाणी यांनी व्यक्त केलेले हे विचार आहेत, त्यांच्या ग्रंथालीने नुकत्याच प्रकाशित केलेल्या पुस्तकात. त्याचे नाव आहे 'तणावमुक्त जीवन – तरुणांपुढील आव्हान.'

डॉक्टरांचा परिचय आपणास आहेच. एक प्रख्यात न्यूरो आणि स्पायनल सर्जन म्हणून, आणि दुसरा लेखक म्हणून. 'न्यूरोस्पायनल सर्जन असोसिएशन'चे अध्यक्ष, 'जागतिक आरोग्य संघटनेच्या स्पाइन कमिटी'चे चेअरमन असलेले डॉ. रामाणी याच विषयातील नियतकालिकांचे संपादक देखील आहेत. गेली चाळीस वर्षे भारतात स्पायनल सर्जरीचा विकास व्हावा म्हणून त्यांनी प्रयत्न केलेला आहे. इतका मोठा व्याप पाठीशी असतानाही त्यांच्या नावावर आजमितीस तब्बल ४२ प्रकाशित पुस्तकांची राशी जमा आहे. आणि ती बहुतेक सर्व त्यांच्याच विषयाशी संबंधित आहेत, तरीही ती सर्वांना उपयुक्त व मार्गदर्शक ठरावीत अशी आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे प्रस्तुतचे पुस्तक होय.

आजची तरुण पिढी आपापल्या क्षेत्रात झपाटल्यासारखी भरारी घेत आहे. नावलौकिक प्राप्त करीत आहेत. स्पर्धेत टिकून राहण्याची धडपड करत आहे. त्याचबरोबर पैसाही प्रचंड कमावण्याचे ध्येय ठेवून आहे. ही प्रगतीची, संपन्नतेची घोडदौड नक्कीच आशादायक आहे. वर्तमान आणि भविष्यकाळ यातील आर्थिक स्थैर्याचा पूल मजबूत करण्यासाठी ती आवश्यकही आहे. म्हणून या तरुणांची ही धावपळ, ओढाताण 'करिअर' या गोंडस नावाखाली वर्तमानाची गरज ठरल्यासारखी झाली आहे. पण... पण आरोग्याचं काय? शारीरिक, मानसिक, सामाजिक, आध्यात्मिक, कौटुंबिक आरोग्याचा वृक्ष पैसा नावाच्या उन्हात करपून जात आहे, त्याचे काय? हा वृक्ष आजच्या इतकाच बहारदार, डेरेदार आणि फुलाफळांनी लगडलेला दिसावा ही भविष्यकाळाची आस पूर्ण करणार कोण, हा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. आणि नुसता विचार नाही तर त्याच्यावर अंमल करण्याची गरज आहे. तीही आजच. उद्या नाही. हा आग्रह डॉ. रामाणी यांनी या पुस्तकात ठामपणे मांडला आहे. तो नुसता तरुणांसाठी आहे असे समजण्याचे कारण नाही. पालकांनीदेखील त्याकडे डोळसपणे पाहण्याची गरज आहे. नव्हे, ती त्यांची जबाबदारी आहे.

डॉ. रामाणी आज ७६ वर्षांचे आहेत. आजही ते जवळपास वर्षाकाठी चार मॅरेथॉन स्पर्धांमध्ये भाग घेतात. त्यांनी त्यांच्या प्रांतात मिळवलेला लौकिक जागतिक स्तरावरचा आहे. यापाठी आहे त्यांची शिस्त, कार्यक्षमता, स्वयंप्रेरणा, निर्णय घेण्याची पद्धत/ व्यवस्थापन, धोरण, धाडस, संवादचातुर्य, पुढाकार घेण्याची वृती आणि कुवत. या अनुभवाचे संचित केवळ आपल्यापुरते बंदिस्त न ठेवता ते इतरांना सांगावे, इतरांनाही आपल्यासोबत आरोग्यमय जीवन जगण्याचा आनंद मिळावा, या हेतूने या पुस्तकाचे लेखन झाले आहे. आणि ते आजच्या धडीला तितकेच महत्त्वाचे देखील आहे. यात डॉक्टर म्हणून आलेले अनुभवही आहेतच. त्यामुळे प्रयोगशाळेत सिद्ध झालेल्या निष्कर्षांचे हे साध्य आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये. जीवनात आनंद फुलला पाहिजे, तो फुललेला पाहताना इतरांनाही आनंद वाटला पाहिजे, हे समजून घेण्यासारखे आहे. गरज आहे ती त्यांनी केलेल्या सूचना पाळण्याची, अंगिकारण्याची.

सदरचे पुस्तक आपल्यासमोर आले आहे ते लेखसंग्रहाच्या रूपाने. हे लेख अनुभवाच्या मुशीतून निघालेले असल्याने त्यांचा अस्सलपणा थेट मनाला भिडणारा आहे. निष्णात शस्त्रक्रियेइतकाच लेखणीचा सराईतपणा ही डॉक्टरांची खासियत. यात नुसतेच उपदेशाचे डोस नाहीत, तर उपायांची मात्राही विषयानुरूप दिलेली आहे. तीही सोप्या पद्धतीने. दैनंदिनीत तिचा उपयोग करून घ्यावा अशी लेखक म्हणून त्यांची तळमळ यातून दिसून येते. त्यासाठी काही नामवंतांची उदाहरणेही दिलेली आहेत. समर्पक संतवचनांची अवतरणे दिलेली आहेत. त्यामुळे वैश्विक आध्यात्मिकता यांची जोड लेखांना लाभली आहे.

डॉ. रामाणी यांची आरोग्यावरील सर्वच पुस्तके वाचकांच्या पसंतीला उतरलेली आहेत, त्यांच्या आवृत्तीच्या संख्येवरून हे सगळ्याच्या ध्यानात आहे. तसाच हा प्रस्तुतचा लेखसंग्रहही वाचकांच्या पसंतीला उतरल्याशिवाय राहणार नाही.

- **मूल्य १३० रु. सवलतीत ८० रु.**



# ग्रंथपान

'अचानक आकाशात ढगांची प्रचंड उतरंड कोसळू लागली एकमेकांवर. पृथ्वीवरल्या खंडापेक्षाही मोठाले ढग. त्यांनी एकदम रेटारेटी सुरू केली. ते रंगाने काळनिळे पडू लागले. आता समुद्र, आकाश सारेच काळसर झाले होते. एकदम त्या अंधारात एखादी ठिणगी पडावी तशी एक लालभडक रेष आकाशात उमटली आणि एकदम पृथ्वीच्या दक्षिण क्षितिजाकडून उत्तरेकडे फराटा ओढल्यासारखी ती रक्तरेखा, आमच्या डोक्यावरून सरसर जाऊ लागली. मी अशा रंगाची वीज कधीही पाहिली नाही.' हा थरारक आणि तितकाच विलोभनीय अनुभव आहे एका भ्रमंतीचा, सागरावरील. जो घेतला आहे दीपक करंजीकर यांनी. त्यांच्या या लेखाचा समावेश आहे तो 'हिंडता फिरता' या पुस्तकात. ज्याचे संपादन केले आहे, ऋतुरंगचे संपादक अरुण शेवते यांनी.

**हिंडताफिरता**

संपादन : अरुण शेवते



'भ्रंमती' या विषयाला वाहिलेला हा लेख–संग्रह आहे. पुस्तकाचे नाव आले ते त्याप्रमाणे. मुळातला हा याच विषयाला वाहिलेला दिवाळी अंक, ऋतुरंगचा. अरुण शेवते यांची ती खासियत आहे. दिवाळी अंक काढायचा तो बहारदार, पण एक विषय घेऊन. त्यांचा हा चोखंदळपणा रसिकांनाही चांगलाच भावलेला. त्यांच्या प्रत्येक अंकाला रसिकांनी दाद दिली, तीही अगदी ओंजळ भरभरून. 'बापलेक' हा विषय आपणास आठवत असणार, नक्कीच. धागा तोच, फुले वेगवेगळी, ताजी आणि मन प्रसन्न करणारी. ही गुंफण सुरूच आहे, अगदी १९९३ पासून. त्यातला हा एक हार, 'हिंडता फिरता'.

भ्रमंती म्हणजे हिंडणे, फिरणे, प्रवास करणे म्हणजे स्थानांतर करणे, या अर्थाने आपणास माहीत असलेला हा शब्द. त्याप्रमाणे केलेल्या प्रवासांची वर्णने या लेखांमधून वाचायला मिळतात. हा प्रवास आहे लोकल ट्रेनचा, विमानाचा, जहाजाचा, रणगाड्याचा, सायकलचा... मुंबईच्या चेंबूरपासून हिमालयापर्यंतचा. निकोबार, लक्षद्वीपपासून ब्राझील, अमेरिकेपर्यंतचा. हा नुसता प्रवास नाही, तर सोबत आहे तिथला निसर्ग, विविध रूपांत नटलेला. माणसाला आपल्यात सामावून घेणारा, माणसाला भरभरून देणारा. माणसे आहेत आपुलीच्या धाग्यात बांधलेली, आपल्याला माणूसपणाची ओळख देणारी, तर कधी फजितीला सामोरे जायला लावणारी. पण हे पुस्तक वाचल्यानंतर लक्षात येते, एवढीच त्याची मर्यादा नाही. हा प्रवास आहे, मनामनाचा. लेखणीचा, प्रतिभेचा, राजकारणाचा, सामाजिकतेचा. देशांतराचा. सतीश काळसेकरांना भटकंती ही जगण्याचा एक भाग वाटतो, अपरिहार्य. गुलजारांची लेखणी मागोवा घेत राहते प्रवासाच्या प्रत्येक टप्प्याचा, अलवार मनाने. कुमार केतकर हे नुसतेच विश्लेषणातून अमेरिकेचा राजकीय प्रवास घडवत नाहीत, तर तिथल्या भारतीयांच्या स्वप्नाचाही प्रवास घडवतात. विजय कुवळेकर प्रवास घडवतात, करुणानिधी, नंबुद्रीपाद, ए.के. अॅटनी यांसारख्या दक्षिणेतल्या राजकारणातल्या माणसांचा. द.वि. अत्रे यांचा प्रवास आहे, कुष्ठरोगी माणसांना माणसात आणण्याचा, माणसाने माणसाला ओळखण्याचा. असे अनेक अनुभव या निमित्ताने आपणास यात वाचायला मिळतात.

या पुस्तकातील लेख साकारलेले आहेत ते अनुभवसंपन्न आणि सिद्धहस्त लेखकांच्या लेखणीतून. रविमुकुल, गिरीश कुबेर, राजीव खांडेकर, प्रदीप म्हापसेकर, दीपक घारे, सुनंदा भोसेकर अशी ही काही आणखी नावे. आपापल्या क्षेत्रात दबदबा असलेली. त्यांची भ्रमंती ही उत्कट अनुभवांची मेजवानी. त्यामुळे सगळेच लेख वाचकांना आपल्याशी हितगुज करायला लावतात. त्यांच्यातली विविधता 'अराउंड दी वर्ल्ड 'ची सफर केल्याचा आनंद देतात. आपले दैनंदिन जगणे आणि भ्रमंतीमुळे अनुभवास येणारे जगणे किती वेगळे असते याचा प्रत्यय देतात. शेवते यांच्या शब्दांत सांगायचे तर, 'भ्रमंतीत माणूस कधी एकटा असत नाही. भ्रमंतीतून निखळ आनंद मिळतो. आयुष्य समृद्धीकडे नेणारा भ्रमंती हा एक राजमार्ग आहे.'

सतीश भावसार हे चित्रकार आहेत तसे लेखकही आहेत. त्यांनी केलेला सायकल प्रवास जसा अद्भुत म्हणायचा, तशी आतील रेखाचित्रे आणि मुखपृष्ठ. हे पुस्तक वाचल्यानंतर कुणाला अशा भ्रमंतीवर निघण्याची प्रेरणा झाली तर नवल वाटायला नको.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**



# ग्रंथपान




''दीपक राग केवळ आरोह, अवरोह आणि पकड कळल्याने सिद्ध होत नाही. रागाची बढत करताना त्यात जीव ओतावा लागतो. प्रामाणिक प्रयत्नांती राग सिद्ध झाला आणि आपोआप दीप प्रकट झाले तर, राग आळवणे संपले की हे दीप हळूहळू मंद होत जातात. काही वेळाने आपसूक विझून जातात. पण या रागाच्या गायनाने गायकाच्या देहात गूढ आणि आपसूक न शमणारा देहदाह उसळतो. तो गायकाच्या देहात मुरतो. समर्थ गायकाने आळवलेल्या मेघमल्हार रागात बरसलेल्या जलधाराच तो शमवू शकतात.''

'दीप राग' आणि 'मेघमल्हार' या दोन रागांच्या सिद्धतेभोवती गुंफलेले हे कथानक म्हणजे 'सावन घन बरसे' ही कादंबरी. तानसेन हा अकबराच्या दरबारातील नऊ रत्नांपैकी एक, संगीतसूर्य. तानसेन हे या कादंबरीच्या मध्यभागी असलेले व्यक्तिमत्त्व. एक अग्निपरीक्षा घेणारी घटना त्याच्या आयुष्यात येते, दीप राग आळवण्याची. अकबराची मर्जी आणि मत्सरकेतूंच्या आग्रहापायी त्याला या दिव्याला सामोरे जावे लागते. परिणामी देहदाहाच्या दीपशिखा मिरवत दरबार सोडण्याची वेळ येते. या ज्वाळांवर मेघमल्हाराची बरसात करणाऱ्या ताना-रिरी त्याला शर्मिष्ठा सरोवराच्या काठी भेटतात. आणि त्याचा पुनर्जन्म होतो. हा या कादंबरीचा गुंफणवीण करणारा धागा. त्यामुळे तानसेन ऊर्फ त्रिलोचन मकरंद पंड्या, त्याची मुलगी सरस्वती, पुत्र बिलासखान यांचे तपशील यात येतात. तानसेन अकबराच्या दरबारात होता म्हणून अकबर, बिरबल यांचे चित्रण अपरिहार्य ठरते. परंतु तानसेनाला पुनर्जन्म देणाऱ्या ताना आणि रिरी या भगिनीही या कथानकातील महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आहेत. त्या नुसत्याच लावण्याच्या खणी नाहीत, तर संगीतसाधनेतील त्यांची आराधनादेखील तानसेनापेक्षा कुठेही कमी नाही. म्हणूनच तानसेनला यमसदनास नेण्यास येत असताना मृत्यूला दूर ढकलणाऱ्या ताना - रिरी यांचे यश तानसेनच्या यशाहून उजवे ठरावयास हवे होते असे लेखिकेला वाटत राहते. या भगिनींचे कूळ मंडलेश्वराचे. वडनगरचे मंडलेश्वर. त्यांचे घराणे, आई भक्तिबा, पुत्र नीळकंठ, लोकेश, सुकन्या ताना आणि रिरी यांचाही इतिहास येतो. ते ज्या वडनगरमध्ये राहतात, तिथला इतिहास येतो. सुराष्ट्रातील, गुजरातमधील आजचे सौराष्ट्र, यातील हे वडनगर.

या कथानकाचे बीज सापडले आणि प्रत्यक्षात ते या पुस्तकरूपात सिद्ध झाले, यामधला काळ आहे पन्नास वर्षांचा. संशोधनात्मक लेखन करताना किती आणि कशी धडपड करावी लागते याचे मर्मग्राही वर्णन लेखिकेने त्यांच्या मनोगतात केलेले आहे. तसेच या कथानकाचा काळ जरी अकबराच्या कारकिर्दीचा असला तरी प्रत्यक्षात घेतलेला शोध अकराव्या शतकापासूनचा आहे. त्याची मांडणी करताना कथानकाचा आत्मा हरवणार नाही याची काळजी घेणे महत्त्वाचे ठरते. त्यासाठी त्यानी पारंपरिक ऐतिहासिक कादंबरीची मांडणी स्वीकारली नाही. तर पूर्वीची नांदी, पूर्वभूमिका, उपोदघात, उपसंहार अशी पद्धती स्वीकारली. अकबराच्या दरबारातील वा महालातील वातावरणासाठी उर्दू आणि वडनगरसाठी गुजराती या भाषेतील शब्दांचा साज चढवण्यात आलेला आहे. यात लय आणि सहजता यांचा तोल सांभाळलेला आहे. आवश्यक तेथे पृष्ठांवर तळटीपा देण्याचे औचित्य दाखवलेले आहे. 'सिंहने कोण कहे के तारु मों गंधाय', 'महायात्राए नीकळेल यात्रिकनो मर्या जिव्यानो आखरी जुहार!' यासारखी वाक्ये त्याची उदाहरणे होत.

'दीप राग' आणि 'मेघमल्हार राग' यांची महती सांगताना संगीतातील स्वर, लिपी, पकड, राग, पदे यांचाही अभ्यास लेखिकेने केला आहे हे सखोल तपशिलावरून लक्षात येते. सोमनाथ महादेवविषयीचे परिशिष्टचे सोबत जोडले आहे. वडनगरचे काही फोटो दिले आहेत. शर्मिष्ठा तलाव, ताना-रिरी यांची समाधी, हाटकेश्वराचे मंदिर यांच्याविषयी वाचताना या प्रदेशाला भेट देण्याचा विचार नकळत जागृत होतो. 'माई म्हारो दीपक बुझावो' या वाक्यातील आर्तता काळजाला भिडणारी ठरते. तशी स्त्रियांच्या कर्तृत्वाकडे सजगतेने पाहण्याची भूमिका समाजाने घ्यावी ही लेखिकेची रास्त अपेक्षाही अधोरेखित होते.

स्मिता भागवत यांचे नाव साहित्याच्या प्रांगणात सगळ्यांनाच परिचित आहे. त्यांच्या नावावर असलेली ग्रंथसंपदा म्हणजे भांडारच म्हणावे लागेल. मराठीसोबतच गुजराती, हिंदी आणि इंग्रजी अशा चारही भाषांत त्यांची पुस्तके आहेत. 'सावन घन बरसे' हे पुस्तक त्यांच्या लेखनव्रतावर शिक्कामोर्तब ठरावे. सतीश भावसार यांचे मुखपृष्ठही छान झाले आहे.

- **मूल्य ५०० रु. सवलतीत ३०० रु.**



# ग्रंथपान

## दत्तकवेणा
प्रगती कोळगे




'मूल ॲडॉप्ट करणं, ते निभावणं आणि सर्वांना सुखदायी करणं ही प्रक्रिया वरवर दिसते तेवढी सोपी नाही. हा नातेसंबंध आहे ज्यामध्ये आईवडील आणि मुलं आपण काही गमावल्याचं, आपल्या हातून काहीतरी निसटल्याचं दुःख घेऊनच एकमेकाजवळ येतात. आईवडिलांना आपण आपल्या वंशाचं मूल जन्माला घालू न शकल्याचं दुःख; तर मुलाला स्वतः जन्मदात्या आईवडिलांपासून दुरावल्याचं दुःख. ह्या दरीला पार करून हा नातेसंबंध जोडायचा आणि निभावायचा आहे.'

'दत्तकवेणा' या पुस्तकात व्यक्त केलेले हे मत. मुळातच दत्तक हा विषय बराचसा अवघड. भावनिक, मानसिक, कौटुंबिक आणि सामाजिक मनोदौर्बल्याच्या स्तरावर हिंदोळे खेळणारा. माणसागणिक मतमतांरांची घडी उलगडणारा. अशा अवघड विषयाचे अंतरंग उलगडून दाखविण्याचा प्रयत्न लेखिकेने या पुस्तकात केलेला आहे. त्याची सुरुवातच त्यांनी केली ती, दत्तक की ॲडॉप्शन? या प्रश्नापासून. 'दत्तक' म्हणजे आपल्याच रक्तातले बाळ किंवा नातेवाईकांचे बाळ कायद्याच्या मदतीने सर्वार्थाने आपले करणे. तर आपण जे अनाथालयातून एखादे बाळ आपलेसे करून स्वीकारतो त्याला 'ॲडॉप्शन' हाच शब्द वापरतात. तरी जनमानसात रूढ झालेला शब्द 'दत्तकच.'

मूल दत्तक घेणाऱ्या पालकांचा एक वर्ग असतो. साधारणतः ज्यांना स्वतःचं मूल जन्माला घालणे काही कारणांनी अशक्य असते, तो. परंतु असाही एक वर्ग आहे, ज्यांना स्वतःच्या मुलाऐवजी अनाथालयातील मूल दत्तक घ्यायचे आहे. लेखिकेने दुसऱ्या वर्गातील पालकाचा पक्ष घेतलेला आहे. कुणा एका घर नसलेल्या बालिकेला घर मिळवून द्यायचे, आपले हक्काचे, प्रेमाचे कुटुंब मिळवून द्यायचे व त्या बदल्यात आपल्याला आपल्या बाळाचे हक्काचे प्रेम मिळवून घ्यायचे, हा हेतू ठामपणे मनाशी ठरवलेल्या पालकांचा पक्ष. त्यातून शोध सुरू होतो, तेव्हा लक्षात येते, यासाठीही काही नियम आहेत, अटी आहेत आणि प्रतीक्षाही आहे. दिल्लीची सेंट्रल ॲडॉप्शन रिसोर्स एजन्सी (कारा) ही परदेशवासीयांना मूल दत्तक देऊ शकणारी संस्था. तिचे नियम म्हणजे, भारतीयांना प्राधान्य, परदेशी असेल तर त्यांचे भारतातील वास्तव्य दोन वर्षाचे आवश्यक, किमान वय ४० वर्षापुढील असावे आणि ज्यांना नैसर्गिकरीत्या स्वतःचे मूल होणार नाही, त्यांनाच दत्तक मूल घेता येते. या नियमात न बसणारे पालक हे कथासूत्रातील मुख्य पात्र. तरीही ते आपल्या निर्णयावर ठाम. त्यातून या विषयाचे अनेक पदर उलगडत जातात. अनाथालयातून मूल घेणे याबाबत अनेक मतभेद. अशा मुलांचा वंश, वृत्ती, मानसिकता, त्यांच्याकडे पाहण्याची समाजाची नजर, भविष्यात येणारे संभाव्य धोके, आपसातल्या नात्यातील रक्ताच्या मुलात आणि या मुलामध्ये येणारी अलिप्तता – भेदभाव, कौतुकाचा फरक, जिव्हाळा, ही त्यांची कारणे.

दुसरा मुद्दा लेखिकेने उपस्थित केला आहे तो सत्य सांगण्याचा. दत्तक मुलाला, तू 'दत्तक' आहेस, हे सांगावे का? आणि सांगायचे तर ते कोणत्या वयात? त्याचे परिणाम काय होतील? सांगितले नाही तर त्याचे परिणाम काय होतील? सत्य कळल्यानंतर दत्तक मुलाचा ओढा पालनकर्त्या आई–वडिलांकडे राहील की जन्मदात्यांच्या शोधाकडे? त्याचवेळी दत्तक घेणारे पालक भीतीच्या दडपणाखाली येतील का? या प्रश्नांच्या अनुषंगाने उत्तरे शोधण्याचा देखील प्रयत्न लेखिकेने केलेला आहे. तसाच एक मुद्दा, मुलगा दत्तक घ्यावा की मुलगी? लेखिकेने धरलेला आग्रह हा मुलीचा आहे. त्या पाठची भूमिकाही लेखिकेने आग्रहाने प्रतिपादन केली आहे.

या विषयाला जोडून मानसशास्त्रीय दृष्टिकोण स्पष्ट करणारे डॉ. अनघा बर्वे यांचे निवेदन परिशिष्ट म्हणून सोबत जोडले आहे. समाजात याचा प्रचार आणि प्रसार होत आहे, अजून सकारात्मक जागृती व्हावी ही लेखिकेची तळमळ निवेदन आणि मनोगतातून व्यक्त झाली आहे. विषयाला पुढे नेताना व रंजकता कायम राहावी यासाठी लेखिकेने काही ठिकाणी उदाहरणे, आठवणी, संवाद यांचा आधार घेतला आहे. समाजमन समजून घेण्यासाठी चर्चा, गप्पा, बैठका यातून हा विषय चर्चेच्या केंद्रस्थानी ठेवला. फ्लॅशबॅक पद्धतीचाही उपयोग केला आहे. 'कृष्णदेवा, तुलाही आम्ही यशोदामय्याचा दत्तकपुत्र मानायचा का? आणि सांग, कर्णाला कळलं की तोही कुंतीमातेचाच मुलगा आहे, त्यावेळी त्याच्या मनाला नेमकं काय वाटलं होतं रे?' असे प्रश्न विचारून लेखिका वाचकालाच अंतर्मुख करते. मातापुत्राचे शिल्प आणि त्याभोवती रुंजी घालणारे सप्तरंगी फुलपाखरू, मनोज आचार्य यांच्या या कल्पनेतून साकारलेले मुखपृष्ठ छानच!

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

बाह्य आक्रमणापासून बचाव होण्यासाठी आपल्या शरीरात प्रतिद्रव्ये निर्माण केली जातात. ती बाहेरून आलेल्या जंतूना नष्ट करायला मदत करतात. बाह्य प्रतिकारासाठी तयार झालेली प्रतिद्रव्ये स्वादुपिंडातील बीटापेशींना आक्रमक समजून नष्ट करतात.व इन्सुलिन उत्पादन ठप्प होते. इन्सुलिनअभावी रक्तातील साखर पेशींच्या आत वापरासाठी न पोहोचता, रक्तात साचून राहते व रक्ताचा प्रसरण दाब वाढवते. रक्तातील वाढलेल्या साखरेचा थर सूक्ष्म रक्तवाहिन्यांवर साचून , त्या कमजोर होतात. नसांच्यावरही परिणाम होऊन संवेदना कमी होतात व विपरीत होतात... लघवीचे प्रमाण वाढते... डोळे, मूत्रपिंड, पाय, यात विकृती निर्माण होतात. ही सर्वसाधारणपणे शरीरशास्त्रीय कारणे व परिणाम बहुतेकांना 'मधुमेह' या आजाराच्या निमित्ताने ठाऊक झालेले आहेत. यावर जे काही उपाय अलीकडील काळात योजण्यात येतात, त्यात इन्सुलिनचा वापर बऱ्याच प्रमाणात अधिक आहे. या इन्सुलिनचा शोध कसा लागला याची माहिती देणारे पुस्तक म्हणजे 'कथा इन्सुलिनच्या शोधाची' होय. त्याचे लेखक आहेत डॉ. विजय श्री. आजगांवकर.




कुठलाही शोध हा प्राथमिक पातळीवर असतो, तेव्हा त्यातील यशापेक्षा अपयशाची मालिका मोठी असते. लागणारे साहित्य, भांडवल, जागा, सहकारी यांच्या समस्या असतील तर ही मालिका दीर्घकालीन ठरू शकते. तरीही निष्कर्षाला गवसणी घालता येते. हवी फक्त चिंकाटी, जिद्द आणि समर्पणवृत्ती. ती वृत्ती ज्याच्याकडे होती त्याचे नाव आहे, फ्रेडेरिक बँटिंग. वैद्यकीय मासिकात मधुमेह या विषयावरील प्रा.बॅरन यांचा लेख त्याच्या वाचनात आला. स्वादुपिंड आणि मधुमेह यांचा संबंध लक्षात आला. त्यातूनच स्वादुपिंडापासून अर्क काढण्याच्या विचाराने त्याला पछाडले. त्यासाठी तो टोरोंटो विद्यापीठातील प्रा. मॅक्लिऑडना भेटला. त्यांच्यामुळे जागा, साहित्य आणि सहकारी यांची मदत झाली. मार्गदर्शन मिळाले. अनेक अडचणींतून मार्ग काढत निष्कर्षापर्यंत हात पोहचले. शरीरात असलेला स्वादुपिंड संपूर्ण काढल्यास मधुमेह होतो. स्वादुपिंडाचा अर्क शरीरात टोचला तर मधुमेहावर नियंत्रण ठेवता येते. या अर्काला नाव ठेवले इन्सुलिन!

या शोधासाठी प्रा.जॉन जे. आर. मॅक्लिऑड, प्रा. जेम्स बर्ट्राम कॉलिप आणि चार्ल्स बेस्ट यांचे लाभलेले साहाय्य मोठेच होते. त्यामुळेच फ्रेडरिक बँटिंगला संशोधनाच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहचता आले. नोबेल पारितोषिकाचा सन्मान प्राप्त झाला. वरवर पाहता ही एका संशोधनाची कथा वाटेल. परंतु ती नेहमीच्या पद्धतीने लिहिण्याचा मोह लेखकाने टाळला आहे. लेखनासाठी कथेचे तंत्र वापरले आहे. प्रत्येक पात्राची माहिती, त्याचा स्वभाव, त्याचे निवेदन, त्याला जाणवणारा एकमेकाविषयीचा गुणदोष, संशोधनाच्या प्रत्येक टप्प्यावरील मानसिकता, स्वतःच्या निर्णयाचा वाटणारा ठामपणा, यामुळे ही चार पात्रे ठळकपणे सजीवस्वरुपात वाचकांच्या समोर उभी राहतात. स्वगतासारखी मनोगते व्यक्त करत संशोधनाचे कथानक पुढे नेतात. बँटिंगची आर्थिक ओढाताण, उद्‌वस्त झालेली कौटुंबिक स्वप्ने, त्याच्या बोलण्यातला सडेतोडपणा, प्रा. मॅक्लिऑड विषयी वाटणारा द्वेष, चार्ल्स बेस्टविषयी वाटणारी कृतज्ञता, यामुळे बँटिंगचे व्यक्तिमत्त्व नाटकातल्या पात्राप्रमाणे ठळकपणे उभे राहते. प्रा. मॅक्लिऑडचा अधिकार, वेगवेगळ्या टप्प्यावर त्याने घेतलेली भूमिका, बेस्ट आणि कॉलिपने दाखवलेली चिकाटी आणि मनाचा निर्भेळपणा, यामुळे ही सगळीच संशोधकमंडळी आपापल्या परीने उजवी ठरली आहेत. त्यांचे वेगळेपण लेखकाने जपले आहे. त्यामुळेच या शोधाला कथेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

शोधाचा पूर्वभाग, टोरोंटो संघाचे चार शिलेदार, मनोगते अशी विषयाची विभागणी केली आहे. सुरुवातीचे प्रयोग का फसले याची परिशिष्टात कारणे दिलेली आहेत. इन्सुलिनच्या शोधातील शुद्धता, तीव्रता, मापदंड, स्रोत, कल्प, मूलभूत संशोधन आणि इन्सुलिन देण्याच्या पद्धती व प्रभाव यांची माहिती दुसऱ्या परिशिष्टात दिलेली आहे. विषय संशोधनाचा असल्याने इंग्रजी शब्दांची सूची लांबलचक नाही. आवश्यक तेथेच कंसात दिलेले आहेत. लेखकाचे विषयावर असलेले प्रभुत्व लेखनात आलेल्या सफाईदारपणातून लक्षात येते. प्रयोगशाळेचे चित्र असलेले मुखपृष्ठ आकर्षक झाले आहे.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

## एक दिवस जीवनातला
नीला सत्यनारायण




जंगलांचे सौंदर्य आणि ऐश्वर्याचा अनुभव घ्यायचा तर जंगलात जायला हवे. जगण्याची अनुभूती घ्यायची तरी जंगलात जायला हवे. आणि 'स्व'चा शोध घ्यायचा तरी जंगलातच जायला हवे. जंगल म्हणजे नुसते झाडाझुडपांनी वेढलेले रान नाही. जंगल म्हणजे नुसते प्राणी, पक्षी यांचे आश्रयस्थान नाही. जंगल मनाची समृद्धी दाखवणारा कुबेराचा वारसदार आहे. जंगल आपल्यालाच आपली ओळख करून देणारा आदिम पुरुष आहे. अधात्म शोधण्यासाठी हिमालयात जाण्याची गरज नाही. साक्षात अध्यात्माचा साक्षात्कार आणि आत्मिक शोधाचे स्थान कुठे असेल तर ते आहे जंगलात. या जंगलाचा अनुभव घेतला आहे नीला सत्यनारायण यांनी. त्यांचे अनुभवाचे बोल शब्दरूपाने उतरले आहेत, 'एक दिवस 'जी'वनातला या पुस्तकात.

हे पुस्तक म्हणजे नुसते प्रवासवर्णन नाही किंवा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याचा पाहणी अहवाल नाही. हे आहेत एका हळुवार मनाच्या कवयित्रीचे लोभस काव्यमय शैलीत लिहिलेले अनुभवाचे बोल. पाहा; पानगळीच्या मोसमातील झाडे दिसतात तेव्हा ती भासू लागतात, विरक्त झालेली. समर्पणाची भावना असलेली. विश्वाच्या नियंत्यापुढे झुकलेली. ते जणू त्यांचे वार्धक्य होते, सहज तरी सुंदर. त्यांच्या निर्वस्त्रपणात नव्हती अश्लीलता, होते परिपक्व वैराग्य. सागाच्या झाडाच्या खालून जाताना वाटत राहते, आपला प्रवास सुखकर व्हावा यासाठी त्यांनी उन्हाला वर आपल्या शिरावर पेलून धरले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंची झाडे आपल्या फांद्या ताणून एकमेकींना आलिंगन देत आहेत. त्यांच्या कमानीखालून जाताना आपण राजघराण्यातले आहोत असा भास होत राहावा. रस्ताभर चवऱ्या ढाळत असलेले भालदार-चोपदार पानांच्या पायघड्या घालतात आणि हिरव्या रंगांची चौफेर उधळण करतात.

या सफरीत एखादे हरिणी भेटते, गर्भातच पाडस मृत झालेली. जिची वनरक्षकानी सिझेरीयन करून सुटका केली आहे. तिच्या डोळ्यात असलेला पाडसाचा शोध लेखिकेला हेलावून सोडतो. एका डोळ्यात मोतीबिंदू झालेली बिबट्याची मादी विहिरीत पडली. तिला वाचवण्यात यश आले. परंतु पुन्हा तसे होऊ नये म्हणून तिच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया करता येईल का, ही वाटणारी काळजी लेखिकेला अस्वस्थ करते. जंगलात अनेक पशु-पक्षी भेटतात परंतु वाघाचे दर्शन होत नाही, हे शल्य अनेक जंगलं पायी घालूनही कायम राहते. तेव्हा वाटणारी हूरहूर आणि ध्यानीमनी नसताना डरकाळी फोडीत एक देखणा वाघ हजर होतो, तेव्हाचा गगनात न मावणारा आनंद, हे दोन्ही भाव लेखिका मनापासून व्यक्त करतात. हत्तींना गूळ- भात भरवण्याच्या प्रसंगी उडालेली गाळण, साडेतेरा फूट लांबीचा नाग पाहून मनातून दचकणे, त्या मनमोकळेपणे कबूल करतात. वारूळ दिसताच, त्यात तपस्वी असेल का, असा विचार त्यांच्या मनात डोकावतो.

लेखिका या प्रशासकीय सेवेतील अधिकारी होत्या. वनविभागाचे खाते त्यांच्या कक्षेत होते. तेव्हा नुसते कार्यालयात बसून निर्णय न घेता, प्रत्यक्ष भेट देऊन या विभागात काही करता येईल का, या उद्देशाने त्यानी जंगलांना भेटी दिल्या. संपूर्ण महाराष्ट्रातील जंगले, डोंगर यांची पाहणी केली. मुंबईचे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, शिवडी, पारसिक, चंद्रपूर, ताडोबा, नागाव, कर्नाळा, महाबळेश्वर, नागझिरा, नवेगाव, पेंच, सिंधुदुर्ग, कान्हा ही काही ठिकाणे. त्याशिवाय त्यांनी हैदराबाद, आल्पस्, सिंगापूर, आफ्रिकन सॅव्हाना, दक्षिण आफ्रिका या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ठिकाणांचीही सफर केली आणि अनुपम सौंदर्याचा खजिना लुटला. आपले तरल अनुभवांचे भांडार समृद्ध केले. प्राणी, पक्षी, झाडे, डोंगर, ऋतू, माणसे, घरे, प्रवास, जे जे दिसले, जसे भावले, ते अलगद आणि अचूक टिपले. त्या अनुभवांचे संचित म्हणजे हे पुस्तक होय. अगदी मोजक्या शब्दांत, परंतु शब्द असे, दवात न्हालेले, चांदण्यात विसावलेले आणि प्रतिभेचा साज ल्यालेले. लेखिका उत्तम कवयित्री आहेत. मराठी, हिंदी अशा दोन्ही भाषांत त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. मातीची मने, अग्निपुष्प, आषाढमेघ, आकाश पेलताना, अमृत वर्षा हे त्यांचे काही कवितासंग्रह. या कवितासंग्रहाइतकेच संवेदनशील मनाने लिहिलेले हे पुस्तक म्हणजे गद्यमय कविताच होय.

पुस्तकाची निर्मिती हा स्वतंत्र विषय म्हणावा लागेल. विषयाला साजेशी ही निर्मिती आहे. वापरलेला कागद हा आर्टपेपर आहे. वाघ, हत्ती, कांचनमृग, बारासिंगा, गेंडा यासारखे अनेक प्राणी; मोर, रोहित पक्षी, मत्स्य गरूड यासारखे अनेक पक्षी; जंगल, डोंगर, कारवीचे फूल, वाघांच्या पावलांचे ठसे, तलाव अशी अनेक फोटोंची भुरळ घालणारी मालिका या पुस्तकात गुंफलेली आहे. या प्रवासात कवितांना साद न घातली गेली तर जंगलाचे थोरपण ते काय? तर अशा कविताही आपल्या भेटीला येतात. मुखपृष्ठाला डायरीचा साज चढवलेला आहे, तर मलपृष्ठावर आहेत ऐटीत उभे असलेले वाघोबा. त्यामुळे पुस्तक हातात घेताच त्याच्या कुळाची कल्पना येते.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

## ग्रंथपान

### माझं जन्मघर
संपादन : अरुण शेवते




'प्रत्येक घरात आपल्या मनात एक संस्काराचे बीज पडत असते. त्या बीजाचे झाड करणे आपल्या हातात असते. '

'समईत वात जशी भिजते तशी मी संसारात भिजलेच नाही. म्हणजे संसारात होते, पण तरीही माझ्याच भोवऱ्यात गरगरत होते.'

'संगीतात जशी आवर्तनं असतात तसेच पॉजेस देखील असतात. घरातलं फर्निचर ह्या पॉजेससारखं असावं असं मला वाटतं.'

'आमचे घर हे संपूर्ण गावाचे. सारा गाव आमच्या घराशी जोडला गेलेला. घर आणि गाव असे सारे एकच होते. मग का जाळल असावे आमचे घर?'

'कोणाच्याही घरात प्रवेश केल्याबरोबर ते घर आपल्याशी बोलते. घराचा पसारा किंवा होणारे दर्शन ही त्या घराची भाषा असते.'

'उन्हाळा आणि पावसाळा या दोन्ही ऋतूंत प्रत्येक वेळी घराने नवा उत्सव मांडलेला असायचा. पाऊस आला की, घरभर भांडी ठेवावी लागत. गडू, पातेली, बादली ठेवताना जणू बुद्धिबळाचा पटच मांडावा लागे. रात्रभर पावसाने भांडी वाजत. त्यांचा स्वर आणि लय सतत बदलत असे. संगीताच्या व्याकरणात ते बसत नसले तरी त्याला स्वतःची रीत आणि गती होती.'

'कौलारू घरातील स्ट्रगलिंग पीरियडने मला अनेक गोष्टी शिकवल्या. भविष्याची स्वप्ने डोळ्यात पेरली. ती साकारण्याची ताकद दिली. जीवनाकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन दिला. एकंदरीत मला घडवण्याच्या प्रक्रियेत 'गावाकडच्या घरानं' महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.'

'उरातल्या स्वप्नांमुळे या घरात गुंतून पडताच आलं नाही. तुला तुझी स्वप्नं पूर्ण करायचीत की या घरात गुंतून पडायचं, असे दोन टोकाचे पर्याय माझ्यासमोर होते. अर्थातच त्यातला पहिला पर्याय मला अधिक जवळचा, आतल्या गरजेचा वाटत होता.'

'आई नाही – वडील नाहीत – नुसता चिरेबंदी वाडा. त्यातले प्राणतत्त्व हरवलेले आहे. हरवल्या नाहीत त्या स्मृती. आणि माझं घर म्हणजे ह्या समृतींचा कल्लोळ. एक उत्सवचना स्मरणांचा!'

'माझं जन्मघर' या लेख संग्रहातील हा उत्सव आहे, स्मरणाचा, मनाचा, भावनेचा, नात्याचा, आपुलकीचा, मनातल्या साजरा करायच्या स्मृतिदीपांचा. आपल्या जन्मघराबाबत ओढ नाही असा माणूस विरळाच. घर म्हणजे केवळ चार भिंती आणि वर एक छप्पर, इतकीच त्याची व्याख्या होऊ शकत नाही. किंवा दगड, विटा, माती, चुना यांनी उभारलेली वास्तू म्हणजे घर, इतकाही मर्यादेचा बांध घालता येणार नाही. तर या वास्तूशी जडलेले ऋणानुबंध, घरातल्या माणसांशी जोडलेली नात्याची आणि जिव्हाळ्याची नाळ, अभ्यासाचा झालेला श्रीगणेशा, आणि कुटुंब नावाच्या संस्थेचा कधीही पुसून न टाकता येणारा संस्कार म्हणजे घर. या घराविषयीच्या स्मृतींना उजाळा देताना अनेक मान्यवरांनी वरीलप्रमाणे आपले मन मोकळे केले.

मुळात शीर्षक हाच या लेखसंग्रहाचा विषय आहे. संपादकांनी त्याची तीन भागांत विभागणी केलेली आहे. माझं जन्मघर, गावाकडचं घर आणि घराघरांचे रूप आगळे, अशी. यात सहभाग दिला तीही मान्यवर मंडळी आहेत. गुलजार, सुशीलकुमार शिंदे, आरती अंकलीकर– टिकेकर, दिनकर रायकर, किशोर कदम, यशवंतराव गडाख, राजन खान, अनंत दीक्षित, हेमंत टकले, वसंत आबाजी डहाके, अरुण जाखडे, किशोर मेढे, रवींद्र शोभणे आणि स्वतः संपादक अरुण शेवते. प्रत्येकाच्या आठवणीतल्या घरा–विषयीच्या भावना आपुलकीच्या, जिव्हाळ्याच्या. घरातील नात्याविषयीची आत्मियता आणि हळवेपण या लेखांमधून उलगडत जाताना अनुभवास येते. वय आणि गरजा, प्रगती आणि संसार यामुळे आपला बंध मूळच्या घरापासून सैल होतो. नवे गाव, नवे घर येथे तो निवारा शोधत राहतो. तिथेच स्थिरावत जातो. तरी मूळचे घर मनातल्या अवकाशातून आपले अढळ स्थान जराही विचलीत होऊ देत नाही. स्मृती सतत त्याच्या परिघात रमत राहते, त्याच्याभोवती भ्रमण करत राहते. त्याचा अनुभव या संग्रहातील लेख देतात. मुळात हे लेख 'ऋतुरंग' या दिवाळी अंकात आपण वाचले असणारच. तरीही पुन्हा वाचताना ते तोच आनंद देतात, जो दिवाळीत मिळाला होता.

संपादकांनी त्यांच्या मनोगतात तरल लेखांची रेखाटने साकारलेल्या बाळ ठाकूरांचा आदराने उल्लेख केला आहे. वयाच्या ८० व्या वर्षीही त्यांनी संपादकांबद्दल दाखवलेला स्नेह हा व्रतस्थ वृतीचा उत्तम नमुना म्हणावा लागेल. त्यांची रेखाचित्रे या संग्रहातील लेखनाला लाभली आहेत. मुखपृष्ठही साजेसे झाले आहे. स्मृतीच्या उबदार दुलईच्या काठावर विसावलेला मनाचा पक्षी शीर्षकाशी नाते सांगताना दिसतो.

- **मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**

# ग्रंथपान

## शोध
डॉ. बी.जी. शेखर (I.P.S.)




'घटनास्थळ आरोपींच्या प्रतिमांचा आरसा असते. त्याचे बारकाईने निरीक्षण करून आरोपीची घटनास्थळी हरवलेली प्रतिमा शोधणे, हे गुन्हे अन्वेषण करणाऱ्या प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. तपासाची सत्यता अन्वेषण अधिकाऱ्याच्या अंगी असलेल्या गुण, जिद्द,आणि आत्मविश्वासामुळे सिद्ध होते.'

हा मंत्र ज्यांनी जोपासला, ज्यामुळे अपेक्षित यशाला गवसणी घालता आली आणि एक कर्तव्यदक्ष अधिकारी अशा लौकिकाचे धनी झाले, ते आहेत डॉ. बी. जी. शेखर, आयपीएस अधिकारी. उच्च विद्याविभूषित, व्यासंगी, उत्कृष्ट अन्वेषणासाठी पोलीस महासंचालकांचे सुवर्णपद आणि राष्ट्रपती पारितोषिकाचे मानकरी. त्यानी त्यांच्या कारकिर्दीत उकल केलेल्या गुन्ह्यांची संख्या फार मोठी आहे. त्यापैकी काही घटना त्यानी वाचकांच्या समोर ठेवल्या आहेत, 'शोध' या पुस्तकाच्या रूपात.

गुन्हा हा शब्दच मुळात अंगावर काटा आणणारा. त्याचे स्वरूपही विचित्र, मस्तकात तिडीक आणणारे. अवघड आणि गंभीर. त्याचा तपास करायचा, तो तडीस न्यायचा, यासाठी घड्याळाच्या काट्यांना विसरून करावी लागणारी मेहनत, सारेच अचाट. कधी पुरावा आहे, तर कधी कुठलाच धागादोरा नाही. चांदणीच्या आशेवर भर समुद्रात सापडलेल्या नौकेसारखी अवस्था. परंतु जिद्दी आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याला कठीण काहीच नसते. त्याची चौकस आणि कुशाग्र बुद्धी चौफेर झेप घेत असते. सुतावरून स्वर्ग गाठण्याची किमया साधत असते. त्याचा अनुभव देणाऱ्या सत्यघटना या पुस्तकात समाविष्ट केलेल्या आहेत. क्लृप्त्या, खबरे, निर्णयक्षमता आणि स्वतःचा स्वतःवरील विश्वास, यामुळे शोध कसे लागले यांची प्रचिती देणाऱ्या, उत्कंठा वाढवणाऱ्या, काही क्षणी श्वास रोखायला लावणाऱ्या कथा या पुस्तकात वाचावयास मिळतात.

'ॲक्शन शूज' या कथेतील गुन्हेगार शोधण्यासाठी हेच शूज मुख्य पुरावा म्हणून उपयोगी ठरतात. 'प्यास मँगोला' कथेत बँकेच्या दरोडा प्रकरणात दरोडेखोरांनी विकत घेतलेली प्लास्टिकची कॅरीबॅग, हीच माग काढण्याची मुख्य खूण ठरते. तिच्यावर असलेला 'प्यास मँगोला' हा मार्क आणि तिचा रंग महत्त्वाची भूमिका बजावतात. 'सुखदेव' या कथेत त्याने चोरांना दिलेली रेक्झिनची पिशवीच चोरांची काळ ठरते. 'मीराचे लग्न' या कथेत तर कुठलाच पुरावा नाही. लग्नाचा सगळा ऐवज गेला. आता लग्न होणार नाही अशी परिस्थिती. परंतु खबऱ्याचा अंदाज कामी येतो. खाण्यापिण्याचे हाल असलेला निवृत्ती बर्डे नावाचा माणूस केपानगर भागात फार चंगळ करताना दिसतो. एवढाच अंदाज! पाणी तिथेच मुरलेले आहे हे नंतर स्पष्ट होते. 'टायर मार्क्स' ही कथा तशीच. खुनाच्या ठिकाणी केवळ कारच्या टायरच्या खुणा, प्लास्टिक कॅनचे बूच आणि राजदूतची चावी एकढाच पुरावा. त्यावरून खुन्याचा शोध लावला जातो.

'बलिदानाचा दोर' या कथेत फक्त नायलॉन दोरीचा तुकडा सापडतो. त्यावरून शोधाची चक्रे फिरत राहतात. आणि शेवटी बरोबर गुन्हेगाराजवळ पोचतात. 'मनातला मांत्रिक' या कथेत सुरा वापरण्याच्या पद्धतीवर लक्ष केंद्रीत करून शोध लावला जातो. तर 'सुतावरून स्वर्ग' या कथेत, वापरण्यात आलेली बोरीची ओली काठी, एवढाच पुरावा आहे. या काठीसाठी बोरीचे झाड शोधून काढले. ते ३–४ कि.मी. अंतरावर सापडले. काठी त्याच झाडाची आहे याची खात्री झाली. परंतु त्या झाडाखाली देशी दारूच्या बाटल्या, रुमाल, कंगवा व बसच्या तिकिटाचे तुकडे सापडले. त्यावरून माग काढत पोलीस खऱ्या गुन्हेगारांपर्यंत पोहचले. ही कथा म्हणजे सुतावरून स्वर्ग गाठण्याचाच प्रकार म्हणायला हवा.

या संग्रहात एकूण अकरा कथा आहेत. त्या चोरी, दरोडा, खून या गुन्ह्यांशी संबंधित आहेत. गुन्हा करणाऱ्यांची मानसिकता पाहता, पोलीस आपल्यापर्यंत पोहचणार नाहीत याची ते काळजी घेतात. पोलिसांच्या चातुर्याची कसोटी पाहण्यासाठीच जणू ती घटना त्यांनी घडवलेली असते. पोलिसांसाठीच हेच आव्हान असते. ते आव्हान कशा रीतीने पेलले याचा उलगडा या कथांमधून होतो. कथा सत्यघटनेवर आधारित आहेत. परंतु त्या काही पोलिसी तपास अहवालाच्या स्वरूपात मांडलेल्या नाहीत. कथेला आवश्यक असलेला आकृतिबंध, सुरुवात, मध्य, शेवट, ताणतणाव, संघर्ष, व्यक्तिसापेक्षता, वातावरणनिर्मिती यांचे भान उत्तमरीतीने सांभाळलेले आहे. कथेची उत्कंठा कायम राहावी म्हणून त्यातले रहस्य अंतिम टप्प्यापर्यंत सांभाळावे लागते, तसे ते सांभाळले आहे. या कथालेखकाच्या कारकिर्दीला झळाळी देणाऱ्या घटना आहेत. तरीही लेखकाने त्यात 'मी, मला, माझा' असा गौरवाचा उदोउदो कटाक्षाने टाळलेला आहे. त्यामुळेच कथांमधील कथानक मूळ घटनेशीच घट्ट बिलगून राहिले आहे, कथेची वीण बांधेसूद झाली आहे. हेच या कथांचे यश म्हणावे लागेल. कथेच्या शेवटी सारांश रूपातली अवतरणे चौकटीत दिली आहेत. कथेला आकार देण्यासाठी रेखाचित्रे दिली आहेत. तपासाचे भिंग आणि 'लक्ष्य' चा गोल खाकी रंगाच्या पार्श्वभूमीवर चितारले आहेत. मुखपृष्ठाची कल्पनाही सुंदरच.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**